# रंगरेषा

दीपा जयंत मिरींगकर

रांगोळीतील नाग प्रतिमा

मूर्तिमंत सात्विकता

रेघोटी

रंगावेल्ली

अक्षय कला

रांगोळीची कविता

चैत्रागंण

रांगोळी एक बिंदू

तैल रांगोळीया

रांगोळी - ओणमची

रांगोळी - पांडूरंगाची

फुले स्वस्तिके रांगोळीची

मुग्गु



कोलम

हस्तलाघव

भौमितिक रचना

नाभीकमळ

शंख प्रतिमा

ठिपक्यांचे कमळ

बंगाली रांगोळी - अल्पना

मांडणा

भारतीय संस्कृतीचे प्रतिक

रंग होळीचे - उल्हासाचे

महिरप

कशिदा आणि गाठीच्या रांगोळ्या

नवरंगी रांगोळी नवरात्रीची

रांगोळी स्वातंत्र्य दिनाची

# रंगरेषा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट आहेत.

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# रंगरेषा

## (ठिपक्यांची रांगोळी)

सौ. दीपा जयंत मिरींगकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# रंगरेषा


## सौ दीपा जयंत मिरींगकर

पत्ता ---७०१ अ राजदीप गॅलारिया,

तालुका ग्रन्थालयासमोर, सदर फोंडा गोवा

संपर्क क्र. ९४२३८८६२९२

मेल dmiringkar@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp: 7710980841

APP : https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity. www. esahitybooks

**प्रकाशन : १८ मार्च २०१८ गुढीपाडवा**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य - प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मनोगत

रांगोळी घालणे ही एक अशी कला जिचे आयुष्य अगदी छोटे. अगदी याच वैशिष्ट्यामुळे प्रत्येक दिवशीची आणि प्रत्येकीच्या हातची ही कला वेगळी दिसते. यात मी वर्णन करते आहे ती आपली पारंपारिक रांगोळी. ठिपक्यांची, ठिपक्याशिवायची. आपल्या संस्कृतीत कोणत्याही शुभ प्रसंगी, सणाला पहिली असते ती रांगोळी. आधुनिकतेच्या प्रवाहात अनेक परंपरा मोडीत गेल्या. गेली नाही ती रांगोळी. तिने आपले स्वरूप बदलले. आकार बदलले. मातीच्या अंगणातून, सारवलेल्या देवघरातून ती फरशीवर, टाइल्स वर आली. पण रांगोळीमागची मांगल्याची सात्विकतेची भावना मात्र तीच होती. भारतातील विविध प्रांतात याची नावे बदलतात, आकार आणि रूप बदलते. त्या घालण्याची साधने म्हणजे तांदुळाचे पीठ, भाताची फोलपटे, नारळाचा चोथा आणि दगडाची पूड, फुले किंवा पाने. त्या त्या प्रांतात सहज उपलब्ध असेल ते सामान. घराघरातून आपल्या मागच्या पिढीकडून केवळ पाहून आणि सरावाने संक्रमित होत गेलेली ही कला म्हणजे आपल्या संस्कृतीचे एक प्रतिक. आणि आपली विविधतेतील एकता यातूनच सहज जाणवते.

सौ अपूर्वा ग्रामोपाध्ये दैनिक हेराल्ड मराठी गोवा हीला माझा रांगोळीचा छंद माहिती होता. शिवाय अनेक वर्तमानपत्रात माझे ललित लेख येत होते. त्यामुळे तिला मी या विषयावर काही लिहू शकेन अशी खात्री वाटली. म्हणून तिने दर शनिवारी मुक्ता या पुरवणीसाठी ‘रंगरेषा’ हे माझे सदर सुरु केले. संपादक श्री राजेंद्र देसाई यांनीसुद्धा माझ्यावर विश्वास टाकला. त्यामुळेच हे लेखन होऊ शकले. त्याशिवाय धनश्री मणेरीकर हिनेही मला खूपच मदत केली. प्रत्येक लेख वेळात लिहिण्याचा आणि पाठविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. २०१७ मध्ये जानेवारी ते डिसेंबर या केलेंडर वर्षासाठी हे लेख लिहिताना मी त्या लेखाच्या प्रसिद्धी दरम्यानच्या महत्वाच्या सणाचे भान ठेवून त्या संबधित विषय आशय आणि रांगोळी ठेवण्याचाही प्रयत्न केला. माझे वडील श्री गजानन भागवत हे खूप चांगले चित्रकार आहेत. त्या वेळच्या परीस्थितीमुळे, वातावरणामुळे त्यांची कला त्यांना पुढे नेता आली नाही. कोणतीही प्रसिद्धी मिळाली नाही. पण त्यांच्याकडून माझ्यात ही कला किंवा त्याची आवड आली असावी.

पूर्ण वर्षभर या सदरासाठी लिहिताना श्री रवींद्र कामत, डॉ प्रमोद पाठक, श्री विनायक खेडेकर अशा नामांकित व तज्ञ व्यक्तीचे सहाय्य मार्गदर्शन लाभले. माझी मैत्रीण वनिता हिच्याकडून रांगोळीतील बारकावे समजले. गोव्यातील एक सच्चा समाजसेवक, कलारसिक ॲड. सतीश सोनक यांनी पुष्कळ वेळा या संकलनाचे महत्व मला सांगीतले, प्रोत्साहन दिले. आज त्यांची आठवण येत आहे. आज त्याच बरोबर घरातील माझ्या पती श्री जयंत मिरींगकर, जे स्वत: एक रांगोळी कलाकार आहेत, आणि मुले अंबर आणि सृजन यांनी माझ्या या लिखणासाठी सतत प्रोत्साहन दिले.

या विषयाचा कोणताही पूर्व अभ्यास नसताना नवीन माहिती घेऊन मला हे लेख लिहिणे या साऱ्यामुळे शक्य झाले. लेख वाचल्यावर अनेक वाचकांचे आलेले दूरध्वनी हे माझ्यासाठी एक टॉनिक होते. या साऱ्यामुळे मी हे सदर पूर्ण करू शकले. यातील अनेक रांगोळ्या /आकृत्या मी काढल्या आहेत. तर काही इंटरनेट वरूनही मिळवल्या आहेत. तसेच माहितीसुद्धा मिळवावी लागली. आपल्या पारंपारिक, छोट्या, अर्थपूर्ण, आणि सहज रेखता येणाऱ्या रांगोळ्या कुठे तरी हरवत चालल्यात. त्या जपण्याचा माझ्या अल्प स्वल्प बुद्धीचा हा एक छोटासा प्रयत्न.

बडोदा येथील साहित्य संमेलनात झालेल्या कार्यशाळेत इ- साहित्य ची माहिती मिळाली. आणि पुढे त्यांनी या पुस्तक प्रकाशनासाठी आस्था दाखविली. त्यासाठी संमेलन आयोजक आणि इ साहित्य कार्यशाळा आयोजक आणि अर्थात प्रकाशक (आम्ही एकमेकांना फारसे ओळखत नसूनही त्यांनी माझ्या लिखाणावर विश्वास टाकला म्हणून)दोघानाही धन्यवाद.

नाव ---- सौ दीपा जयंत मिरींगकर

पत्ता ---७०१ अ राजदीप गॅलारिया,

तालुका ग्रन्थालयासमोर, सदर फोंडा गोवा

संपर्क क्र. ९४२३८८६२९२

मेल dmiringkar@gmai. com

**माझ्या पूर्ण कुटुंबाचा उद्धार करणाऱ्या**

# परम पूज्य पापा

**यांच्या चरणावर माझे कोटी कोटी नमस्कार**

**आपल्या आशीर्वादाचा परीसस्पर्श सदैव मस्तकी राहू दे.**

सौ दीपा जयंत मिरींगकर

# रंगरेषा

*हे रांगोळी विषयक पुस्तक*
*मी समर्पित करीत आहे*
*भारतातील असंख्य आया भगिनींना*
*ज्यांनी केवळ निरीक्षणाने ही परंपरा, कला जपली,*
*आणि पुढच्या पिढीत संक्रमित केली*

- सौ दीपा जयंत मिरींगकर

७ जानेवारी२०१७ दैनिक हेराल्ड, गोवा (मुक्ता पुरवणी)

*रंगरेषा*

# रांगोळी -----मानस शास्त्रीय दृष्ट्या

खरं तर रांगोळी काढणं हे ही एक साधी गोष्ट /क्रिया-- पण रांगोळी रेखताना मन काही काळासाठी एकाग्र होते आणि काही शुभ चिन्हे रेखाटणे एक वेगळी उर्जा देते. आपल्या पूर्वजांनी या प्रथा परंपरा निर्माण केल्या त्यामागे काहीतरी हेतू असावा. सकाळी उठून स्वचछ सारवून अंगणात घातलेली रांगोळी ही घालणारीच्या मनात प्रसन्नता आणतेच पण त्याचबरोबर घरात येणारा घराबाहेरून दुरून घराकडे फक्त पाहणारा सुद्धा आनंदी होतो.

हिंदू धर्मात पूजा पाठ ते अंतिम संस्कार अशा सर्व धार्मिक कार्यक्रमात काही वैज्ञानिक सत्य त्यामागे असायची. मंदिरातून बाहेर आल्यावर आपल्याला कस वाटत ? खूप शांत शाश्वत आणि आतून समाधान मिळत. हे सारे कशामुळे ? मंदिराच स्थापत्य रचना, तालबद्ध अशा प्रार्थना, श्लोक यांचा आवाज यामुळे मन शांत आनंदी होत. हेच काम रांगोळीही करते. नैसर्गिक रित्या मानसिक अस्वस्थता दूर करणे तेही फक्त रोज किवा नियमित रांगोळी पाहून. हा आपल्याला माहिती नसलेला गुण.

भारतातील विविध भागात त्या भाषेत रांगोळीला वेगळ्या नावानी ओळखतात. तामिळनाडू आणि केरळ मधे ती ‘कोलम’ तर बंगालात ‘अल्पना’ आणि आंध्रात तिला ‘मुग्गु’ म्हणतात. आजकाल फुलांची, फुलपाकळयांची, धान्यांची, पानांची आणि पाण्यावरची अशा अनेक प्रकारांनी आपले समारंभ सजले जातायत. घराला अंगणाला रांगोळी शालीन शोभा देते हे खरे.

भारतीय संस्कृतीत जन्म झालेलं संगीत आणि कला जगभर प्रसृत झाल्या. श्रीमंत आणि समृद्ध अशी सांस्कृतिक मूल्य जपणाऱ्या अशा परंपरा. साधारणपणे प्रत्येक भारतीय स्त्रीला रांगोळी कशी रेखावी हे माहिती असतच. अगदी बालपणीच आई, मावशी, काकू, मामी, अशा घरातल्या नात्यातल्या स्त्रिया ते स्वत: काढताना मुली पाहतात आणि नकळतच शिकून घेतात.

भारतीय लोक निसर्गाच ऋण मानतात. पंचमहाभूत पृथ्वी, आप वायू आकाश अग्नी या सर्वांच ऋण व्यक्त होत ते रांगोळीतून त्यात फुले, फुलपाखरू,

पाने झाडे अशा विविध आकृत्याबरोबारच शुभ अशा स्वस्तिक चक्र शंख पद्म गोपद्म अशा अनेक चिन्हाचा समावेश असतो.


ठिपके जोडून आणि ठिपके काढून पण ते बाजूला ठेऊन त्याच्या भोवती सुद्धा रांगोळी काढतात. साध्या पांढऱ्या रंगाच्या दोन बोटांनी ओढलेल्या काही रेषांनी दारापुढचे छोट्या अंगणाचे अस्तित्व शुभमयी होवून जाते. आणि त्यात एक लहानसा हळद आणि पिंजरीचा ठिपका घातला म्हणजे रांगोळी पूर्ण होते. अगदी साध्या झोपडी पुढे अशी रांगोळी घालताच तिच्यापुढे महालाचे वैभव फिके दिसते अशी उदाहरणे मी पाहिली आहेत. रांगोळीचे ठिपके जोडून पूर्वीच्या स्त्रिया कासव, बेलाची पाने, कमळ, नाभी कमळ, परडी, अशा अनेक आकृत्या काढीत असत. मागच्या पिढीच्या बोटात अशी जादूच होती जणू. अगदी सहजपणे आणि काही क्षणातच या सुंदर रांगोळी दारात रेखित असत.

रांगोळीचे आयुष्य अगदी थोडके तरीही ती काढणारा कलाकार आणि पाहणारा रसिक दोघांच्या मनाचे समाधान मात्र नक्की ठरलेले. आणि एक दोन दिवसात पुसली गेली तरी परत त्याच जागी रांगोळी काढायला कुणी सज्ज असते.

अंगणातील रांगोळी अशुभ शक्ती घरात येऊ देत नाही व शुभ शक्तींना

घराबाहेर पडण्यास अडथळा आणते अशी समजूत आहे. अगदी छोट्या रांगोळ्यांनी आपले अंगण किंवा दारातील लहानसा कोपरा सजवणे सहज शक्य आहे.

‘अतिथी देवो भव’ ही आपली संस्कृती. उंब्रऱ्यावरची रांगोळी अभ्यागताचे स्वागत करते त्याचबरोबर ती रांगोळी न विस्कटता अदबीने यायला लावते. मनातील कटुता दूर सारून घराची आब राखून या. असेच जणू सुचवते !!!!!! सोबत आहे अगदी साधी सोपी रांगोळी काही वेळा 3D चा भास देणारी नक्की जमेल. .. ..



४-४

दिनांक 14 जानेवारी२०१७ दैनिक हेराल्ड, गोवा (मुक्ता पुरवणी)

## रेघोटी१

आपला निवारा ही माणसाची मूलभूत गरज म्हणून माणूस एका जागी राहू लागला. मग ती डोंगरातील गुहा पुढे झोपडी आणि घर. पण ती एकदा भागल्यावर त्याच्या सौंदर्याकडे त्याचे लक्ष जाऊ लागले. आदिमानवानेसुध्दा राहण्याच्या गुहा विविध चित्रांनी सुशोभित केलेल्या सापडतात. भारतात घर आणि अंगण या दोन्हींच्या सजावटीसाठी रांगोळीने विविध आकार रेखाटायची पध्दत आहे. त्यांत रंग भरून ती अधिकच देखणी केली जाते. रांगोळीचे प्रकार सुध्दा किती विविध. कुठे कुठे गारगोटीचे दगड भाजून त्याची भुकटी करून त्या भुकटीचे रांगोळी काढली जाते तर कुठे कुठे 'अल्पना' म्हणजे तांदुळाच्या पिठाने काढली जाते. या रांगोळया व त्यांची विशिष्ट चिन्हे, आकार इत्यादींची विविध सणावारांशी सांगड घातली गेली. उदा. गौरी येतात तेव्हां घरभर तिची पावले काढणे, चैत्र महिन्यात घातले जाते ते चैत्रांगण, चातुर्मासात तेहतीस गोपद्मे (तेहतीस कोटी देवांचे प्रतिक) इत्यादी.

**रांगोळीच्या उभ्या आडव्या रेघातून आणि छोट्या छोट्या ठीपक्यातून एक कलाकृती जन्मते. कधी ती पारंपारिक असते. तर कधी मुक्तहस्त. कधी प्रतीके तर कधी शुभचिन्हे.**

सांस्कृतिक समारंभ प्रसंगी, शुभकार्य प्रसंगी घरासमोर, अंगणात, उंब-यावर, देवघरासमोर, चौरंग, वा पाटाभोवती रांगोळी रेखाटली जाते. पूजापाठ, यज्ञ, अभ्यंगस्नान, औक्षण, नामकरण, भोजन अशा सर्व प्रसंगी सर्वप्रथम रांगोळी काढली जाते. एकसारख्या रुंदीची, नाजुक रेघ तसेच एकसारख्या अंतरावर काढलेले ठिपके काढणे हे कौशल्याचे काम आहे. आपल्याकडे पिढ्यान पिढ्या चालत आलेली ही कला. सरावाने प्रत्येक व्यक्ती साधी छोटी रांगोळी सहजपणे रेखू शकेल. ठिपके जोडताना, छेदताना, आणि कधी सोडताना ती आपले आयुष्यच जणू मांडत असते. कधी नाती जोडणे, तर कधी थोडे अंतर ठेवून पण जवळूनच बाजूला राहणे. कधी ठिपके समांतर, तर कधी दोन बिंदूच्या मधोमध ठिपका रेखित हळूहळू कमी करीत एका बिंदूकडे कडे वाट चालायची. तीही अगदी शिस्तीने. आजूबाजूच्या वातावरणाची, कुटुंबाची जशी गरज असेल तसे वागायचे. म्हणूनच रांगोळी अगदी जिवाभावाची सखी बनत जाते. एखाद्या घरापुढे घातलेली सुबक रांगोळी पाहताना तिचे पाय रेंगाळत नाहीत अशी कोणी असेल का ??

जागेभावी व वेळेअभावी शहरवासियांना ही कला जपणे शक्य नसले तरी सणावाराला, महत्त्वाच्या धार्मिक प्रसंगी मात्र रांगोळीशिवाय अजूनही कुणाचे पान हलत नाही. पेशवाईतील भोजनपंक्तीत चांदीच्या ताटांभोवती सुबक महिरपी काढल्या जात. त्यानंतर 'रांगोळे' नावाचे एक छोटेसे यंत्र निर्माण झाले. त्यात रांगोळीची पावडर भरून पंक्तिमध्ये ते जमिनीवर ओढून एकसारखी रांगोळी काढली जाऊ लागली. जमीन सारवल्यावर तिच्यावर न विसरता रांगोळीच्या चार तरी रेघा काढतातच, अन्यथा ती जमीन अशुभ समजतात. आमच्या लहानपणी याचा अर्थ समजायचा नाही. पुढे कधीतरी कोणाच्या घरी अशुभ घटना घडली तेव्हा शेणसडा घालून तसाच कोरा ठेवला. रांगोळीशिवाय ते अंगण ओकेबोके दिसले आणि मग रांगोळीचे बोट ओढ अशी आजीची लगबग का व्हायची ते कळून चुकले.

रांगोळीच्या रेघानी प्रवेशद्वाराचे रूपच देखणे होवून जाते. खर तर सध्या कोणाकडे रांगोळी घालण्या एवढा वेळ नसतो म्हणून पारंपारिक रांगोळयांचे स्टिकर्सही बाजारातून घेवून आणि तेच चिकटवून लोक हौस भागवून घेतात. आधुनिक काळाशी गृहिणीबरोबर रांगोळीने सुद्धा स्वत:ला बदलवले आणि जमवून घेतले. रूप बदलले तरी भावना तीच रहाते. सजवण्याची आणि स्वागताची.

सोबतची रांगोळी अगदी साधी सोपी ठिपक्यांची १३-७. आपणही ती सहजपणे रेखू शकाल.


13-7

दिनांक शनिवार २१ जानेवारी २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रेघोटी -२

सर्व साधारणपणे आपल्या परिसरात रांगोळी चार भागात घातली जाते.

१. रोज उंबरठ्यावर घातली जाणारी रांगोळी उदा. स्वस्तिक, गोपद्म अशी शुभचिन्ह आणि जय श्रीराम असे शब्द असे अनेक प्रकाराने आढळते. ही रांगोळी आताच्या काळातही शहर, गावात मोठ्या हौसेने घालतात. अगदी वेळ नसेल तर त्याजागी रांगोळीचा स्टीकर तरी लावला जातोच.

२. रोज अंगणातील तुळशीसमोर घातली जाणारी रांगोळी यात एखादी वेलबुट्टी, पाने, फुले, महिरप असे अनेक प्रकार असतात.


३. देवखोलीत देव्हाऱ्या समोर – इथे वेगवेगळी शंख, कमळ, चक्र, अशी शुभचिन्हे रांगोळीतून रेखली जातात. आजकाल छोट्या घरात देवांना वेगळी खोली नाही मग या रांगोळीला जागा नाही. पण गावात जुन्या घरात आजही ही प्रथा असते.

४. घरासमोर प्रवेशद्वारावर – इथे कासव, कारल्याचा वेल, कोयरी असे ठिपक्यांच्या रांगोळीचे पारंपारिक प्रकार पाहायला मिळतात. यासाठी सुद्धा आजकाल दारासमोर जागा मिळणे खूप कठीण फ्लेट संस्कृतीत तर एका दारासमोरच दुसरे दार असते. बाहेर आलेल्या पाहुण्यांचे चप्पल ठेवायलाच जागा नसते मग रांगोळीला तर कोठून मिळणार ?? त्यामुळे हाही प्रकार आता विरळ झाला आहे.

आता येणारी रथ सप्तमी म्हणजे माघ शुद्ध सप्तमी. सूर्य देवतेच्या पूजेचा महत्वाचा दिवस. सूर्याची पूजा म्हणजे साक्षात उर्जेचे पूजन. उत्तरायणाची सुरवात झालेली असते. वसंत ऋतूची चाहूल आणि पिक कापणीची सुरवात त्यामुळे आनंद उत्सव मानला जातो. या दिवशी सूर्याचा जन्म झाला म्हणून सूर्य जयंती असेही मानले जाते.

या दिवशी सात रथांच्या घोड्यावर बसलेल्या सूर्यदेवाची रांगोळी अंगणात काढतात, रथाचे सात घोडे हे प्रतिक आहे सात रंगांचे. येणाऱ्या ऋतुराजाच्या स्वागतासाठी ही पूजा रांगोळीची.

जवळच एक चूल मांडून त्यावर दुधाची खीर बनवतात. ही खीर उतू जावी लागते. मग ही खीर नैवेद्य म्हणून सर्वांना वाटतात. "दुधाची रथसप्तमी झाली" हा वाकप्रचार अशा प्रथेतून निर्माण झाला. सूर्य देवाच्या रथाची प्रतिकृती सोबत दिली आहे. दाक्षिणात्य पद्धतीची अशी ही ठिपके घालून पण ते एकमेकाला न जोडता त्याच्या सभोवताली घातली जाणारी, सुरवातीला क्लिष्ट, पण सरावाने अत्यंत सोपी आणि लयदार अशी ही रांगोळी. ठिपके मोजून अगदी शांतपणे लक्ष पूर्वक काढल्यास सहज जमून जाईल.



दिनांक शनिवार २८ जानेवारी२०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी


## रंगावेल्ली

महाराष्ट्र गोवा आणि दक्षिण भारतात रोजच्या रोज सडा सारवण घालून निदान दारासमोरची छोटीशी जागा पुसून सकाळी रांगोळी घालणे ही एक प्रथा म्हणून आजवर सांभाळली आहे. आज घातलेली रांगोळी वाऱ्याने किंवा इतर काही कारणांनी पुसली जाणार हे माहिती असून सुद्धा रोज रांगोळी काढलेली अंगणे आज दुर्मिळ झाली आहेत. यात घरातील गृहिणीचा सकाळचा वेळ आणि कला दोन्हीबाजूने कस लागतो. बऱ्याच वेळा आधी ठिपके काढून मग त्यात रांगोळी घालतात.

रांगोळीचे ठिपके जोडून त्याच्या रेषा बनवत किंवा त्या बिंदुना जोडत गोलाकार कंसाकार घेऊन विशिष्ट आकारातील रांगोळी पुरी होत जाते. काही वेळा या रेषा दुरेघी तिरेघी अशाही दिसतात. त्यामुळे मुख्य रेषेपासून समान अंतर ठेवत दुसरी तिसरी रेषा काढणे हे एक कौशल्याचे काम आहे. सराव आणि कला दोन्ही चा योग्य असा मिलाफ असावा लागतो. दक्षिणेकडे याच रांगोळीचे स्वरूप थोडे गोल आणि वेलांट्या घातल्यासारखे असते. ठिपके इथेही असतात, पण हे ठिपके बाजूला ठेवून त्याच्या भोवती रांगोळी काढली जाते. त्यामुळे या रांगोळीतील ठिपके दिसतात.

आंध्रातील 'मुग्गु' मध्ये रेषा आणि वक्राकार यांचा एक वेगळा मिलाफ पाहायला मिळतो. 'रंगावेल्ली' या कर्नाटकात घातल्या जाणाऱ्या रांगोळीतसुद्धा दोन्ही प्रकार एकाच रांगोळीच्या आकृतीत गुंफले गेलेले आढळतात. याही रांगोळ्या काढणे खूप मेहनतीचे असते. तरीही आपल्या माताभगिनी ही परंपरा चालवीत असतात. तामिळनाडू या प्रांतातील रांगोळीत मात्र वक्राकार जोडून खूप सुंदर मोठ्या मोठ्या रांगोळ्या पाहायला मिळतात.

आपल्या गोव्यात आजही मातीचे नाते न सोडलेली संस्कृती गावागावातुन आहे. रांगोळी म्हणजे या संस्कृतीचा आणि अंगणाचा जणू जन्मसिद्ध हक्कच. झाडलोट करून लिंपलेले सपाट घट्ट अंगण आणि त्यावर शेणाने सारवून गुळगुळीत केलेली जमीन. त्यावर सुरेख अशी रांगोळी म्हणजे एक प्रथा न राहता तिचे 'व्यक्त होणे' तेही अशा सध्या सोप्या पद्धतीने. सकाळी अंघोळ करून अगदी शांतपणे, रेखीवपणे अंगणात रांगोळी घालणारी स्त्री जणू सात्विकतेची परिपूर्णता. सोबतची रांगोळी अशीच सोपी आहे. आपण अगदी सहज घालू शकाल.



9-7

दिनांक शनिवार ४ फेब्रुवारी २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी एक भौमितिक रचना

रांगोळी घालताना त्यासाठी लागणारे मुख्य पदार्थ म्हणजे पांढरी रंगांची दगडाची पूड. दाक्षिणात्य रांगोळी तांदुळाच्या पिठापासूनही घातली जाते. पाण्यात, तेलात अशाही रांगोळी घातलेली पहावयाला मिळते. फुलांच्या गालीचाची नयनरम्य रांगोळी तर सार्वजनिक आणि लग्न समारंभात मिरवली जाते. त्याचबरोबर अनेक रंग वापरून तिला आकर्षक बनवतात. पण रोजच्या रांगोळीत असे रंग न घालता केवळ सौभाग्य प्रतिक असे हळद आणि पिंजर वापरून त्यात सुंदरता आणि पावित्र्य याचा संगम सुद्धा पाहायला मिळते.

रांगोळीत अनेक भौमितिक आकृत्या आढळतात. या आकृत्यांचे सांकेतिक अर्थ प्रतीत होतात, त्यामुळे त्या, त्या देवतेच्या पूजा अर्चेसाठी या आकृत्या मुख्य आकार ठेवून सभोवती रांगोळी काढली जाते.

बिंदू – ठिपका हा अगदी छोटा रांगोळीचा भाग. दोन बोटांच्या मधून पडणारा लहान ठिपका. हा जेवढा लहान तेवढी रांगोळी रेखीव बनते. त्याचबरोबर दोन बिंदुतील अंतर एकसारखे असेल तर पूर्ण रांगोळी सुबक होते. संस्कारभारतीच्या रांगोळीतील बिंदू पाच बोटातून पडणारा रांगोळीतील एक छोटा डोंगर. पण हा सुबक पणे पडल्याशिवाय ही रांगोळी पुढे शिकविली जातच नाही. बिंदू शिकण्यातच पूर्ण एक दिवस लागतो. पण एकदा बिंदू आणि रेघा जमली की ही रांगोळी म्हणजे एकदम सोपी. बिंदूकडून किंवा शून्यापासून होणारी सुरवात पुन्हा शून्याकडे अंत पावते असाही एक वेगळा अध्यात्मिक, पारमार्थिक अर्थ यातून सूचित होतो.

रेषा –रांगोळीतील रेघ किंवा रेष काढणे खूप सोपे पण सराव असला तरच. सरळ रेघ म्हणजे सरळ मार्ग आणि अनेक रचनांचा पाया. दोन बिंदू जोडणारी रेषा सलग आणि सरळ काढता आली की रांगोळी जमलीच. आयुष्यात एकदा आपण आपला मार्ग सरळ असे ठरवले की मग कधीच भय नाही, फक्त विश्वास पाहिजे.

त्रिकोण – तीन रेषा एकसारख्या लांबीच्या आणि सारख्याच कोनातून काढल्या तरच त्रिकोण व्यवस्थित दिसतो. पुरुष आणि स्त्री किंवा शिव शक्ती यातून विश्वाची उत्पती होते याचे हे प्रतिक मानले जाते.

चौकोन – यालाच चतुष्कोन सुद्धा म्हणतात. जगाचे स्थैर्य, स्थिरता या आकृतीतून दिसून येते. पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण या चार मुख्य दिशासुद्धा प्रतीत होतात.

पंचकोन –विश्वातील पाच महाभूते तत्व पृथ्वी, जल, वायू, आप, अग्नी यांचे प्रतिक आणि पाच कोनातून हे सारे एकाच आकृतीत दाखवणे म्हणजे पंचकोन.

षटकोन—स्त्री पुरुषाचे प्रतिक असे सहा त्रिकोण यात दिसतात. देवी लक्ष्मीचे प्रतिक म्हणजे षटकोन. लक्ष्मीपूजेमध्ये

षटकोनाची रांगोळी असतेच.

अष्टकोन—आठ रेघा म्हणजे अष्ट दिशांपासून संरक्षण. आणि रक्षण करणारा देव प्रत्यक्ष विष्णूच्या आराधनेसाठी अशी अष्टकोनी रचना असलेली रांगोळी रेखिली जाते.

या आणि अशा अनेक भौमितिक रचना रांगोळीत दाखवतात. कोणत्याही मापाशिवाय, केवळ सरावाने आणि अत्यंत थोडक्या वेळात अशी सुबक रांगोळी रेखाटणे केवळ कलाकारांनाच जमावे. परंपरेने ही कला कित्येक पिढ्यांनी जपली, वाढवली, आणि पुढच्या पिढीच्या स्वधीन केली. आताच्या पिढीला मात्र याचे महत्व किंवा आजकालच्या भपकेबाज वातावरणात या कलेचे वेगळेपण जाणवेल का हा प्रश्न मनात रेंगाळतो आहे. शिवाय महत्वाचे म्हणजे या कलेचे आयुष्य एवढे छोटे की एखादी वाऱ्याची झुळूक, लहान मुलांच्या खोड्या, कोण्या मांजर, कुत्र्याचा वावर या सुंदर कृतीचा क्षणात विचका करू शकतो. काही वेळात ही रांगोळी विस्कटेल, त्यातील रंग बिखरतील हे माहिती आहे, तरीही पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी तेवढ्याच उत्साहाने, नीटसपणे पुन्हा रेखणाऱ्या आणि त्यासाठी कधीही प्रसिद्ध न झालेल्या या अशा रांगोळी कलाकारांना किती गौरवावे हेच कळत नाही!!!!!!!



## दिनांक शनिवार ११ फेब्रुवारी२०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## बिंदू - रांगोळीचा

अंबा, जगदंबा, जगन्माता, भवानी, दुर्गा, लक्ष्मी, सरस्वती, काली, पार्वती, अशा भिन्न भिन्न रुपांत एकाच मातृशक्तीचे दर्शन घडावे तसेच या रांगोळीचे बिन्दुप्रधान, आकृतिप्रधान, व्यक्तिप्रधान, प्रकृतिप्रधान असे विविध प्रकार सांगता येतील. प्रदेशानुसार रांगोळीचे स्वरूप बदलत जाते. त्याचप्रमाणे वर्षातील ऋतू आणि सण समारंभ यामध्ये ही रांगोळी अशीच निरनिराळ्या रूपातून समोर येते.

रांगोळी स्पर्धेमधून दिसणारी रांगोळी ही तर एक वेगळेच रूप. ही रांगोळी मात्र स्त्री- पुरुष दोघेही घालतात. ही रांगोळी घालताना कलाकाराला तासनतास रेखित राहावे लागते. त्यावेळी पंखा, पाण्याची बाटली हे सारे दूर ठेवावे लागते. शिवाय आपलाच घामाचा एक थेंब, कपड्याचे टोक, ओढणीची किनार यामुळे सुद्धा अनेक तासांची मेहनत क्षणात वाया जाऊ शकते. आयोजकांनी आखून दिलेल्या चौकटीत एखादे निसर्गचित्र किंवा एखाद्या नटाचे, राजकीय पुढाऱ्याचे चित्र रांगोळीतून मांडणे म्हणजे खूप कठीण काम. शिवाय ही रांगोळी एखादे लहान मुल, कुत्रा, मांजर यासारखे प्राणी एवढेच नव्हे तर आयोजकांपैकी कोणी अनवधानाने विस्कटू शकतात. म्हणजे ही रांगोळी काढणे अवघड आहेच पण त्याहीपेक्षा परीक्षक येईपर्यंत ती त्या नेटक्या रुपात वरील साऱ्या छुप्या शत्रूपासून वाचविणे हे तर मोठे काम होऊन जाते. तरीही अशा स्पर्धात अनेकजण भाग घेतात आणि यश ही मिळवतात. ही रांगोळी सगळ्या प्रकारातील कठीण असे मला तरी वाटते.

आपल्या पारंपारिक रांगोळ्या कशा एका प्रत्येक सणांला वेगळी. आणि याच वैशिष्ट्य म्हणजे एका स्त्रीने ती नवी वेगळी रांगोळी घरात किंवा दारात रेखली की ती पाहणारी सखी मनात आणि दुसऱ्या- तिसऱ्या दिवशी प्रत्यक्षात रेखून पाहतेच. अगदीच नाही तर छोट्याशा हातातल्या चीटकोऱ्यावर हळूच रफवर्क होऊन जाते. यासाठी मुळातून अंत:प्रेरणा असावी लागते आणि ती आपल्याकडे असतेच.

मी माझ्या दारातील रांगोळीचा फोटो सहजच एकदा सोशल मिडीयावर घातला तर माझ्या कित्येक सख्यांनी ती रांगोळी आपण स्केच पेनने कागदावर किवा रांगोळीतून काढून त्याचे फोटो मला परत पाठवले. मी पण मग सुरवातीला ठिपके घातलेला फोटो मग पुढचे रेखाटन असे करून ते फोटो पाठवून त्याना रांगोळी कशी काढावी ते दाखवू शकले.

खूप अंतरावरूनही आम्ही सख्या अशा रितीने एकमेकींशी संपर्कात राहतो जोडल्या जातो हा आधुनिक तंत्राचे फायदा आहे. पण या तंत्रज्ञानाद्वारे आपल्या परंपरा जपल्याचा मला खूप आनंद मिळालाच पण आणि माझ्या सख्या रांगोळी घालून पाहू लागल्या हे समाधान खूप मोठ्ठ. आपण एकमेकांना हा आनंद नक्कीच देऊ शकू असा विश्वास सुद्धा मिळाला.

आजही अनेक जणी आपल्या मागच्या पिढीकडून मिळालेला हा रांगोळी कलेचा समृद्ध असा हा वारसा पुढे चालवीत आहेत.

आज आहे सोबत एक छोटी सात पासून चार पर्यंत बिंदू काढून रेखलेली साधी सोपी रांगोळी. थोडी ठिपक्यात बांधलेली तरी मुक्तहस्त वाटणारी म्हणजे तुमच्या माझ्या आयुष्यासारखीच. आपल्या साऱ्या मर्यादा सांभाळून राहाणारी आणि त्यातूनच मुक्तमनाने हसणारी !!!!!!



दिनांक शनिवार १८ फेब्रुवारी दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## हस्त लाघव

चौदा विद्या आणि चौसष्ट कला असे आपण नेहमी वाचतो ऐकतो. त्या चौसष्ट कला मधील सहावा कलाप्रकार **हस्तलाघव** – यात हाताने विणणे, भरतकाम करणे, फुलांच्या माळा गुंफणे, भिंती रंगवणे, मेंदी, आळीता रंगवणे आणि रांगोळी अशा सगळ्या हाताचा वापर करून करावयाच्या कला येतात. पूर्वीपासून आपल्या घरात हे सारे पुढच्या पिढीला आपोआप समजायचे. आणि केवळ नजरेने पाहूनच शिक्षण व्हायचे. काळ बदलला. शेण सडा घालून वर रांगोळी पाहणे आजकाल खेड्यातही दुर्मिळ होत आहे. आधुनिकीकरणाच्या रेट्यात अनेक कला हरवल्या किंवा पुष्कळ दुर्मिळ होत चालल्या.


रांगोळी मात्र यामध्ये स्वत:ला बदलवत काळाला घट्ट धरून पुढे जात राहिली. कधी यातूनच वेगवेगळ्या स्टीकर मधून दारात, उंबरठ्यावर तिने प्रवेश केला. यात सौदर्य, वेळ आणि टिकाऊपणा असा साराच विचार होतो. गृहिणीचा सकाळचा गडबडीचा वेळ महत्वाचा. तरीही सणा समारंभाला दारात, देवापुढे रांगोळीचे बोट नाही असे घर असत नाही. पानाभोवतीची रांगोळी हा तर एक वेगळा मुक्तहस्त प्रकार. पूर्ण पंक्तीला पटापट ओणव्याने राहून रांगोळी काढणे खूप कठीण असते. आजकाल लग्नात तर वर वधूसाठी तयार कुंदनच्या महिरपी ताटाभोवती ठेवून कृत्रिम सजावट केली जाते. लग्नात नवरीच्या कोण्या मामी, मावशी, आत्याने मायेने काढलेल्या त्या साध्या रांगोळीची सर कृत्रिम मोत्याना, रंगीत कागद, कुंदनाना कशी येईल?? पण काळाबरोबर माया जरी बदलली नाही तरी व्यक्त होण्याची साधने बदलली.

याही पुढे कधी फुलांच्या रांगोळ्या, पायघड्या लग्ना समारंभात मिरवू लागल्या. तर कोणी संस्कारभारतीच्या रांगोळ्यासुद्धा अनेक शुभ कार्यात आणि विशेष सार्वजनिक समारंभात सजवून तयार झाल्या. रांगोळीचे रंगीत, सुबक आणि नयनरम्य असे हे रूप खूप प्रसिद्ध आहे. यासाठीचे विशेष वर्ग सुद्धा गेली कित्येक वर्षे भारतभर घेतले गेले. अजूनही चालू आहेत. संस्कारभारतीचे अनेक उपक्रम सातत्याने चालू असतात पण सर्वसाधारणपणे रांगोळी साठी ही संस्था खूप प्रसिद्ध झाली. ही रांगोळी घातली जाते ती पाच बोटांनी आणि आपली नेहमीची पारंपारिक रांगोळी दोन बोटांच्या चिमटीमधून.


आपल्या पारंपारिक रांगोळीचे वैशिष्ट्य म्हणजे यासाठी रांगोळी फार कमी लागते आणि रंग तर दोनच हळदीचा पिवळा आणि पिंजरीचा लाल. आणि रोजचा सराव

असेल तर वेळही थोडासाच पुरतो. पूर्वीच्या घरातही हळद पिंजरीच्या बरोबर रांगोळीची जागा असते. केवळ पांढरी रांगोळी घालू नये असे मोठी घरातील माणसे सांगत. एखाद्या दारात पांढरी रांगोळी छोट्याशा दोन पिवळ्या लाल ठिपके मिरवीत पहिली की मंगल पवित्र असं वाटतच घरात प्रवेश होतो.

येणारा महिना हा माघ भारतीय पंचागानुसार अकरावा महिना. थंडी संपून येणाऱ्या वसंताची हलकीशी चाहूल लागते आहे आणि येणार 'महाशिवरात्र' शंकराची पूजा उपवास इ. या महादेवाची पूजा करताना त्याला आवडणारे बेलाचे पान पाहिजेच. म्हणूनच अगदी सोपी १२ ठिपक्यांनी सुरवात होणारी एक शंकराची पिंड रेखणारी रांगोळी आणि बरोबर सात ठिपके कमी करून एक वर आणीत काढलेली पारंपारिक बिल्वपत्र अर्थात बेलाचे पान!!!!!



7 - 1



बिल्वपत्र

दिनांक शनिवार २५ फेब्रुवारी २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## कोलम- भारतीय संस्कृतीचे प्रतिक

आशय संपन्न प्रतिकांतून भावनांची व विचारांची सौंदर्यपूर्ण अभिव्यक्ती करणे हाच रांगोळीचा प्रधान हेतू असतो. प्रांतोप्रांतीच्या उपलब्ध्तेनुसार रेखाटनासाठी तांदुळाची पिठी, शिरगोळयाचे वा संगमरवराचे चूर्ण, चुन्याची भुकटी, भाताच्या तुसाची जाळून केलेली राख, मीठ, पाने, विविध धान्ये अशी अनेकविध माध्यमे वापरली जातात. गंधरूपात तूलिकांच्या सहाय्याने रेखाटन होत असल्याचेही आढळते. पण रेखाटनासाठी स्थाने मात्र सर्वत्र सारखी. धार्मिक, सांस्कृतिक समारंभ प्रसंगी, शुभकार्य प्रसंगी घरासमोर, अंगणात, उंब-यावर, देवघरासमोर, चौरंग वा पाटाभोवती रांगोळी रेखाटली जाते. पूजापाठ, यज्ञ, अभ्यंगस्नान, औक्षण, नामकरण, भोजन अशा सर्व प्रसंगी सर्वप्रथम रांगोळी काढणे भारतात सर्वत्र प्रचलित आहे.


रांगोळीचे आकृतीप्रधान व वल्लरीप्रधान असे दोन भेद आहेत. आकृतीप्रधान रांगोळीत रेखा, कोन, वर्तुळ प्रमाणबध्द करून रांगोळी काढतात. राजस्थान, महाराष्ट्र, दक्षिण भारत, उत्तर भारत या प्रदेशांत आकृतीप्रधान रांगोळी काढण्याची प्रथा आहे. वल्लरीप्रधान रांगोळीमध्ये फूलपत्ती, वृक्षवल्ली, पशुपक्षी यांना प्राधान्य असते. ही रांगोळी भारताच्या पूर्व भागात प्रचलित आहे. अशी रांगोळी काढण्यात बंगाली स्त्रिया सिध्दहस्त आहेत. ही रांगोळी आकृतीप्रधान रांगोळीपेक्षा अधिक मोहक वाटते. रांगोळी झाली मांगल्याचे प्रतीक, पावित्र्याचे प्रास्ताविक नि प्रसन्नतेची खूण! निषाद, किरात, पारध, भिल्ल, मुंड, कोला, नाग, वारली, चेंचू, ठाकूर आणि कातकरी या आदिवासी जमातींना तर तिने भुरळ पाडलीच, पण सर्व वर्णाच्या व पंथोपंथांच्या अनुयायांनाही तिने आपलेसे केले. मग तिच्या अस्तित्वाला अर्थ आला, तिच्या प्रगटीकरणाला वेगवेगळे धुमारे फुटले आणि तिच्या रुपाला विविध आयाम प्राप्त झाले. वारली लोकांची पेंटिंग म्हणजे एक प्रकारची रांगोळीच असते. आजकाल हे पेंटिंग सातासमुद्रापार पोचले ते त्याच्या अंगभूत पारंपारिक वैशिष्ट्यामुळे. वारली लोक आपले घर भिंती याने सजवीत असत.

लहानपणी तळकोकणात मातीच्या जमिनीवर माती लिंपताना फुटक्या कप बशीच्या पांढऱ्या काचा रुतवून काही वेगळया आकृत्या काढलेल्या आठवतायत. शेणाने

सारवल्यानंतर सुद्धा वर हळूच डोकावणारा तो पांढरा ठिपका दिसत असे. त्यातूनच जमिनीचे सुशोभीकरण करणारी ही प्रथा आजकाल लुप्तच झाली आहे.

अंगणातील रांगोळी अशुभ शक्ती घरात येऊ देत नाही व शुभ शक्तींना घराबाहेर पडण्यास अडथळा आणते अशी समजूत आहे. जमिनीतील मुंग्यांसारख्या कीटकांना तांदुळाच्या पिठाची रांगोळी म्हणजे खाद्यच. त्यातील कण त्या आपल्या बिळात घेऊन जातात. मग या किड्यांचा त्रास आपल्या घरातील ठेवणीतील धान्याला, कपड्यांना होणार नाही असेही पूर्वी मानले जायचे. म्हणजे एका बाजूने कला, प्रथा, आणि त्याचवेळी संरक्षण असे एकाच वेळी जमायचे ते या अगदी साध्या सुध्या रांगोळीतून. तमिळनाडूतील पारंपारिक कोलम मध्ये ठीपक्याभोवती फिरणारी रेघ कुठेही न थांबता परत मुळाकडे जोडली जाते ती अशीच. पाहणाऱ्याला क्षणभर कळतच नाही की याची सुरवात कुठून होते आणि कुठे ती संपते. गोल गोल फिरत या आकृत्या रेखणारी कलाकार ठिपके मोजते केव्हा आणि त्याच्या बाजूने रेघ काढीत सुरेख कोलम तयार करते कधी हे अगम्य गूढ.

रोज नवे कोलम काढणाऱ्या या कलाकार म्हणजे भारतीय संस्कृतीच्या अबोल अशा वाहकच जणू !!!!!!





दिनांक शनिवार ४ मार्च२०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी


## तोल रांगोळीचा

येणाऱ्या पाहुण्याचे स्वागत प्रथम दारातील रांगोळी करते. दारातील रांगोळी म्हणजे कला आणि परंपरा याचे एक सुंदर मिश्रण. घरातील सुख समाधान, सुबत्ता आणि शांती याचा आरसा म्हणजे दारातील/ घरातील, उंबऱ्यावरची रांगोळी. भारतीय संस्कृतीचे एक महत्वाचे प्रतिक. भारतातील प्रत्येक प्रदेशात वेगवेगळ्या स्थानिक नावानी ओळखली जाते पण गाभा एकच. मग ती तामिळनाडू मधली कोलम, राजस्थानातील मदाना, छत्तीसगड मधील चौकपूर्ण, प बंगाल मधील अल्पना, बिहारची अरीपना, उत्तर प्रदेशची चौक पूजन, आंध्राची मुग्गु, किंवा केरळची कोलम गोलम. या साऱ्या रांगोळ्या पिढ्यानपिढ्या भारतीय स्त्रियांनी जपल्या. त्यात काळानुसार आवश्यक ते बदल केले. त्या त्या स्थानिक प्रदेशात सहज उपलब्ध होणारे सामान उदा. भाताची फोलपटे जाळून केलेली राख, तांदुळाचे पीठ, बारीक केलेली वाळू, लाल विटांची पावडर असे वापरले जाते. गोव्यात तर कढीसाठी खोबरे वाटून, रस काढून, शिल्लक राहिलेला चोथा / चव उन्हात सुकवून त्याचाही वापर रांगोळीसाठी करतात. या चवाला रंग देणे आणि त्याची रांगोळी रेखणे पाहायला मिळते. यासाठी हे करणारीचे श्रम, वेळ याची गणती कशी करावी?? आणि त्याचे कौतुक करायला शब्द सुद्धा अपुरे. वेगवेगळ्या रंगांची फुले, पाने, पाकळ्या वापरूनही खूप सुंदर रांगोळी काढतात. आजकाल लग्न, साखरपुडा अशा समारंभाला या रांगोळीने शोभा येते.

नवीन रांगोळी रेखताना रांगोळीचा आकार आणि आपल्याकडील जागा याचा विचार करून आखणी मनाशी करून पहावी लागते. प्रथम ती जागा स्वचछ पुसून कोरडी व्हावी लागते. रांगोळीच्या मध्यभागी एका खडूने किंवा रांगोळीच्या ठिपक्याने हलकेच काढावा. म्हणजे आपल्याला याच्या भोवतीचा आकार नक्की होतो. रांगोळी चौकोनी आयताकृती किंवा गोलाकार असली तरी मध्यभाग निश्चित केला की आपल्याला पुढची आरेखणी करणे सोपे जाते.

दोन ठिपक्यातील अंतर एक सारखे असावे आणि ते केवळ सरावाने जमू शकते. एकसारखे अंतर असण्याने रांगोळीचा आकार, मांडणी सुरेख दिसते. ठिपके काढण्याचे प्रकार सुद्धा वेगळे आहेत. मोजून ठिपक्यांच्या ओळी एकामागे एक असे करीत पूर्ण चौकोन आकार तयार करून मग प्रत्यक्ष ठिपके जोडले जातात. याप्रकारची रांगोळी

मुख्यत: महाराष्ट्रात आढळते. सर्व बाजूनी सारखी दिसते हे तिचे वैशिष्ट्य. ठिपके सारख्या अंतरावर काढले की हिचा तोल जमून जातो. सोबतची नऊ आणि नऊ ठिपके काढून घातलेली ही रांगोळी सहज काढता येते. शेवटी ठिपके आणि संबध कसे समांतर ठेवायचे आणि कधी जोडायचे हे एकदा नक्की झाले की आयुष्याचा तोल रांगोळी सारखाच जमून जातो हे अगदी खरे!!!!!! सोबतची रांगोळी दिसते मुक्तहस्त पण आहे ठिपक्यांची. ९-९ अगदी सोपी.



दिनांक शनिवार ११ मार्च २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रंग होळीचे –उल्हासाचे

रंगांच्या सहाय्याने रेखाटलेल्या ओळींपासून तयार झालेली आकृती म्हणजे रांगोळी. कधी रेषा, कधी ठिपके यातून जन्म घेते ती रांगोळी. प्रत्येक दिवसाला आणि प्रत्येक सणाला वेगवेगळया आकाराची रांगोळी काढण्याची प्रथा पूर्वीपासूनच चालत आहे. सुमारे एक हजार वर्षापूर्वी वात्सायनाने लिहिलेल्या कामसूत्र या ग्रंथामध्ये स्त्रियांना अवगत असाव्या अशा चौसष्ट कलामध्ये रांगोळी या कलेचा समावेश होतो. रांगोळीचा उल्लेख रामायण, महाभारत तसेच वेदांसोबत अनेक धार्मिक ग्रंथामध्ये आढळतो.

शेणाने सारवलेल्या किंवा गेरूने अंगण रंगवून त्यानंतर रेखलेली रांगोळी म्हणजे एक कलेचा नेत्रसुखद आविष्कार. आणि ही रांगोळी दुसऱ्या दिवशी वेगळी असते. प्रत्येक दिवशी वेगळ्या आकारात, काढणाऱ्या गृहिणीला जणू कलेची देवता म्हणावी लागेल. भरतकाम, रंगकाम, विणकाम यासारख्या हस्तकला टिकावू असतात. त्यामुळे त्या कलाकाराचे नाव आणि काम कित्येक वर्षे पाहता येते. पण रांगोळी मात्र एक किंवा दोन दिवसांची राणी. अत्यंत कमी आयु:मान असले तरी रांगोळीचा मान मात्र मोठा. कोणत्याही शुभ कार्यात, पूजा, धार्मिक कार्यात, रांगोळीचे बोट ओढल्याशिवाय आपले गुरुजी सामुग्रीची मांडामांड करीत नाहीत. साधारणतः स्वस्तिक, गोपद्म, शंख, चक्र, गदा, कमळाचे फुल, बिल्वपत्र, लक्ष्मीची पाऊले, श्री, श्रीराम इ मांगल्यसूचित रांगोळी अशा ठिकाणी रेखून मगच गणेश पूजनाला सुरवात होते. केवळ पांढरी रांगोळी काढणे किंवा सारवलेल्या जमिनीवर रांगोळी न काढणे अशुभ मानले जाते. केवळ रांगोळीच्या काही ठिपक्यानी किंवा रेघानी ती जागा आणि परिसर पवित्र, मंगलमयी होतो. कोणत्याही मंगलकार्यात जसे आम्रपल्लव, म्हणजे आंब्याचा टाळ हवा तशी दारात आणि घरात रांगोळी हवीच.

पारंपारिक रांगोळीत रंगांचा वापर खूप कमी. कारण रोज काही एवढा वेळ त्यासाठी देणे गृहिणीला शक्य नाही. केवळ पांढऱ्या रांगोळीला हळद पिंजरीच्या दोन ठिपक्यांनी सुंदर बनविणे हे तिला सहज जमते. प्रत्येक सणाचे वेगळे वैशिष्ट्य आहे पूजा, व्रत, गीते, आरत्या यातून ते समजते. पण श्रावण महिना, गणेश चतुर्थी, आणि मुख्य म्हणजे दिवाळी आणि होळीला मात्र रंगीत रांगोळीला पर्याय नाही. शेवटी उत्साहाने, दिमाखाने सण साजरे करणार तर रंगांची जवळीक हवीच.

होळी म्हणजे डोळयासमोर येतो तो सगळ्या रंगांचा उत्सव, उत्साह आणि अर्थातच प्रचंड धामधूम. पूर्ण भारतात एवढेच नाही तर नेपाळ या देशातही होळी हा सण साजरा होतो. गोव्यात तर प्रत्येक मंदिरात देवसुद्धा गुलाली होवून भक्तांच्या आनंदात सामील होतात. येणाऱ्या वसंताची, बदललेल्या, सजलेल्या सृष्टीची ही रंगीत जाणीव आपल्याला होळीच्या सणाला रांगोळीतून सुद्धा दाखवता येईल. मग त्यासाठी रांगोळीचे रंग वापरून पहायचे की प्रत्यक्ष निसर्ग निर्मित फुलांचे आणि फुल पाकळयांचे सहाय्य घ्यायचे ते आपणच ठरवावे लागेल नाही का ??? कोणत्याही मार्गाने आपली होळी आणि मन रंगून जायला हवे !!!!!! सोबत आहे रंगांची आणि फुलांची रांगोळी.




ikolam.com
vijaysowmya

दिनांक शनिवार १८ मार्च २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## बंगाली रांगोळी – अल्पना

अल्पना हे नाव मूळ संस्कृत शब्द अलिम्पना म्हणजे रंगीत आकृती किवा आच्छादन. अल्पना पेंटिंग, रांगोळी बंगालमध्ये खूप प्रसिद्ध आहेत. आणि बेंगाली भाषेत त्याला अल्पोना असे म्हणतात.

जमिनीवर किंवा भिंतीवर एखाद्या महत्वाच्या प्रसंगी म्हणजे पूजा, लग्न किंवा सार्वजनिक प्रसंगी ही अल्पना म्हणजेच रंगीत अशी आकृती काढतात. या रांगोळीला एक विशिष्ठ असे धार्मिक महत्व असते. पारंपारिक अल्पना पांढऱ्या रंगाची असते. हा रंग म्हणजे तांदूळ पीठ आणि पाणी मिसळून तयार केलेली खळ असते. अलीकडे काहीवेळा वेगळा पदार्थ वापरला जातो. त्याचप्रमाणे नवे रंग त्यात चिकटपानासाठी काहीतरी मिसळून तयार झालेली खळ वापरल्यास काढलेली रांगोळी खूप दिवस टिकून राहते. सामान्यपणे पांढऱ्या रंगात हिरवा, लाल रंगही वापरतात. हिरवा रंग झाडाच्या पानापासून आणि लाल रंग पिंजारीपासून तयार केले जात असत. इतर रांगोळ्याप्रमाणे हा कला प्रकार सुद्धा महिलाच रेखतात. निसर्ग कायम आपले रूप बदलत असतो आणि या बदलाला सजगपणे न्याहाळत आणि आपल्यातील कलेला वाव देत अल्पना काढल्या जातात.

सर्वसाधारणपणे गोल आकाराची अल्पना म्हणजे बंगालातील उत्सवी वातावरणाचे प्रतिक. मग हा उत्सव कधी सरस्वती पूजा (वसंत पंचमी), दुर्गा पूजा, किंवा दिव्यांचा सण दिवाळी असा असतो. यात सूर्य, स्वस्तिक, भाताचे रोप, घुबड, लक्ष्मीची पाऊले, मासा, कमळ, नागफणी असे विविध आकार रेखले जातात. काही वेळा वेगळी मुक्तहस्त रांगोळी सुद्धा काढली जाते. कुशल कलाकारच ही रांगोळी एका दमात काढू शकते, कारण ही खूप कठीण असते. या आकृतीने देवाचे किंवा अथितीचे स्वागत केले जाते असे मानतात. म्हणूनच कोणत्याही शुभ प्रसंगी दाराबाहेर अल्पना काढली जाते.


व्रत वैकल्य यासारखे धार्मिक समारंभात अल्पना अत्यंत आवश्यक असते. सुबत्तेची देवी लक्ष्मी हीची प्रतीकात्मक रांगोळी काढताना इथे तिचे वाहन घुबड हेसुद्धा बरोबर असते. भारतात इतर ठिकाणी अपवित्र किंवा अशुभ मानले जाणारे घुबड इथे रांगोळीत येते हे पाहून आश्चर्य वाटते. रांगोळी म्हणजे सात्विकता, मांगल्य. यात घुबडाचे प्रतिक येते हे अल्पनाचे जाणवण्याजोगे वेगळेपण, पण लक्ष्मी सारख्या संपत्तीच्या सुबत्तेच्या देवतेबरोबर हे त्याचे वाहन सुद्धा पवित्र होत असावे.

काही वेळा भौमितिक आकृत्याही यात काढल्या जातात. बऱ्याच वेळा ही रांगोळी अगदी न ठरविता न रेखता वेगळ्या रीतीने काढली जाते. हे त्या कलाकार महिलेचे आणि परंपरेचे वैशिष्ट्य. अल्पना ही एक लोककला मानली जाते. पिक पेरणीपासून ते कापणीपर्यंत सगळ्या शेतीतील क्रिया या रांगोळीत दाखवतात. त्यामुळे इथे कणीस, रुजलेले रोप, घरगुती वस्तू, आणि या सर्वांबरोबर येतात ती लक्ष्मीची पाऊले, सुबत्तेचे प्रतिक म्हणून.

अल्पनेत तळ्यातील मासा, डोक्यावर टोपली घेऊन चालणारी एक म्हातारा आणि म्हातारी, गायीसारखे पाळीव प्राणी, दिवा, मेणबत्ती, फुले अशा अनेक गोष्टी रंगवल्या रेखल्या जातात. काही वेळा पौराणिक कथेतील काही कथा किंवा असेच प्रसंग सुद्धा अल्पनेत दाखविले जातात.



पूर्वीच्या स्त्रिया तांदूळ आठ ते दहा तास भिजत ठेवून त्यानंतर ते बारीक वाटून त्या वाटणात एखादा कपड्याचा तुकडा घेऊन त्यापासून ही रांगोळी काढीत. पुढे ब्रश आले. पण वेळ, कष्ट, आणि कौशल्य तेवढेच. अलीकडे वेळ आणि जागा याच्या कमतरतेमुळे प्लास्टिक स्टिकरने अनेकवेळा अल्पनेची जागा घेतली. पण आजही ही कला पुन्हा नव्या पिढीत रुजावी फुलावी आणि टिकावी म्हणून पुष्कळ संस्था आणि कलाकार प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे या पुढे नक्की या कलेला चांगले भविष्य दिसत आहे.



दिनांक शनिवार २५ मार्च२०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## चैत्रांगण – सजते रांगोळीने अंगण – भाग १

**चैत्रांगण** –म्हणजे तीस अधिक तीन दिवस म्हणजे तेहतीस दिवस चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून ते वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय तृतीया) या दिवसात अंगण सजवायचे असते ते या पारंपारिक रांगोळीने. तेहतीस दिवस ही रांगोळी काढायची आणि यात तेहतीस आकृत्या ही काढल्या जातात. या आकृत्या प्रांतानुसार आणि कलाकाराप्रमाणे बदलतात. परंतु यात वैष्णव आणि शैव या दोन्ही पंथातील चिन्हाचा वापर होतो. गौरी माहेरपणासाठी आपल्या घरी आली आहे असे समजून ती आनंदात रहावी यासाठी ही घराची सजावट करावी अशी प्रथा आहे. सांस्कृतिक, धार्मिक प्रतीके चिन्हातून मांडली जातात. डमरू, बासरी, तबला, शंख यासारखी वाद्य, त्रिशूल, चक्र यासारखी शस्त्र, आणि स्वस्तिक, कासव, कमळ अशी शुभचिन्हे यात रांगोळीतून दाखविली जातात. त्याचबरोबर तुळशी वृंदावन, कलश, हळद कुंकू अशी सौभाग्य प्रतीके सुद्धा यात रेखली जातात. साधारणपणे चौरस किंवा आयताकृती आकारात ही रांगोळी काढली जाते. पण एका सरळ रेषेत सुद्धा यातील कित्येक प्रतीके काढण्याची पद्धत काही भागात आढळते. हत्ती, गाय यासारखे प्राणी, गरुड पक्षी, सापासारखे सरपटणारे जीव आणि अर्थातच नारळ, केळी अशी शुभ फळे, आरसा कंगवा अशी गरजेच्या वस्तू या रांगोळीत येतात. गुढी, ध्वज, अशी धर्म प्रतीके आणि आंब्याच्या पानांची शुभ सूचक तोरणांची महिरप असे एकंदरीतच मांगल्यसूचक वातावरण या रांगोळीतून प्रतीत होते. ही प्रतीके काही वेळा ठिपक्याची तर कधी मुक्तहस्त असू शकतात. हे केवळ रेखाणाऱ्या किंवा खर तर रेखाणारीच्या कलेचा मुक्त आविष्कार असतो.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक, वर्ष प्रतिपदा अर्थात, गुढीपाडवा. सर्व ऋतूतील श्रेष्ठ असा वसंत ऋतू कारण या दिवसात सृष्टीचे रूप अमुलाग्र बदलते. वृक्ष तांबूस पोपटी पालवी मिरवू लागतात. वातावरणात उत्साह असतो. एक अनोखीच नवनिर्मितीची, सृजनत्वाची चाहूल लागते. आंब्या फणसाचे, काजूचे, चारा चुन्नाचे, करवंद जांभळाचे दिवस येणार असतात. परीक्षा चालू असतात आणि त्यानंतर येणाऱ्या सुट्टीच्या आठवणीने मुलाबरोबर पालकही सुखावत असतात.

मागच्या पिढीतील महिला सूर्योदयापूर्वी उठून आपले अंगण झाडून आणि शेणाने सारवून स्वच्छ करीत. या जमिनीवर एक चौकोन आखून त्यात हिंदू संस्कृतीची प्रतीके, रांगोळीतून काढली जात. काही घरात चैत्र शुद्ध तृतीयेपासून वैशाख तृतीयेपर्यंत म्हणजे अक्षय तृतीये पर्यंत चैत्रांगण रेखले जाते तर काहिंच्याकडे चैत्र प्रतिपदेपासून ते चैत्र

अमावस्ये पर्यंत ही रांगोळी अंगणात असते. या रांगोळीचे वैशिष्ट्य म्हणजे यात फक्त पांढरी रांगोळी वापरली जाते. आणि मग कोठेतरी फक्त नावपुरती हळद पिंजरीची चिमुट. कारण केवळ पांढरा रंग हा अशुभ आणि खर तर रांगोळीशिवायचे अंगण, प्रवेशद्वार हेही काही तरी कमी असल्याचे लक्षण. तरीही केवळ हळदीच्या पिवळया आणि लाल पिंजरीच्या ठिपक्यांनी ही रांगोळी नटते, सजते.

**'चैत्रांगण'** रांगोळीतील ही अनेक शुभ चिन्हे, प्रतीके आणि त्यांचा अर्थ अगदी थोडक्यात सांगायचा हा प्रयत्न

**गुढी** –--------दुष्ट प्रवृत्तीवर राक्षसी वृत्तीवर मिळवलेला विजय, आनंद व्यक्त होतो

**ध्वज** –-------आपल्या धर्माची शान सन्मानाचे प्रतिक

**शंख** –-------भगवान विष्णूच्या हातात शंख असतो. युद्धात शत्रूशी सामना करायच्या वेळी ललकारी देण्यासाठी शंख वाजवला जात असे.

**चक्र** –------ सुदर्शन चक्र हे विष्णूचे शस्त्र

**गोपद्मे** – -----गायीची पावले ज्यामध्ये प्रत्यक्ष लक्ष्मी राहते. लक्ष्मी वसते गोपद्मे ! असे मानतात.

**स्वस्तिक** –---सू-अस्ति म्हणजे चांगले होवो. एक खूप महत्वाचे शुभ चिन्ह.

ॐ –-------गजाननाचे आणि ब्रह्मदेवाचे प्रतिक विश्वाची उत्पत्ती ओमकारातून झाली असे मानतात.

**श्री** –----------श्री म्हणजे समृद्धी शुभाची सुरवात, श्री हे अक्षर प्रत्यक्ष लक्ष्मी रूप समजतात.

**लक्ष्मीची पावले** –आपल्या पावलांनी लक्ष्मीरुपी सुबत्ता आपल्या घरी येते. म्हणून उंबरठ्यावर ही रेखतात.

**कोयरी** –------कलात्मकतेचे, रेखीवतेचे तसेच वसंत ऋतूतील आंब्याचे प्रतिक


**नारळ** –-------श्रीफळ गणपती, किवा देवाचे स्वरूप,

**सरस्वती**—---म्हणजे विद्यादेवता

**बिल्वपत्र** –---तीन पानांचे बिल्वपत्र शंकराला वाहतात. रांगोळीतील सौंदर्याचे आणि या औषधी वनस्पती चे महत्व समजण्यासाठी.

राहिलेल्या चिन्हांचे अर्थ पुढच्या भागात येतील.

या गुढी पाडव्याला या शुभ चिन्हातील काही चिन्हे रेखून आपले घर, अंगण हसरे, आणि बोलके करून बघायला काय हरकत आहे???


चैत्रांगण रांगोळी
॥श्री राम प्रसन्न॥

दिनांक शनिवार १ एप्रिल २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## चैत्रांगण – सजते रांगोळीने अंगण – भाग २

चैत्र गौर म्हणजे उमा, पार्वती, धरणीमाता, तिच्या आगमनाने वातावरण चैतन्यदायी, सुखदायी होते. आणि माहेरपणाला आलेल्या लेकीसारखे तिचे स्वागत, सन्मान करतात. म्हणूनच या रांगोळीत अनेक शुभ चिन्हे रेखली जातात. काही मंदिरातून घरातून पाडवा ते रामनवमी असे नवरात्र म्हणजे चैत्री नवरात्र पुजतात. राम जन्माचा सोहळा आणि राममूर्तीचेही पूजन होते आणि रामनवमीला याचे विसर्जन होते. चैत्रांगणातील पाळणा हा रामाचा मानला जातो. आणि जन्म झाल्यावर सुंठवडा वाटतात. ज्याची चव अगदी वर्षभर जिभेवर रेंगाळते. चैत्रांगण रांगोळीतील काही प्रतीकांचे अर्थ आपण मागच्या भागात पहिले. आता पाहूया राहिलेल्या प्रतीकांचे अर्थ -

**कासव** –------ विष्णूच्या दहा अवतारातील हा दुसरा अवतार. धिम्या गतीने पण प्रगतीकडे वाटचाल करावी. प्रत्येक मंदिरात कासवाची प्रतिमा असतेच.

**नाभिकमळ**—--विश्वाच्या उत्पत्तीचे रहस्य. भगवान विष्णूच्या नाभीतून ब्रह्मकमळ उगवले व त्यात ब्रह्मा विराजमान झाले. त्यांनीच सृष्टीची निर्मिती केली.

**ज्ञानकमळ** –----चिखलातील कमळ चिखलापासून जस अलिप्त असत तसेच ज्ञान घेणाऱ्याने पूर्वग्रहदूषित राहू नये. शुद्ध मानाने ज्ञान घ्यावे.

**चक्रव्यूह** – महाभारतातील द्रोणाचार्यांनी केलेली सैन्याची रचना. अभिमन्यू आत शिरला पण बाहेर

पडायचे ज्ञान नसल्याने फसला

**परशु** –--------भगवान शंकरांचे तसेच गणपतीचेही अस्त्र

**गदा**—--------दुष्ट प्रवृत्तीचा समूळ नाश करू शकणारी गदा हे हनुमंताचे व भीमाचे शस्त्र.

**त्रिशूळ**--------त्रिशूळ हे शंकराचे शस्त्र. आदिमायेनेही दानवाचा वध केला तो त्रिशूळ घेऊन. दानवी प्रवृत्तीला भय वाटणारे हे प्रतिक

**हत्ती** –---------ऐरावत हे इंद्रदेवाचे वाहन अंबारीसह हत्ती म्हणजे समृद्धी ऐश्वर्याचे प्रतिक

**सूर्य चंद्र तारे** –---हे ग्रह तारे पृथ्वीचे पोषक, संरक्षक मानतात. पृथ्वीचे जीवन सूर्यप्रकाशावर अवलंबून असते.

**डमरू** – ------ -सांब सदाशिवाचे वाद्य, ज्याच्या आवाजाने दुष्ट प्रवृत्ती दूर होतात.

**तबला डग्गा** –-- गायन भजन किर्तनातील साथी वाद्य. गौरीच्या पूजनासाठी, रंजनासाठी हे प्रतिक आहे.

**बासरी व मोरपीस** – गोपालकृष्णाचे प्रतिक. मोर हा सरस्वतीचे वाहन म्हणूनही महत्वाचा. बासरीला काहीजण राधेचेही प्रतिक मानतात.

**गाय वासरू** – आपली कृषिप्रधान संस्कृती म्हणूनच गाय आणि. गाय म्हणजे देवता, आणि बरोबर तिचे तिचे वासरू महत्वाचे.

**पाळणा**— हा पाळणा काही वेळा रामाचा तर काही ठिकाणी चैत्रगौरीचा मानला जातो. घरात पाळणा असणे आणि पाळण्यात बाळ म्हणजे घराचे घरपण.

**तुळशी वृंदावन** – हिंदू संस्कृतीचा मानबिंदू. मांगल्य, शुचिता म्हणजे दारातील तुळस. श्रीकृष्णाला प्रिय तुळस.

**पिंडी** –----------ही शंकराची पिंड जिच्यावर पाण्याची संततधार असते त्याचबरोबर नागाची वेटोळी, म्हणजे सदैव शांत राहा पण कोणी डिवचले तर मात्र सोडू नये.

**नागफणी** – --- नागाला देवता मानणारी आपली संस्कृती म्हणून नागाची जोडी या रांगोळीतही येते.

**धनुष्य बाण**— स्वसंरक्षणासाठी आणि युद्धात प्रतिपक्षावर वापरण्याचे शस्त्र.

**खण** –----------चैत्रगौर म्हणजे माहेरपणाला आलेली लेक म्हणून खणा नारळाने तिची ओटी भरतात त्याचे एक प्रतिक

**हळद पिंजर करंडे** –हळदी कुंकू म्हणजे सौभाग्यलेणे

**कलश**—--------मांगल्याचे, शाश्वततेचे प्रतिक. आणि पाण्याने भरलेला कलश म्हणजे जीवन. पुढे येणाऱ्या कडकडीत उन्हात पाणी महत्वाचे.

**कमळ** –-------- हे एक लक्ष्मी आणि सुंदरतेचे प्रतिक

**समई**-----------देवघरातून, देवळाच्या गाभाऱ्यात पेटणारी मंद समई म्हणजे सात्विकता आणि सोज्वळता. आजही लग्न झाल्यावर आई लेकीला समई देते आईसम ती समई.

**पणती----------**एक छोटीशी पणती, उजेडाचे प्रकाशाचे प्रतिक आपल्या आगमनाने अंधार दूर करण्याचे सामर्थ्य एवढ्याशा पणतीत असते.

पूर्वी लिहिल्याप्रमाणे या रांगोळीतील प्रतीके प्रांतानुसार, स्थनिक रीतीरिवाजानुसार बदलतात. तसेच त्यातील प्रतीकांचे स्थान आणि रेखण्याची पद्धतही वेगवेगळी असू शकते. आणि त्यात काही अधिक वजा सुद्धा असेल. पण सर्वसाधारण **चैत्रांगण** म्हणजे वरील साऱ्या शुभचिन्हाचा एकत्र मेळ.

अनेक सणा समारंभात रांगोळी आजही आपले स्थान टिकवून आहे. किलोकिलोंच्या हिशेबात वापरून अनेक ठिकाणी सुंदर सुंदर पायघड्या, मोठे गालिचे दिसतात. पण आपल्या साध्या पारंपारिक रांगोळीची सर मात्र या कोणत्याच प्रकाराला नाही. यासाठी सरावाने वेळसुद्धा कमी लागतो, रांगोळी तर चिमुटभर पुरते. आणि आपल्या दारात अशी रांगोळीची दोन बोटे रेखली तर पूर्ण दिवस अगदी समाधानाचा जातो. साधी ठिपक्यांची रांगोळी कधी ठिपके जोडून तर कधी त्या ठिपक्यापासून काही अंतर ठेवून पण सुरेखशी वेलांटी घेऊन. कुठे न थांबता सलग जोडून. म्हणजे काही वेळा ठिपक्यांना हात धरून जोडत पुढे जावे लागते. पण कधी बाहेरून द्यावा आधार अन स्वातंत्र्य द्यावे ठीपक्याला हसण्याचे, बोलण्याचे अन एकटे राहण्याचे. हळूच बाजूने फिरत पाहावे आपला ठिपका कसा आपले स्वतंत्र अस्तित्व राखतो. मला आपल्या नेहमीच्या जीवनात आणि रांगोळीत खूप साम्य वाटते. आयुष्य रेखताना वाट्याला आलेले काही कडू क्षण, कडवट बोलणे, मनात दुरावा न ठेवता अलगद बाजूला ठेवून आपली रेघ कशी पुढे न्यावी हेही समजावे अन ठरवावे लागते. कधी ठिपके वाढवायचे असतात, तर काही वेळा कमी आणि बऱ्याच वेळा तर सारेच समांतर यावे लागतात. प्रत्येकच रेखाटन आयुष्याचे वेगळे संदर्भ सांगत असते. नात्यांचे, आपुलकीचे, मैत्रीचे बंध बांधत सांधत पुढे जायचे आयुष्याची रांगोळी रेखत हसत.


।। श्री चैत्रगौरी प्र ।।

दिनांक शनिवार ८एप्रिल २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## मुग्गु – आंध्र प्रदेशातील रांगोळी

मुग्गु - मुग्गु हा तेलगु शब्द आहे. जमिनीवर रेखली जाणारी कला असा त्याचा अर्थ मानला जातो. सकाळी घरातील महिला अंगण किंवा दरवाजासमोरचा भाग झाडून पुसून स्वच्छ करते. गायीचे शेण पाण्यात मिसळून तो पातळ शेणाचा सडा अंगणांत घालते. केरसुणीने सर्वत्र पसरविते. त्यानंतर मुग्गुलू रेखला जातो. ग्रामीण भागात हा नेहमीचा कामाचा भाग असतो. शहरी भागात मात्र सणा समारंभाला मुग्गु घालण्यासारखी जागा आणि शेणसडा असल्यास रांगोळीचा हा प्रकार काढला जातो. गायीचे शेण रोगप्रतिबंधक मानले गेले आहे. त्यामुळे उंबरठ्यावर किंवा उंबरठ्याबाहेर घराचे संरक्षण होते असेही मानले जाते. आणि शेणाच्या गडद काळपट हिरव्या रंगावर पांढरी रांगोळी उठून दिसते.

मुग्गुपिंडी म्हणजेच पांढऱ्या रंगाच्या खडूची पावडर, मुग्गु काढण्यासाठी वापरली जाते. ही पावडर पाहिजे तशी रेखणे वेगवेगळे आकार मांडणे तिच्या दाटपणामुळे सहज शक्य असते. सणासाठी मात्र तांदूळ पीठ वापरून मुग्गु काढतात. मुंग्या, आणि इतर अनेक जमिनीवरील किड्यांसाठी मुद्दामहून हे पीठ वापरले जाते.

सर्वसामान्यपणे मुग्गु ही रांगोळी सगळ्याच महिला काढू शकतात. आणि त्यासाठी काही प्रशिक्षण दिले जात नाही. पिढ्यानपिढ्या संक्रमित होत असलेली ही आपल्या देशाची कला परंपरा. भौमितिक आकृत्या, किंवा ठिपके काढून ते जोडून किंवा त्याभोवती वक्राकृती रांगोळी फिरवून ही तयार होते. ठिपके मोजताना त्यातून काही सांख्यिक बेरीज वजाबाकी करून मगच पुढे जावे लागते. आपल्या प्राचीन महिला गणित आणि कला याचा अगदी सुंदर मिलाफ कसा घालीत त्याचे उदाहरण म्हणजे असे हे मुग्गु. या रांगोळीचे साधारणपणे तीन प्रकार मानले जातात.


१. चुक्कला मुग्गुलु (ठिपक्यांची)- एका विशिष्ट रीतीने ठिपके काढले जातात. काही वेळा समांतर तर काही वेळा एक एक कमी करीत जायचे. दोन ठिपके काहीवेळा जोडले जातात. तर काही वेळा ठिपक्याभोवती रेषा किवा महिरपी काढून आकृती काढली जाते.

२. चुक्कला लेणी मुग्गुलू (ठिपक्याशिवायची)-या प्रकारच्या रांगोळीतील रेखाटने ठिपके न मांडता म्हणजे मुक्तहस्त असतात. एखाद्या विशिष्ट सणाचा, धार्मिक प्रतीकाचा वापर यात करतात.

३. तिप्पडू मुग्गुलू. - (वक्राकार)- ठिपके काढून त्यांच्यापासून एखादी विशिष्ट घाटाची आकृती बनवतात. त्याभोवती रेषा, वेलांट्या, असे काढून ती पूर्ण होते. पण यासाठी खूप सरावाची गरज असते.

धार्मिक कार्याचे मुग्गुचे पॅटर्ण हे कठीण आणि खूप मोठे असतात. जत्रा किंवा इतर महत्वाच्या सणाला मंदिरासभोवताली या वेगळ्या मोठ्ठ्या रांगोळ्या काढल्या जातात. आणि ही रांगोळीतील आकृती म्हणजे पूजेचे एक प्रतीकच मानले जाते. अनेक महिला एका वेळी हजारो चौरस मीटर परिघात ही रांगोळी काढतात. अशी रांगोळी अनेक कलाकार एकमेकांना सांभाळून आणि जमवून घेत एकसारख्या आकृत्या काढतात. यात कलेचा कस लागतो आणि खूप सराव असावा लागतो. यामुळे समूहात राहून काम करण्याचाही अनुभव या कलाकारांना मिळतो. समुहाने घातली जाणारी आणखी एक अलीकडची प्रसिद्ध रांगोळी म्हणजे संस्कारभारतीची रांगोळी. विशेष म्हणजे यामध्ये पुरुष आणि स्त्रिया दोघेही प्राविण्य मिळवतात. अलीकडे तर या रांगोळीच्या स्पर्धा घेतल्या जातात. मुग्गु रांगोळीचा १५ ठिपक्या पासून सुरु होणारा एक सोप्पा प्रकार सोबत आहे. रांगोळीचा हा प्रकार एका सकाळी काढून बघायला हरकत नाही !!!!





दिनांक शनिवार १५ एप्रिल २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

# मूर्तिमंत सात्विकता – रांगोळी

माणसाला जगण्यासाठी कोणतीतरी प्रेरणा असावी लागते. मग ती प्रेरणा कधी काम, व्यवसाय, मुले, एखादी संगीत नृत्य यासारखी कला असे. आणि निसर्ग तर आपल्या अनेक रंगातून प्रेरणा देतच असतो. रंग म्हणजे आनंद, चैतन्य. वळवाची सर तप्त भूमीवर आली की आभाळात अवचित येणारे इंद्रधनुष्य म्हणजे निसर्गाचा सप्तरंगी चमत्कार. सध्यातर चैत्रातील पोपट पालवी, बहरलेला सोनबहावा, लालूस पलाश, गुलमोहर यासाऱ्यातून अवघी सृष्टी आपले आपले नवे रूप आणि आश्वासक प्रतिबिंब मिरवीत आहे.


रंगाला ना कोणता धर्म ना जात. रंगाकडे पाहताना मिळते ती केवळ मनाची प्रसन्नता. दररोजचा सूर्योदय रोज वेगळ्या रंगाने रूपाने नटून येतो. असे हे आनंदाचे असंख्य रंग बोटाच्या चिमटीत धरून आणि रेखून आपले जीवन रंगोबेरंगी करण्याचा प्रयत्न ती करीत असते. आणि हे रंग एखाद्या पारंपारिक दोन बोटे ओढणाऱ्या महिलेच्या हाती आले की मग ते रंग जमिनीवर नाचतात बागडतात, आणि जन्माला येते ती "रांगोळी"

रांगोळी याचा शब्दश: अर्थ रंगांच्या ओळी. रंगवली म्हणजे संस्कृतमधील "रंगवेल्ली" चौसष्ट कलेतील हा सहावा कलाप्रकार शिल्प किवा मूर्तीकला आणि चित्रकलेच्या आधीचा मानला जातो. याचा पहिला उल्लेख वात्सायानाच्या 'कामसूत्र' या ग्रंथात आढळतो. हा ग्रंथ इसवी सनाच्या तिसऱ्या शतकातील मानला जातो. या ग्रंथात उल्लेख केल्यामुळे ही कला ग्रंथलेखनापूर्वी समाजात प्रचलित होती हे सहज लक्षात येते. सौदर्य, मांगल्य, सात्विकता, पावित्र्य, या साऱ्याचे प्रतिक म्हणून कोणत्याही शुभ प्रसंगी, धार्मिक कार्यात, आरंभ होतो तो रांगोळी काढूनच.

बिंदू म्हणजे टिंब किंवा ठिपका. टिंब टिंब जोडून बनते ती रेषा, आणि या रेषांच्या वेगवेगळ्या प्रकारातून निर्माण होते ती सुबक रांगोळी. रेषा सरळ, वक्र रेषा, त्रिकोण, चौकोन, वर्तुळ अशा अनेक आकारातून एकमेकाला छेदत- भेदत, बाजूने फिरत, अशा अनेक सहज सोप्या रीतीने रांगोळी रेखले जाणारे हात आणि डोळे तयार असतात. आपल्या शेजारी, नात्यागोत्यात जर एखादी नवीन पण पारंपारिक रांगोळी दिसली आणि ती निरखून मनात साठवल्याशिवाय कोणी भारतीय स्त्री जाऊच शकत नाही. पूर्वी ती रांगोळी लगेच पेन्सिल, पेनने काढून ठेवायला तिची लगबग असे. आता तर आधुनिक

तंत्रामुळे छोट्याशा मोबाईलच्या क्लिक वर ती रांगोळी फोटो काढून ठेवण्याची सोय आहे. आणि तिचा पूर्ण उपयोग ती करतेच.

पूर्वी देवघरात रमणारी रांगोळी अंगणात आली, अंगणातून प्रांगणात आणि आता तर अनेक प्रदर्शनात आणि स्पर्धेत ती पाहायला मिळते. या स्पर्धेमधून या कलाप्रकाराविषयी आवड जरूर निर्माण झाली. अलीकडे पारंपारिक रांगोळीच्यासुद्धा स्पर्धा, कार्यशाळा होतात. यासाठी कार्यशाळा घ्यावी लागणे हे खर तर दुर्दैव. कारण आजवर पिढ्या न पिढ्या चालत आलेली ही आपली परंपरा. आपल्या घरातून ती लुप्त मात्र झाली नाही, होणार नाही. एखाद्या स्टीकर च्या माध्यमातून रोज आणि सणासमारंभाला खऱ्या रेखलेल्या रांगोळीतून ती मिरवीत असते. तिचे घरपण, संस्कृती, सुबत्ता, समाधान दाखविणारे एक सात्विक प्रतिक !!!!!!!! सोबतची रांगोळी अशीच सोपी साधी १३-७ ठिपक्यांची अगदी थोड्या वेळात आणि छोट्या जागेतसुद्धा काढून पहाता येईल !



दिनांक शनिवार २२ एप्रिल २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

# अक्षय कला रांगोळी

रंगांची ओळ म्हणजे रांगोळी. सौंदर्याचा साक्षात्कार आणि मांगल्याची सिद्धी हे रांगोळीचे दोन प्रमुख उद्देश. आपण रांगोळीला मांगल्याचे प्रतिक मानतो अर्थात कोणत्याही मंगल कार्यारंभी येते ती रांगोळी. बिंदू म्हणजे टिंब. टिंब टिंब जोडून होते ती रेषा. या रेषांतून जन्माला येतात अनेकविध आकार. सरळ, वक्र रेषा, त्रिकोन, चौकोन, वर्तुळ, अर्ध वर्तुळ असे करीत एखादा सुंदर आकार तयार होतो.

'घराची कळा अंगण सांगे'या उक्तीत केवढी भावरम्यता सामावली आहे. कळा म्हणजे स्थिती, अवस्था, स्थान, दर्जा, श्रेणी, सौदर्य, . दारासमोर अंगणात, वृंदावनाजवळ हिरव्या काळ्या शेणाच्या किंवा तांबूस रंगाच्या भूमीवर बोटांच्या चिमटीतून उमटलेली एखादी छोटीशी आकृती त्या घरातील स्वच्छता, शुद्धता, प्रसन्नता, आणि पवित्रता सांगून जाते. रेखणारीच्या त्या सुबक चित्रातून गृहलक्ष्मीच्या अंत:करणातील भाव तरल सौदर्याची अनुभूती पाहणाऱ्याच्या मनाचा ठाव घेते.


काही वर्षांपूर्वी रांगोळी प्रतिकातच गुरफटलेली होती. उदा, स्वस्तिक- सातत्य, त्रिदल- त्रिभुवन, कमळ- लक्ष्मी रूप, यातून पुढे सुधारून एक कलात्मक वळण आले. ठिपक्यांना वळण देऊन किंवा मुक्तहस्त रांगोळी प्रचलित झाली. यातच पुढे निसर्ग चित्रे, व्यक्ती चित्रे काढू लागली. नेते, एखादे पौराणिक, ऐतिहासिक पात्र यांची रांगोळी स्पर्धेसाठी पाहायला मिळू लागली.

काहीच दिवसांनी येणारा सण किंवा साडे तीन मुहूर्तांपैकी एक म्हणजे अक्षय तृतीया. वैशाख महिन्यातील तिसरा दिवस. परशुरामांचा वाढ दिवस आणि वेद्व्यासानी याच दिवशी महाभारत लिहायला सुरवात केली. अक्षय म्हणजे कधी कमी न होणारे. या दिवशी मातीची, मातीच्या माठाची पूजा करतात. मातीचा आणि रांगोळीचा खूप जवळचा संबध. मोठ्या शहरात कोपऱ्याकोपऱ्यावर पाणपोई ठेवतात. तप्त उन्हाळ्याला तोंड द्यायला असे सारे तयार असते. आणि या दिवशी दान करावे असेही शास्त्र सांगते.

या दिवशी श्री लक्ष्मीतत्वाची पूजा विष्णूबरोबर करतात. आणि लक्ष्मीचे अक्षय असे आपल्या घरात राहणे, कायमसाठी वास असावा म्हणून वैभव लक्ष्मी सारखी अनेक व्रते पूजाही करतात. म्हणूनच या दिवशी अनेक शुभ कार्याचा आरंभ करतात. आजकाल

केवळ सोने चांदी खरेदीसाठी ओळखला जाणारा हा दिवस एके काळी रांगोळीसाठी दिवाळी एवढाच, कदाचित जास्तच महत्वाचा मानला जाई.

चैत्रगौर माहेरी आलेली असते. माहेरवाशीण आल्याने घर अगदी नटून थटून तयार असते. आपल्या लेकीसारखी अशी गौर म्हणजे पार्वती घरात राहते. देवी पार्वतीला आपली मुलगी मानून तिचे माहेरपण करणारी अशी आपली वेगळी परंपरा, संस्कृती. मग तिच्यासाठी हळदीकुंकू. देवीच्या मुखवट्याला दागिने घालणे, सजविणे आणि तिच्यासमोर मोसमी रानमेवा ठेवणे, अशा अनेक रीतीने हे चैत्रातील हळदीकुंकू साजरे होते. आंब्याची डाळ, आणि फणसाचे गरे चारे, चुन्न, करवंद जांभळे याबरोबर पन्हे असा साधा पण वर्षभर आठवणीने जिभेला पाणी आणणारा मेनू. अशा वेळी दारातील रांगोळी सुद्धा खूप बोलकी असते. काही वेळा चैत्रांगण तर काही ठिकाणी कलश, कमळ, लक्ष्मी त्याचप्रमाणे लक्ष्मीची प्रतिके असे विविध आकार पाहायला मिळतात. आजची रांगोळी अशीच लक्ष्मीच्या प्रतीकाची !!! अक्षय तृतीयेला नक्की घालावी अशी!



दिनांक शनिवार २९ एप्रिल २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## कमळ रांगोळीतील --ज्ञानकमळ, स्वस्तिक कमळ

रांगोळीतून दाखवले जाणारे एक शुभ चिन्ह म्हणजे कमळ. कमळ विष्णूच्या हातातील म्हणून तर काही वेळा लक्ष्मी कमळात उभी असते म्हणून, तर कधी गजांतलक्ष्मी दोन हत्तीमध्ये पण कमळात उभी असते यासाठी शुभ मानले जाते. मंगेशीला पांढरी शुभ्र कमळे (साळक) मंगेशाला वाहायची रीत आहे. जवळपासच्या भागातून मिळणारी आणि मंदिराबाहेर विकायला, पांढऱ्या पाकळयांना तळाकडे किंचित गुलाबी झाक असणारी कमळे म्हणजे निसर्गाचा चमत्कार. अशी ही साळके, कमळे पाहिल्यावर मंगेश प्रसन्न झालाच पाहिजे. पाण्यात विशेषत: चिखलात उगवून उमलून त्याच्या पाकळयांना कधीच चिखलाचा स्पर्शसुद्धा होत नाही. चिखलातही राहून आपली शुद्धता जपणारे कमळ हा एक सांकेतिक अर्थ सुद्धा मानला जातो. एखाद्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राहून आपली तत्वे, सात्विकता कशी जपावी यासाठी कमळाचे उदाहरण दिले जाते. म्हणून एक पावित्र्याचे, दैवत्वाचे प्रतिक म्हणून कमळ असे मानतात.. असेही म्हटले जाते की रात्री कमळाच्या पाकळया मिटतात आणि एखादा भुंगा जर मधाच्या आशेने रेंगाळला तर तो सकाळपर्यंत कमळाच्या पाकळयात बंदी होतो. नाजूक अशा पाकळया तो भ्रमर पोखरू, तोडू शकत नाही एवढ्या कडक होतात. सकाळी सूर्य उगवला की कमळ पुन्हा फुलते आणि मग त्याची सुटका होते. म्हणून एखाद्या मोहापोटी आजूबाजूच्या वातावरणाचे भान ठेवले नाही की या भ्रमरासारखी अवस्था होते.

अशा 'लोण्याहून मऊ तरीही वज्राहून कठोर' कमळाचे रांगोळीत अगदी अव्वल स्थान आहे. कमळाचे चित्र अनेक तऱ्हेने काढतात. देवपूजेत तर कमळा एवढा मन क्वचितच कोणा फुलाला मिळाला असेल. कधी ठिपक्यातून तर कधी मुक्तहस्त. कधी कमळाला स्वस्तिकासारख्या आणखी एका शुभ चिन्हात गुंफून स्वस्तिक कमळ, नाभीकमळ, अशा आकृत्या तर कधी ज्ञानकमळ अशा वेगळ्या आकृत्या सरावाने काहीजणी सहज काढतात. या आपल्या पारंपारिक रांगोळीतील हे प्रकार सहज सोपे आहेत. त्याच बरोबर त्यामागे आपल्या प्रथेची, संस्कृतीची समज अन जाणीव सुद्धा आहे. कमळ हे लक्ष्मीस्वरूप समजतात. आपल्या घरात लक्ष्मी यावी आणि नांदती रहावी म्हणून कोणत्याही रूपातील कमळ अंगणात, दारात, देवघरात काढावे. चैत्रांगणात कमळ असतेच. शिवाय एखाद्या मंगल प्रसंगी रेखलेल्या रांगोळीत स्वस्तिक, गोपद्म, लक्ष्मीची


पावले आणि कमळ असतेच. रांगोळीतील कमळ रंगवता आले तर खूपच छान पण काळ्या किंवा तपकिरी फरशीवर पांढऱ्या रांगोळीतसुद्धा उठून दिसते.

खूप वर्षांपूर्वी कोकण रेल्वे नविनच सुरु झाली होती. आणि मडगाव ते सावंतवाडी या मार्गावरून जाताना एका तळ्यात किंवा पाणथळ जागेत पांढरी, लाल आणि निळी कमळे पहिली होती. बहुदा ते करमळीचे तळे असावे. वरून झुकझुक गाडीतून खाली ते स्वर्गीय दृश्य पहिले होते. अजूनही कमळ म्हणताच डोळ्यासमोर तीच खिडकीतून खाली तळ्यात पाहिलेली कमळे दिसतात. त्यानंतर पुष्कळ वेळा त्याच मार्गावर जाताना हा पूर्ण मार्ग डोकावून निरखून पहिला. पण त्या कमळांच परत दर्शन झालेच नाही. छोटी मुले आगगाडीत मजेत, माहेरी आईकडे जायची परंपरागत ओढ, कदाचित सुट्टीचा आनंद यामुळे ती कमळे खरच होती का भास काहीच आठवत नाही. पण मडगाव ते सावंतवाडी पुढे मुंबई हा रेल्वेचा मार्ग आणि कोकण गाडी मात्र त्या दिवसापासून कायमच मर्मबंधातील ठेव झाला हे खर. आजही कमळाचे नाव घेताच डोळ्यासमोर येतायत तीच पांढरी, निळी, गुलसर कमळे !!!!!!!आपल्याही मनात अशीच काही कमळे किंवा सुगंधी आठवणी येण्यासाठी सोबत काही कमळांच्या सोप्या आकृत्या देत आहे. बघाल ना रेखाटून ??

\



ज्ञानकमळ



स्वस्तिक कमळ

दिनांक शनिवार ६ मे २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळीतील कमळ – नाभीकमळ, ठिपक्यांचे कमळ

आता घराघरातून रांगोळी दिसण लोप पावत चाललंय, काय करणार, हल्ली लेकी बाळीना रांगोळी काढता येत नाही. पुरेसा वेळ तर नसतोच. केरळ सारख्या राज्यात नृत्य, रांगोळी मुलीना आलंच पाहिजे असा आग्रह असतो असे म्हणतात. तसं खरचं व्हायला हवं, नाहीतर मुली या आपल्या परंपरा पुढे कशा नेणार असा प्रश्न पडतो. वेळ वाचवण्यासाठी रंगीबेरंगी प्लास्टिक स्टीकर चिकटवायचे. पण शेवटी या कृत्रिम दिखाव्याला रेखलेल्या गारगोटीच्या रांगोळीची मजा नाही हे नक्की! वेळ नाही हे कारण मलाही मान्य आहे कारण मी स्वत: ते रोज अनुभवते. पण तरीही जेव्हा थोडासा वेळ जमेल तेव्हा मी छोटीशी का होईना रांगोळी नक्की काढते. खूप छान वाटतं, आनंद मिळतो इतकंच नाही तर मनावरचा ताण, stress कमी होतो हा माझा अनुभव आहे.

कमळासारख्या सुंदर फुलाची रांगोळी काढणे म्हणजे प्रफुल्लीत आणि उत्साहित होणे.


कृष्णाचे डोळे कमळाच्या पाकळीच्याआकारासारखे असल्याने त्याला 'कमलनयन' असे नाव पडले. भगवानश्रीकृष्णानेही गीतेमध्ये कमळाला आदर्श मानून तसे जीवन जगण्याचा उपदेश केला आहे. "अनासक्तीचा आदर्श"म्हणजे कमळ. कमळाचे पान पाण्यात असूनही पाण्याचा एक थेंबही स्वतःला लागू देत नाही.

आपल्या देशात कमळाचे दोन प्रकार- २४ पाकळयांचं कमळ आणि १०८ पाकळयांचं कमळ मिळतं, तर कमळलीलीच्या म्हणजेच कमळ कुमुदिनीच्या तीन जाती आहेत. कमळलीलीच्या काही जाती या दिवसा फुलणाऱ्या, तर काही रात्री फुलणाऱ्या आहेत. दिवसा फुलणाऱ्या कमळलीलींना सूर्यमुखी, तर रात्री फुलणाऱ्या कमळलीलींना चंद्रमुखी म्हणतात. अशा कमळाची रांगोळी घरात रेखणे म्हणजे सुख सुबत्ता समाधान यांना निमंत्रण देणे. लक्ष्मीचे प्रतिक मानले असल्यामुळे देवीची पूजा करताना किंवा देवीचा वार शुक्रवार, या दिवशी रांगोळीतून कमळाची आकृती काढण्याची पद्धत आहे. वर पाहिल्याप्रमाणे खऱ्या सजीव कमळासारखे रांगोळीतही कमळ अनेक पाकळयांचे काढतात. त्याचप्रमाणे रंग वापरून सजवतात. तरीही अनेक वेळा कमळ अगदी कमी वेळात ठिपके घालून सुरेखपणे केवळ पांढऱ्या रांगोळीने काढतात. असेच एका जुन्या घरात

पाहिलेले कमळ केवळ सात ठिपक्यामध्ये फक्त पांढऱ्या रंगात सुबकपणे देवाच्या खोलीत हसत होते. आपल्यासाठी हा सोपा प्रकार सोबत दिला आहे.

कमळ हे विजयाचे, ऐश्वर्याचे व सुख-समृद्धीचे प्रतीक म्हणून हिंदू स्थापत्यकलेत वापरले गेले आहे. कोल्हापूरच्या महालक्ष्मीला कमळ वाहण्याचे खास असे महत्त्व आहे. त्याचप्रमाणे आज काल फुलांच्या पाकळयांची मोठी रांगोळी जी सार्वजनिक ठिकाणी काढली जाते ती सुद्धा कमळाकृती किंवा त्यासम असते. नाभी कमळ म्हणजे बेंबीनाभी भोवतीने गोल षटकोनी, अष्टकोनी अनेक आवर्तनांनी काढलेल्या पाकळया. ही रांगोळी पुष्कळ गुंतागुंतीची पण लक्षवेधी असते. प्रलयजलात बालरुपाने वटपत्रावर शयन करीत असलेल्या विष्णूच्या नाभीतून एक कमळ निर्माण झाले. विष्णूच्या नाभीतून जन्मले ते कमळ म्हणून ते नाभीकमळ असाही काही वेळा समज आहे. ही रांगोळी अगदी छोटी आणि सोपी करून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याचप्रमाणे ठिपक्यानी काढण्याचे कमळाचे अनेक पारंपारिक प्रकार पूर्वीच्या महिलांना माहिती होते. आजकाल हे प्रकार पुस्तकातही बघायला मिळत नाहीत. प्रत्यक्ष




घातलेली रांगोळी पाहणे म्हणजे दुर्मिळच. तरीही खूप लहानपणी पाहिलेले काही ठिपक्यांच्या कमळांचे सोपे प्रकार सोबत देत आहे. आपल्याकडे अलीकडे मिळणारी रांगोळीची पुस्तके म्हणजे बटबटीत आणि खूप रंगीत अशा रांगोळया. आपल्या पारंपारिक, छोट्या, अर्थपूर्ण, आणि सहज रेखता येणाऱ्या रांगोळया कुठे तरी हरवत चालल्यात. त्या जपण्याचा एक छोटासा प्रयत्न.

दिनांक शनिवार १३ मे २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

# फुले स्वस्तिके रांगोळीची

स्वस्तिक हे मानवाने निर्माण केलेले सर्वांत पहिले धर्मप्रतीक मानतात. पाऊस पाडणारा इंद्र, मेघांचे संचालन करणारा वायू, प्रकाश आणि उष्णता देणारा सूर्य, मानवाच्या भल्याबु-या वर्तनावर आणि शुभाशुभ कर्मांवर नजर ठेवणारा वरुण अथवा तत्सम दुसरा कोणी तरी देव, ही भूतदात्री वसुंधरा, अशा अनेक देवतांचा स्वस्तिकात एकत्र समावेश झालेला आहे. ते प्रतीक देवतांची शक्ती आणि मानवाची शुभकामना या दोहोंच्या एकत्र सामर्थ्याचे आहे.

एक उभी रेषा आणि तिच्यावर तेवढ्याच लांबीची दुसरी आडवी रेषा, अशी याची मुळातली आकृती आहे. उभी रेषा ही ज्योतिर्लिंगाची प्रतिनिधी आहे. ज्योतिर्लिंग हे विश्वोत्पत्तीचे मूळ कारण होय. आडवी रेषा ही सृष्टीचा विस्तार दर्शवते. स्वस्तिकाचा संबंध सूर्याशी जोडलेला आहे. स्वस्तिकाच्या फुलीभोवती एक वर्तुळ काढले की ते सूर्याचे प्रतीक बनते. उभ्या फुलीत एक तिरपी फुली काढली, की त्या आकृतीला आठ आरे तयार होतात. त्यांवर त्रिकोणी टोप्या बसवल्या, की अष्टदल कमळ तयार होते. कमळाचा आणि सूर्याचा प्रकाशय आणि प्रकाशक संबंध प्रसिद्ध आहे. सूर्याचे आणि विष्णूचे अभिन्नत्व मानतात. विष्णूमुळे स्वस्तिकाचे विश्वधारकत्व सूचित होते. स्वस्तिकाचा मध्यबिंदू हे विष्णूचे नाभिकमल म्हणजेच सृष्टीकर्त्या ब्रम्हदेवाचे स्थान होय. त्यामुळे स्वस्तिक हे सर्जनात्मक ठरते. फुलीच्या आडव्या रेषेची दोन्ही अग्रे उभी वळवली, की तो त्रिशूल बनतो. त्रिशूल हे शिवाचे आयुध असून तो सृष्टीचा संहारकर्ता आहे. अशा प्रकारे सृष्टी-स्थिती-प्रलय अशा विश्वाच्या तिन्ही अवस्था एकाच स्वस्तिकाच्या भिन्न भिन्न आकृतींनी दिग्दर्शित होतात.


स्वस्तिक हा शब्द सु+अस धातूपासून बनला आहे. सु=शुभ, मंगल व कल्याणप्रद आणि अस=सत्ता, अस्तित्व. स्वस्तिकाच्या चार भूजा म्हणजे ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थानश्रम व संन्यास आश्रम होय. आपल्या समस्त जीवनाच्या प्रगतीचा अर्थ, मांगल्य, वैभव कथन करणाऱ्या स्वस्तिकाला आजच्या काळात पुनश्च रांगोळीद्वारे आपल्या नजरे समोर ठेवू शकतो. जगन्नाथ पुरी येथील भगवानाच्या मंदिराच्या रचनेकडे


लक्षपूर्वक बघितले की लक्षात येते की, याचा अंतर्भाग स्वस्तिकाच्या आकृतीप्रमाणे तयार केलेला आहे. सिंधु संस्कृतीत स्वस्तिकाला फार मान दिल्याचे आढळते. स्वस्तिक हे भारतीय परंपरेत चतुर्विध पुरुषार्थाचेही सूचक मानले आहे. चारही युगांत स्वस्तिक चिन्ह अक्षुण्ण राहते अशी भारतीयांची श्रद्धा आहे.

असे स्वस्तिक शुभ चिन्ह रांगोळीत नित्य नेमे काढावे असे शास्त्र सांगते. हे शुभ चिन्ह निरनिराळ्या प्रकारे काढले जाते. देवघरात, दारात, अंगणात, उंब्रऱ्यावर काढले जाणारे स्वस्तिक म्हणजे घरातील शुभ अस्तित्वाचे, आणि प्रगतीचे प्रतिक.

पूर्वीच्या एका जीवन पाथेयमधे मुलींसाठी एक उपदेश वाचायला मिळाला
'सकाळी मुली काढुनी केरवारे, गृह सारवोनी करी स्वच्छ सारे
फुले स्वस्तिके रांगोळीची लिहावी, अशी की जने कौतुके ती पहावी //

काही सोपी स्वस्तिक रांगोळी चे प्रकार सोबत देत आहे. सहज काढता येतील !!!!!





दिनांक शनिवार २०मे २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## आकर्षक रांगोळी ---सोपी रांगोळी

रांगोळी काढायची तर सर्वप्रथम पुरेसा वेळ हवा आणि त्यानंतर रांगोळी काढण्यासाठी पुरेशी जागा. जागेची अडचण असली तरी छोटय़ाशा जागेत तितकीच आकर्षक रांगोळी काढू शकतो. रांगोळी काढण्यापूर्वी त्याची पूर्वतयारी आवश्यक आहे. रांगोळी नेमकी कशी काढायची आहे याचं रेखाटन को-या कागदावर करून घ्यावे. थेट रंगांचा वापर करत रांगोळी काढणे अवघड वाटत असेल तर खडू जवळ बाळगावा. जेणेकरून खडूने रेखाटन करत त्यावर रांगोळी काढणं सोपं जाईल. सोबत एखादं रांगोळीचं पुस्तक घ्यावं. इंटरनेटवरही रांगोळ्यांचे विविध प्रकार शोधू शकतो. रांगोळी काढताना शक्यतो उठावदार रंगांचा वापर करावा. विरोधी रंगसंगती वापरत काढलेली रांगोळी अधिक उठावदार दिसते. त्या अनुषंगाने बाजारात जाऊन रांगोळी, रांगोळीचे साहित्य विकत घ्यावे. आधी कागदाच्या पुडीत सुटय़ा मिळणा-या रांगोळ्या आता प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये मिळू लागल्या आहेत. प्रत्यक्ष रांगोळी काढताना सर्व साहित्य जवळ ठेवावे. रांगोळी काढताना जमीन खराब होऊ नये यासाठी कागदावर हे सर्व सामान ठेवावे. हात पुसण्यासाठी कापड जवळ बाळगावं. रांगोळी काढण्यासाठी चाळणी, प्लास्टिकचा कोन आदी साहित्य बाजारात सहज उपलब्ध आहे. अलीकडे मुक्तचित्र रांगोळ्या काढण्यावर भर दिला जात असून निसर्गचित्र, पानं-फुलं, फुलांचा गुच्छ, नक्षीकाम, पक्षी, मोर किंवा स्वत: एखादा काल्पनिक देखावा आपण काढू शकतो. रांगोळीभोवती चमचम, फुले, पणत्यांची आरास करत ती अधिक खुलवू शकतो. विविध ठशांच्या वापर करतही रांगोळी सजवता येईल. प्रवेशद्वारावर रांगोळीचं असं मोहक रूप पाहून घरात येणा-यांचं मन प्रफुल्लीत होतं. रांगोळी पुसताना ती अलगद हाताने पुसावी. पुसताना ओला हात लावू नये. त्यामुळे जमिनीवर डाग पडू शकतात. सर्व रांगोळी एकत्र झाल्याने एक वेगळा रंग तयार होतो. ही रांगोळी जमा करत पिशवीत भरावी. रांगोळी टाकून न देता त्याचा पुनर्वापरही होऊ शकतो. अगदी रंग भरण्यासाठी या रांगोळीचा वापर करायचा नसेल तर बॉर्डर, ठिपके काढण्यासाठी त्याचा उत्तम वापर होऊ शकतो.

### रांगोळ्यांचे विविध प्रकार

**ठिपक्यांची रांगोळी**

ही रांगोळी पारंपरिक पद्धतीची. गेरूचा वापर करत चौकोन बनवत त्यावर ठिपके काढावेत

किंवा ठिपक्यांच्या कागदाच्या साहाय्यानेही ठिपके काढू शकतो. मग ते ठिपके एकमेकांना जोडत सुंदर रांगोळी काढून घ्यावी. सारवलेल्या गेरूवर पांढ-या रंगाची रांगोळी उठून दिसत असल्याने शक्यतो पांढ-या रंगाचा वापर करावा.

**संस्कारभारती रांगोळी**

ठिपक्यांच्या रांगोळीनंतर प्रत्येकाची आवडती रांगोळी म्हणजे संस्कारभारती. दिसायला आकर्षक आणि काढायलाही तितकीच सोपी असणारी संस्कारभारतीची रांगोळी सांस्कृतिक कार्यक्रमांच्या ठिकाणी सर्रास काढली जाते. दिवाळीतही तितक्याच उत्साहाने ही रांगोळी काढली जाते.

**रेडीमेड रांगोळ्या**

वेळेची कमतरता असेल; पण सुबक रांगोळी काढायची असेल तर तुमच्यासाठी रेडीमेड रांगोळयांचा पर्याय खुला आहे. कमळ, लक्ष्मीची पावले, गुलाब, स्वस्तिक, हत्ती आदी विविध नक्षीतील प्लास्टिकचे रेडीमेड छापे बाजारात उपलब्ध आहेत. आपल्या आवडीनुसार छापे घ्यावेत. विविध रंग भरत सुंदर रांगोळी काढता येऊ शकते. यातील काहीच करायचं नसेल तर थेट स्टिकरची रांगोळी घ्यावी. गोलाकार, चौकोनी, पट्टीच्या आकारतील विविध स्टीकर्स बाजारात सहज उपलब्ध आहेत.

**पाण्यावरची रांगोळी**


पाण्यावर रांगोळी? हा विचारच अनेकांना आश्चर्यचकित करेल. नेहमीच्या रांगोळयांपेक्षा पाण्यावरची रांगोळी काढण्याचा प्रयोग करून बघा. त्यासाठी पसरट किंवा खोलगट भांडं आणि कोळशाची पावडर आवश्यक आहे. भांडं काचेचं असल्यास उत्तम. कारण त्यात रांगोळी दिसायला आकर्षक दिसेल. ज्या ठिकाणी रांगोळी काढायची आहे त्या ठिकाणी भांडं ठेवावं. भांडय़ात पाणी भरताना काठोकाठ भरू नये. पाण्याला स्थिर होऊ द्यावं. मग पाण्यावर कोळशाची पावडर अलगद पसरवावी. कोळशाची पावडर हलकी असल्याने ती पाण्यावर तरंगते. पृष्ठभाग कोळशाच्या पावडरीने भरेल याची खातरजमा करावी. कोळशाची पावडर पसरवताना हातात ग्लोव्ह्ज घालावेत. भांडय़ाला धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी. मग त्यावर आवडीनुसार रांगोळी काढावी. ही रांगोळी केवळ कोळशामुळे पाण्यावर तरंगते. ही रांगोळी दिसायलाही आगळीवेगळी दिसते.

**पर्यावरणपूरक रांगोळी**

फुले, फुलांच्या पाकळया, झाडांची पाने, दुर्वा यांचा वापर करत पर्यावरणपूरक रांगोळी

काढता येईल. खडूचा वापर करत रांगोळीची बॉर्डर काढून घ्यावी. त्यात रंग भरण्याऐवजी झेंडूची फुले, पाकळ्या, गुलाबाची विविध रंगीत फुले किंवा पाकळ्या, ऑर्किडची फुले, मोगरा, चाफा आदी फुलांचा वापर करत रांगोळी सजवावी. फुलांवर किंचित पाणी शिंपडावे. ज्यामुळे ती ताजी दिसू लागतात. मात्र जास्त पाणी शिंपडलेल्या फुलांचा वापर केल्यास ती लवकर कोमेजू शकतात.

अलीकडे विस्तारणा-या इमारतींच्या जंगलात अंगणं नाहीशी झाली. अंगणाची जागा दुचाकी, चारचाकी वाहनांनी घेत त्याला पार्किंग स्थळ बनवलं. त्यामुळे अंगणात बसून कोरीव नक्षीकाम करत रांगोळ्या काढणे कमी झालं असलं तरी रांगोळीचं आकर्षण, महत्त्व, उत्साह अद्यापही टिकून आहे. अशीच एक सोपी पण आकर्षक रांगोळी सोबत आहे !! अर्थातच ठिपक्यांची आणि हो पारंपारिक सुद्धा. १२-४-४ -४ ठिपके घालून ही रांगोळी आपण छोट्या आणि मोठ्या जागेत पाहिजे तशी काढू शकाल.. .. ..



दिनांक शनिवार २७ मे २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## सुबक रांगोळीची दोन बोटे !!!!


पारंपारिक रांगोळी ठिपके घालून ते जोडून किंवा त्याभोवती ओळी रेखून काढली जाते. त्यामुळे कोणत्याही ठिकाणी पुरेशी लहान मोठी करणे हे सर्वस्वी त्या काढणारीच्या हातात असते. दोन ठीपक्यातील अंतर पुरेसे कमी जास्त करून आपल्याकडे असलेल्या जागेचा उपयोग करण्यात भारतीय स्त्रिया अगदी हुशार असतात. शहरी महिलांना पुरेसा वेळ आणि जागा नसते. पण ग्रामीण महिला त्याबाबतीत सुदैवी. खर तर त्यांना कामे अनेक असतात पण तरीही आपली ही कला जोपासण्यात त्या वेळ देतात. नरसोबावाडी सारख्या अनेक देवस्थानच्या परिसरात छोटी घरे आणि अंगणे सुरेखशा रेखीव रांगोळीने सजलेली दिसतात. दारापुढचा काळा फातर (दगड) सकाळी स्वच्छ धुवून अगदी काही क्षणात एखाद्या ठीपक्याच्या रांगोळीने आणि हळद पिंजरीच्या चिमटीने असा काही सुंदर बनवतात की त्यांच्या या कले पुढे जागतिक कीर्तीचे चित्रकार सुद्धा फिके पडावे. आणि याकलेचे आयुष्य किती छोटे?? अगदी काही तासात -वारा, कुत्रा, मांजर, लहान मुले, आणि चुकून येत्या जात्या माणसाचा पडणारा पाय! एवढे सारे शत्रू त्या रांगोळीची ऐशी तैशी करणार असतात. पण तरीही दुसऱ्या दिवशी तेवढ्याच उत्साहाने नवी रांगोळी घालणाऱ्या त्या भगिनी म्हणजे श्रीकृष्णाने वर्णन केलेले स्थितप्रज्ञतेचे लक्षण वर्तनाने दाखवणाऱ्या असे मानावेच लागेल.

ही कला काही एका दिवसाची महिन्याची नाही तर यात कित्येक पिढ्या अगदी सहज आणि काहीही अभिनिवेश न करता पुढच्या पिढीत संक्रमित करीत आहेत. लहान असताना मुलगी आई, आजी, आत्या, मावशी, रांगोळी रेखताना बघते. तयार झालेल्या आकृत्या पाहते. शिवाय शेजार पाजारचे अंगण दोन उड्यात पार करून पाहून येते. निरीक्षणाने नजर तयार होते. मग हळूहळू त्यामुळेच रांगोळीचे वळण मनात बनत जाते. मग कधीतरी हातात रांगोळी घेऊन फक्त ठिपके आणि त्यापुढे रांगोळी अशी कृती नकळत होत जाते.

एकापुढे एक अशा समान ठिपक्यांच्या चौकोनी आकार बनण्याऱ्या रांगोळ्या किवा एक ठिपका कमी करीत दोन ठिपक्यांच्या बरोबर मध्ये घालीत षटकोनी आकाराच्या किवा मग थोड्या दाक्षिणात्य पद्धतीच्या दोन्ही बाजूनी एक ठिपका कमी करीत पण सरळ ठिपका घालीत अशा अनेक प्रकाराने रांगोळी रेखली जाते. रांगोळीतील समान अंतरावरील ठिपके आपलेच वर्तन कसे असावे याचा जणू आदर्श! ठिपक्यातील अंतर असमान होणे

म्हणजे आपलाच नात्यांचा तोल बिनसणे. किंवा आयुष्याचा समतोल घालवणे. कधी आणि कोणते ठिपके जोडून आपली रांगोळी सुंदर करायची आणि कोणत्या वेळी ठिपक्याभोवताने फिरवत कुठेही रेघ न तोडता पण तरीही थोड्या अंतरावरून जावून आरंभाला मिळवत आपले चित्र बनवायचे हे एकदा ठरले की मग रांगोळी आणि आयुष्य एकदम सोपे. आपली पारंपारिक रांगोळी म्हणजे जणू आपली कुटुंब व्यवस्था. एका साच्यात बसलेली, बसवलेली. योग्य वयात गृहस्थी, घर संसार, लेकरे, नाती गोती, शेजार पाजार सांभाळत राहिलेली आपली घरे. कुठेही न हलता आहे तिथे राहून सजणारी, हसणारी. आनंदी अशी आपली कुटुंबे.. दु:ख, त्रास असले तरी बाहेर न दाखवता, आहे त्यात समाधान मानणारी आपली संस्कृती. माणसाना जोडत, नाती गोती जपत जायचे. आणि त्याचे दारातील प्रतिक म्हणजे ठिपक्यांची रांगोळी. ठराविक जागेत, आकारात, आणि तरीही लोभसवाणे रूप घेऊन स्वागत करणारी. शालीन, सात्विक. घरात खूप श्रीमंती नसेल. पण दारातील रांगोळी मात्र लक्ष्मीच्या पावलांना आत बोलावते.

अतिथीचे मनापासून स्वागत करते. गृहलक्ष्मीपूर्वी ‘या या’ असे अबोल पणे म्हणत असतात ती दारातील सुबक अशी रांगोळीची दोन बोटे!!!!!! अशीच एक रांगोळी सोबत आहे. खूप वेगळी पण अगदी सोपी. 12-4-4 अशी ठिपक्यांची मांडणी करून सहज जमून जाईल.



दिनांक शनिवार ३ जून २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी – जन्म सावित्रीची- हळद आणि चंदनाची

वट सावित्रीची पूजा व्रत आणि त्याची कथा अगदी सर्वांना माहिती असते. आमच्या माता भगिनी आपल्या पतीच्या आयुष्य वाढावे त्याचे आरोग्य चांगले असावे यासाठी मनापासून उपास, पूजा करतात. या साऱ्यांचा त्यांच्या भावनांचा आणि श्रद्धांचा आदर ठेवून काही सुचवावे वाटते. पूर्वीच्या स्त्रिया या पूजेच्या निमित्ताने नटून थाटून घराबाहेर वट वृक्षाखाली जमायच्या. एकत्र पूजा आरती करायच्या. एकमेकीना वाण देऊन घरी परतायच्या. एवढा वेळ त्या महाकाय वडाच्या सानिध्यात मोकळेपणाने राहात. त्यांना मोकळा वारा, प्राणवायू, मिळत असे. सोबत समवयस्क मैत्रिणी, सारख्याच परिस्थितीतील, साधारण समदुखी आणि सुखी सुद्धा. त्यामुळे बोलणे हसणे होवून त्या घरी परतत.

पावसाची अलीकडेच आलेली एखादी सर, दाटून येत असलेले आभाळ, आणि मोकळेपणाने बोलायला सख्या. अशा वेळी ती बाई पूजे बरोबर उपाशी असूनही मनाने भरून जाई. बरोबर त्या निमित्ताने अंगावर घातलेले दोन चार दागिने आणि पूजेसाठी नेसलेली घरात असलेल्यातील जरा उंची साडी. आणखी सुख ते काय मिळणार !!!

आता गावातून शहरातून वनराई देवराई गेली. सिमेंट च्या जंगलात श्वास कोंडत जनावरासारखी जगत माणसे आपले स्वत:चे बोन्साय करून जगत आहेत. कुठल्यातरी गावातून तोडलेल्या वडाच्या फांद्या विकत घेऊन त्या पुजून आपले कर्तव्य बजावणे कि निभावणे या संभ्रमात व्रत करणारीला या व्रतामागचा मूळ उद्देश समजून घ्यायला तरी वेळ कुठे आहे ?? शिवाय या फांद्यांचा कचरा दुसऱ्या दिवशी कचराकुंडीत आधीच तुडुंब भरलेल्या कुंडीतून भरून वाहतानाचे दृश्य पाहणे तर करूण, वेदनादायी आणि कठोर असते. त्याच्या आजूबाजूला उष्ट्या खरकट्या अन्नासाठी जमलेला तो गुरांचा कळप. सगळे डोळ्यावर पट्टी ओढून पाहावे लागते.

पण याला पर्याय काय ?? आपली परंपरा संस्कृती न सोडता आणि त्यामागचे कारण समजून घेत आपण वट वृक्षाच्या फांदीची रांगोळी पाटावर काढून पुजू शकतो. किंवा एखाद्या मोठ्या कागदावर त्याचे चित्र काढून त्याचीपण पूजा करू शकू. शेवटी झाड आणि झाडाची प्रतिमा यातून साध्य एकच. आणि शहरी भागात वडाचे झाड मिळणे त्याची पूजा करायला पुरेसा अवधी असणे मोठे कठीण.

गोमंतकातील प्रसिद्ध लोककला अभ्यासक श्री विनायक खेडेकर यांच्या घरी रांगोळी सदराच्या निमित्ताने जाणे झाले. तेव्हा बोलता बोलता सौ. खेडेकर म्हणाल्या आम्ही पूर्वी वट पौर्णिमेची पूजा अगदी वेगळ्या रीतीने करीत होतो. देवघरातील -भिंतीवर थोडा भाग सारवून त्यावर चंदन आणि हळद मिश्रित लेप घेऊन फुलांच्या देठाने वडाची फांदी रंगवून त्या रांगोळीलाच पुजत होतो. मला ही पर्यावरणपूरक आणि कलात्मक कल्पना खूपच आवडली. खूप पूर्वी थिएटर मध्ये पाहिलेली एका फेस क्रीम ची जाहिरात आठवली. हळदीचा रोगप्रतिबंधक गुण आणि चंदनाचा शीतल शांतपणा घेऊन आलेली, म्हणूनच ही एक वेगळी रांगोळी जन्म सावित्री आणि भूमातेची लेक म्हणवून घेणाऱ्या तुमच्या माझ्यासारख्या पर्यावरण प्रेमीसाठी. मी ही रांगोळी खऱ्या चंदन आणि हळद मिश्रित लेपाची बनवली आहे. या वट पौर्णिमेला अशी सुगंधी पूजा नक्कीच करूया. पर्यावरण संतुलनासाठी माझा तुमचा खारीचा वाटा नक्की उचलुया !!!!!!!!



दिनांक शनिवार १० जून २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळीची कविता!!

रांगोळी ही कला स्वत:च्या निरीक्षणातून आणि सरावाने त्याचबरोबर महत्वाचे म्हणजे हृदयातून उमलावी लागते. कविताही तशीच!! मनातून उमलून त्यात वाचन अनुभवातून समृद्धी येत जाते. आपली कलाकृती आपणच वाचावी निरखावी लागते. फरक एकच, रांगोळी एकदा काढली की झाले, काही चूक झाली तर पुसून नवी रांगोळी रेखायटाची. चुकीची दुरुस्ती या कलेत नाही. मला वाटते सगळ्या कलात अत्यंत अल्पायुषी कला म्हणजे रांगोळी.

केशवसुत अर्थात 'कृष्णाजी केशव दामले ' ज्यांना आधुनिक कवितेचे जनक म्हटले जाते त्यानाही रांगोळी या पारंपारिक प्रकारावर कविता रचायचा मोह आवरला नाही. १८ डिसेंबर १८९६ रोजी त्यांनी लिहिलेली एक कविता वाचनात आली. कवितेचे नावच आहे 'रांगोळी घालताना पाहून'

गायीच्या शेणाने स्वच्छ सारवलेले अंगण, आणि त्या अंगणात दोन बहिणी उभ्या आहेत. त्यातील एक बहिण रांगोळी घालू लागते. ती सूर्य, चंद्र, नक्षत्रे, स्वस्तिक, गोपद्मे, सुदर्शन चक्र, बेल, फुले, तुळस अशा आकृत्या काढून रांगोळी घालीत असते. सुबक अशी रांगोळी रेखाटताना ती तोंडाने काहीतरी गुणगुणते आहे. उत्तम चित्र, आणि कविता यात न सापडणारे सुंदर असे मर्म कवीला या रांगोळीत मिळते. आकाश आणि जमीन यांचा सुंदर मेळ या मुलीने रांगोळीतून घातला असे कवीने म्हटले आहे—

सूर्य –म्हणजे प्रकाश उर्जा, सकारात्मकतेकडे उचललेले पाउल. स्वस्तिक-धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष, या साऱ्याचा एकत्र परिणाम. गोपद्म म्हणजे गायीची पावले. पूर्वी गोठ्यातील गुरांच्या संख्येवर घराची श्रीमंती मोजली जात असे. गोमाता ही कृषीसंस्कृतीत श्रेष्ठ मानली जाते. तिचे दुध आईच्या दुधानंतर पहिल्या दर्जाचे आहे. त्याचप्रमाणे गोमुत्र गोमय याचेही औषधी आणि शेतीसाठी, खत आणि कृमिनाशक गुण आता सिद्ध झाले अआहेत. त्यामुळे गायीची पावले घरात समृद्धी आणतात असा संकेत आहे. चक्र म्हणजे गती. गती पाहिजेच एकाच जाग्यावर राहणे म्हणजे संपणे. 'थांबला तो संपला' म्हणूनच चक्र हे प्रगतीकडे जायचे सुचवते. शिवाय यातून सुदर्शन चक्र जे नारायणाचे शस्त्र आहे तेही सूचित होते. दुष्टांचा संहार आणि सज्जनांचा आधार असे हे सुदर्शन. कुण्या दुष्टाची नजर घराकडे किंवा रांगोळी रेखाणाऱ्या लेकीबाळीकडे पडली तर सूर्याच्या तेजाने आणि सुदर्शन चक्राने घराचे, आणि पावित्र्याचे रक्षण होईल असे आश्वासक प्रतिक रांगोळीत दिसते.

घरात चारी पुरुषार्थाचा सांभाळ, आदर होईल. घरात समृद्धी असेल. सात्विकता आणि पावित्र्य अभंग राहील हे सारे या रांगोळीतून प्रतीकात्मक रित्या दिसते. कवीला यात मोठा आशय सापडतो..


त्यांच्या कवितेच्या काही ओळी अशा आहेत

‘ आधी ते लिहिले तिने रविशशी नक्षत्रमाला तदा,
मध्ये स्वस्तिक रेखिले मग तिने आलेखिली गोष्पदा
पद्मे बिल्वदले, फुले तुळसही चक्रादिके आयुधे
देवांची लिहिली न ते वगळीले जे चिन्ह लोकी सुधे ‘

कवी केशवसुत त्यात पुढे असेही म्हणतात की ‘ जिथे जिथे (म्हणजे ज्या कलेत, वस्तुत) आपल्याला सौदर्य दिसेल ती भले छोटीशी रांगोळी असू द्या, नीट निरखून पहा, प्रत्यक्ष देवत्व येथे भेटेल.

एवढ्या मोठ्या कवीने ज्या कलेची अशी मुक्तकंठाने स्तुती केली ती आपली पारंपारिक रांगोळी.

ही रांगोळी काही तासात पुसली जाईल, वाऱ्याने बेरंग होऊन जाईल याची पूर्ण जाणीव असूनही नित्य नव्या उत्साहाने ती अंगणात, उंबऱ्यावर, देवघरात रेखाटणाऱ्या कलाकारांना सादर प्रणाम!!



या आठवड्यात एक वेगळी रांगोळी आपल्यासाठी देत आहे. अगदी सोपी, साधी तरीही सुंदर !! सरावाने आपल्या रेषा अगदी रेखीव येतील तेव्हा तिचा डौल अगदी पाहण्यासारखा. चित्पावन ब्राह्मणांच्या घरी ‘बोडण’ या एका विशिष्ट पूजेच्या वेळी ही रांगोळी घालतात. त्यामुळे बोडणाची रांगोळी या नावानेच ही रांगोळी प्रसिद्ध आहे.

दिनांक शनिवार १७ जून २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## कशिदा आणि गाठीच्या रांगोळ्या

रेशमाच्या रेघांनी, लाल काळ्या धाग्यांनी
कर्नाटकी कशिदा मी काSSSढीला ---

सुप्रसिद्ध लावणीतला हा कर्नाटकी कशिदा म्हणजे कसुती. कन्नड मधे कै- म्हणजे हात आणि सुती म्हणजे धागे. कसुती म्हणजे धागे मोजून केलेले हाताचे काम. पण हे भरतकाम आणि त्या भागात रेखल्या जाणाऱ्या रांगोळ्या यात मला खूप साम्य आढळले. म्हणून या विषयावर अधिक माहिती घेतली.

६ वे ते १० वे शतक म्हणजे भारतातील सुवर्णयुग. या कालातील भारतातील राजे महाराजे सम्राट यांनी शिक्षण कला सांस्कृतिक वारसा याचे महत्व जाणले आणि त्याला प्रोत्साहन दिले. यामुळे दक्षिणेकडे अप्रतिम कलाविष्कार दाखविणारी मंदिरे बनली. प्रामुख्याने मंदिरावरची पुरुषांनी केलेली सुंदर कलाकुसर पाहून त्या काळच्या स्त्रियांनाही स्फूर्ती मिळाली. आणि त्यांनी भरतकामासारख्या कला जोपासल्या. आपल्या नेहमीच्या वापरातील वस्तू म्हणजे साडी, चोळी, रुमाल, झबली यावर कशिदा काढला जाई. या नमुन्यांवर मंदिराच्या शिल्पकलेचा प्रभाव दिसून येतो. आपल्या सभोवताली जे काही सुंदर दिसले उदा. घरातील पाळीव प्राणी, पक्षी, गोपुरे, कमळ, गुलाब, दीपमाळा, आसन किंवा गालीचा, पालखी, तुळशीवृंदावन, कोयरी, पिसारा फुलवलेला मोर, पोपट, हंस इ.

आणि हेच काढताना एका वेगळ्या कलेचा जन्म झाला ती कला म्हणजे रांगोळी. दक्षिण भारतातील सुप्रसिद्ध अशा गाठीच्या रांगोळ्यांची जी वेगळी शैली आहे त्यातही या विषयांवर नमुने असतात. या दोन्ही लोककला स्त्रियांनीच निर्माण केल्या जोपासल्या. त्यामुळे त्यात अनेक साम्य आढळतात. मुख्य म्हणजे यात ठिपके किंवा धागे मोजावे लागतात. आणि या रांगोळीची सुरवात जिथे होते तिथेच त्याचा शेवट असतो. काशिद्याचे तसेच. सुरवातीच्या धाग्याकडे येऊन ती आकृती पूर्ण होते. हे भरतकाम दोन्ही बाजूनी सारखे दिसते हे एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे.

त्याकाळी दक्षिणेतील उत्तर कर्नाटकात कशिदा आणि दक्षिण कर्नाटकात गाठीच्या रांगोळ्या यांचा प्रसार झाला असे मानतात. दोन्हीत आणखी एक साम्य म्हणजे त्या भौमितिक आकृत्या असतात. आणि ते ठिपके मोजून काही अंतर सोडून रांगोळी बनते, तर धागे मोजून काही विशिष्ट रीतीने मागे पुढे जात ही आकृती बनते, दोन्ही बाजू सारख्या. याला वरची बाजू नाही. कशीही वापरा. आणि काशिद्यातील अलंकारांची नावेसुद्धा रांगोळी सारखीच वेगळी आहेत. कर्नाटकी कशिदा काढलेली साडी अलंकारिक मानतात.

या अलंकाराना 'शंख, नागपट्टी, लोलक, दिवा, बुगडी, हलवा, काटा, बुगडी, त्रिशूळ, वेलदोडा, सुपारीचे फुल, स्वस्तिक, रुद्राक्ष, नारळाचे फुल, पारिजातकाचे फुल, मोर, हंस' अशी रांगोळीसारखीच नावे असतात.

गाठींची रांगोळी सुद्धा अशीच वेगवेगळे रूप घेऊन येते. पारंपारिक कशिदा लाल काळ्या रंगाच्या कापडावर भरला जातो. रांगोळी काळ्या हिरव्या शेणसड्यावर किवा तपकिरी गेरूवर काढली जाते. म्हणजे बेस मध्यम नेहमीच गडद रंगाचे असते. टाका चुकला तर कशिदा पूर्ण उसवावा लागतो आणि रांगोळी चुकली तर पुसून परत रेखावी लागते.


त्या त्या भागातील स्थापत्यकला, शिल्पकला, मोसमी फळे पाने पिके या साऱ्या गोष्टींचा प्रभाव प्रत्येक लोककलेत पडलेला आढळतो. हा प्रभाव सणामधून खाद्यपदार्थातून, रिती भातीतूनही जाणवतो. आजकाल सगळे जग खूप जवळ आले आहे आणि वस्त्र पेहराव तर सगळीकडे सारखाच असतो. काही वेळा सोय म्हणून तर कधी फॅशन म्हणून आपण आपले खाणे पिणे कपडे बदलले. त्याचा अर्थात बरा वाईट परिणाम सुद्धा वाट्याला येतोच.


तरीही निदान सणासमारंभाला धार्मिक कार्याला तरी आपले पारंपारिक कपडे, खाद्य पदार्थ, आणि खूप जुनी परंपरा अशी पण रोज नवी वाटणारी रांगोळी काढतोच ना !!

शेवटी मशीनने केलेले भरतकाम आणि हाताने काढलेली वेलबुट्टी किती फरक असतो ना? तशीच एखाद्या स्टीकरने / साच्याने काढलेली सुबक रांगोळी आणि आपल्या हाताने रेखलेली रांगोळी यात फरक तर असणारच. कारण हाताने येतो तो आकृतीचा सच्चेपणा, वेगळेपणा. मग त्याच पद्धतीने काढलेली रांगोळी दुसऱ्या दिवशी तशी दिसेल असे नाही. किंबहुना वेगळीच दिसेल. कारण ही कलाच अशी आहे की प्रत्येक हाताच्या फटकाऱ्याने, रांगोळीच्या पुडीच्या जाड, बारीक पणाने ती आकृती वेगळी दिसते. तशी तेवढ्या ठिपक्यांची रांगोळी प्रत्येकीची वेगळी असू शकते.

आपल्या आयुष्यात येणारा प्रत्येक दिवस नवा म्हणून स्विकारावा असे सांगणारी आणि तसेच प्रत्येक शब्द तोलून मापून बोलवा असे सांगते ती आपली रांगोळी. कारण शब्द बोलला की गेला, आणि रांगोळी रेखली की झाली. दुरुस्ती करू शकत नाही, चुकली असेल तर पुसून नवी रेष काढावी. पण तिथल्या तिथे काही सावरून घेण्याचा प्रयत्न केला तर पूर्ण झाल्यावर कुठे तरी ते लक्षात येतेच.

आपल्या कसुती अर्थात कर्नाटकी कशिदा आणि गाठींची रांगोळी यांचे साम्य दाखवणारी आकृती सोबत आहे. आपण दोन्ही काढू शकता.. .. .. ..





दिनांक शनिवार २४ जून २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी पावलांची –अर्थात लक्ष्मीच्या !!!!!



देवी लक्ष्मी म्हणजे धन देणारी देवी. पण धन याचा अर्थ केवळ पैसा नसून धान्य, जमीनजुमला, सोने नाणे हे सारेच असते. एकंदरीत सुबत्ता येते

ती लक्ष्मीच्या कृपेने.

अशा. लक्ष्मीची पूजा वर्षभर वेगवेगळ्या दिवशी वेगवेगळ्या निमित्ताने करतात. शुक्रवार तर देवीचा वार. त्यानंतर प्रत्येक आमावस्येला किवा पौर्णिमेला सुद्धा लक्ष्मीचे रूप पूजतात. याशिवाय दिवाळीत लक्ष्मीपूजन असते. आता यानंतर येणारी आमावस्या म्हणजे म्हणजे आषाढी आमावस्या ही खरी तर दिव्यांची अमावस्या. या दिवशी सर्वत्र दिवे लावून लक्ष्मी पुजनासारखीच पूजा करावी असे शास्त्र सांगते. या ऐवजी आपण मात्र तिला गटारी अमावस्या करून तिचे नावच बदनाम केले आहे. यावेळी आपण थोडा बदल करावा असे वाटते. आपल्याला देवाने दिलेल्या या सुंदर देहाचा उपयोग दारू पिऊन गटारात पडण्यासाठी करण्याचा विचारसुद्धा मनाशी करणे म्हणजे दुर्दैव !!

लक्ष्मीच्या स्वागताला उंबऱ्यावर, तिची घराच्या प्रवेशद्वारापाशी पावले आत येणारी असली पाहिजेत. त्यासाठी खूप महत्वाचे म्हणजे कायम मेहनत कष्ट करायची तयारी आणि त्यात सातत्य पाहिजे.. म्हणजे घरात येणारी संपत्ती चांगल्या मार्गाने अर्थात श्रमाने तयार झालेली पाहिजे. खूप लहानपणी एक गीत कायम रेडीओ वर, सरस्वतीपूजन असतानाच्या विविधरंगी कार्यक्रमात ऐकू येत असे

"उद्योगाचे घरी देवता लक्ष्मी वास करी

जय श्रम देवी जय श्रम देवी कृपा करी" //

आजकाल मात्र जय श्रमदेवी न म्हणता काही न करता केवळ कोणालातरी टोप्या घालून लुबाडून लक्ष्मी आणण्याचा प्रयत्न होतो आहे. पण अशा मार्गाने येते ती लक्ष्मी कायम निवास करीत नसते. 'कष्टाची मीठ भाकर आणि शीत कढी' जुन्या जमान्याची बनून राहिली आहे. 'कालाय तस्मै नम:' दुसरे काय ?

आता देवी लक्ष्मी यायची म्हणजे स्वच्छता हवी, घरात शुचिता असायला हवी. घराचे अंगण प्रवेशद्वार स्वच्छ करून त्यावर शेणसडा काढायचे हे काम घरातील बाई सकाळी उठून करीत असे. आणि ते सुकले की मग सुरेखशी रांगोळी काढायची. घरच्या उंबऱ्यासमोर गायीची पावले गोपद्म आणि लक्ष्मीची प्रवेश करणारी पावले. ही पावले

पाहूनच लक्ष्मी आत येते. ही पावले अनेक प्रकारांनी रेखिली जातात. काही वेळा उजवे पाउल पुढे आणि डावे किंचित मागे असते. म्हणजे ती उजव्या पावलांनी (शुभ संकेत) आत प्रवेश करते असे मानतात. उजव्या पावलाच्या मागे एक छोटे स्वस्तिक काढले जाते. डाव्या पावलावर हळद आणि उजव्या म्हणजे पुढे जाणाऱ्या पावलावर असते ती सौभाग्यदायी पिंजर. त्यामुळे ही रंगसंगती सुद्धा बरोबर साधली जाते. याशिवाय अनेक प्रकारांनी लक्ष्मीची पावले रेखतात. चैत्रांगण सारख्या रांगोळीतसुद्धा लक्ष्मीची पावले असतात. अशी पावले रोज दारात काढल्याने खरेच लक्ष्मी आनंदून त्या घरात प्रवेश करते असा समज आहे. रोज नवी रांगोळी काढण्यामागे जुने टाकाऊ असे सारेच जाऊदे आणि पुन्हा नव्या दिवशी नव्या उत्साहाने जोमाने काम करूया असाही एक अर्थ होतो. जुने जे विसरायला हवेत असे हेवेदावे वैर सारेच विसरून जायला हवे. माणसाला स्मरणशक्ती बरोबर देवाने विस्मरण होण्याची योजना केली आहे. पण नको ते स्मरण आठवण राहते आणि जे चांगले ते विसरले जाते. आणि श्रम देवीची प्रतिष्ठापना केली की लक्ष्मी नक्की येते, तीही सोन्याच्या पाऊले !!

आज अशीच तिची पावले घालण्याचे रेखण्याचे काही सोपे प्रकार सोबत देत आहे. रोज नाही पण सुट्टीच्या दिवशी तरी उंबऱ्यावर किवा दारात ही पावले रेखून पहा. नक्कीच आपल्या घरी लक्ष्मी येईल!!!!!

बाकीबाबानी म्हटल्याप्रमाणे –

देखणी ती पाऊले ध्यासपंथे चालती/

वाळवंटातून सुद्धा स्वस्तिपद्मे रेखिती//

दिनांक शनिवार १ जुलै २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी -पांडूरंगाची




आषाढी एकादशी अनेक नावानी ओळखली जाते. महा एकादशी पद्म एकादशी देवपदी एकादशी, देवशयनी एकादशी ही अनेक नावे आणि देहभान विसरून पंढरीची वारीला जाणारे वारकरी अशी अनेक दृश्ये डोळ्यासमोर घेऊन येणारा हा दिवस. उन पाऊस, तहान भूक याची पर्वा न करता मैलोमैल चालणारे त्याचवेळी नाचणारे गाणारे असे हे भक्त. साधेसुधे कष्ट करणारे आणि वर्षातून एकदा किंवा दोनदा वारी करणारे.

या वारकर्यांच्या मध्ये काही स्त्रिया सुद्धा असतात. साधी सुधी सुती हिरवी लाल साडी नेसलेल्या आणि डोक्यावर असते ते तुळशी वृंदावन. विष्णूची लाडकी तुळस. हे तुळशीवृंदावन पथकातील वीणा, आणि इतर प्रतिकाएवढे किंबहुना अधिक पवित्र मानले जाते. तिला पूर्ण वारीत जमिनीचा स्पर्श होऊ देत नाही. त्यामुळे फक्त रात्रीच्या वेळी मुक्कामाच्या ठिकाणी (शक्यतो एखाद्या मंदिरात) स्वच्छ पुसलेल्या सारवलेल्या भागात एखादे वस्त्र टाकून त्यावर दंड, वीणा, पताका आणि तुळशी वृंदावन ठेवले जाते. सकाळी पुन्हा पूजा आरती करून तिला डोक्यावर घेतले जाते. वाटेत कुठेही ती घेणारी बाई अगदी जेवताना, नैसर्गिक विधीसाठी जाताना या तुळशीला आपल्या सखीकडे देते, पण जमिनीवर ठेवत नाही. तुळशी वृंदावन मातीचे असते. शिवाय जिवंत तुळशीचे रोपटे म्हणून त्यात माती पण ओलीच असते. त्यामुळे हे एवढे वजन माथ्यावर घेऊन चालत वारी करणाऱ्या माता भगिनी या आपल्या संस्कृतीचे प्रतिक. आपल्या



संसाराचे ओझे निमुटपणे वाहणाऱ्या या दुर्गा. लेकरे बाळे, घर, शेतीची कामे यातून कशीतरी मोकळीक करून वारीला येणे म्हणजे किती कठीण ते त्या बाईलाच समजावे. शिवाय सतत चालावे लागते. कधी भाकर मिळेल कधी उपास. कधी आंघोळ करायला मिळेल तर कधी अंघोळीची गोळी. शिवाय प्यायच्या पाण्याची मारामार. वाटेतील पूर्ण प्रदेशात पाण्याचा अत्यंत दुष्काळ. त्यामुळे कुठे चिखल मिश्रित, तवंग आलेले पाणी वापरावे लागते. या सर्वांवर एकच गोष्ट कडी करणारी ती म्हणजे विठ्ठल रखुमाई वर प्रचंड श्रद्धा, भक्ती.


या एवढ्या प्रयासातून यातायातीतून शेवटी पांडुरंगाचे दर्शन तरी होते का ? तर उत्तर बऱ्याच वेळा नाही हेच. मंदिराच्या कळसाचे दर्शन, त्याला प्रदक्षिणा काढून पुन्हा परतीची वाट. पण एवढे असले तरी माथ्यावरची तुळस म्हणजे पांडुरंगाची वृंदा. तिला भुईवर ठेवणार नाहीच. भूमीचा स्पर्श होऊ देणे म्हणजे तिचा अपमान असे मानले जाते. त्यामुळे अनेक मैलावरून ही तुळस डोक्यावरून वाहून पंढरपूरला आणून तिला श्रीहरीला भेटवून परत घरी आणायची. वारीबरोबर आणि एकादशीच्या उपसाबरोबर हेही एक व्रत मानावे का??? श्रद्धा, भक्ती असली की त्या जोरावर माणूस कोणतेही अचाट काम करू शकतो हेच खरे.

आषाढी एकादशीपासून सुरु होतो तो चातुर्मास. आषाढी एकादशी ते कार्तिकी एकादशी पर्यंत चार महिने पर्यंत अनेक नेम व्रते केली जात असत. अजूनही आपल्याकडे काही भागात अशी व्रते केली जातात. पुष्कळ घरात कांदा लसूण या चार महिन्यात खाल्ली जात नाही. काही जण केवळ एक वेळ जेवण(एकभुक्त) घेतले जाते. या काळात देव झोपतात, म्हणून याला देवशयनी एकादशी म्हणतात. अशाच व्रतातील एक व्रत म्हणजे गोपद्म रेखण्याचे व्रत.

पूर्वी फार लहान वयात मुलींची लग्ने होत असत. त्यावेळी अगदी छोट्या वयाच्या मुलीला रमण्यासाठी काही अगदी हलकी फुलकी कामे दिली जात. फुले काढणे, हार माळा बनवणे, पत्री काढणे. देवाच्या पुजेची तयारी करणे इ. यातील हे गोपद्म व्रत, म्हणजे रोज सकाळी उठून देवाकडे स्वच्छ सारवून ३३ गोपद्मे काढायची. असे हे चार महिने सातत्याने करायचे. यामागची बाकीची संकल्पना काही माहिती नाही. पण त्या छोट्या मुलीला स्वच्छता, शुद्धता, याबरोबर रेखीवता आणि सातत्य हे सारे शिकून घेत हळूहळू मुली मोठ्या होण्याची संधी मिळत होती. घरच्या सण समारंभ, रिती भाती याची ओळख आणि सहज सवय होत जाई. यातूनच मग पुढे वेगवेगळी व्रते उपास नेम नियम यांचा पाया घातला जायचा. या ३३ गोपद्माच्या बरोबर सहा धरित्री आणि सहा तीळातुळस काढण्याची

प्रथा असायची. या शिवाय चैत्रांगणाप्रमाणे यातही स्वस्तिक, चंद्र सूर्य, तुळस, अशी शुभचिन्हे सुद्धा काढत. दक्षिणेकडे या व्रतामध्ये गायीचे चित्र काढून त्यात ३३ कमळे काढतात. शिवाय इतर शुभचिन्हे असतात.

आता या साऱ्यासाठी पुरेसा वेळ आणि जागा नाही. म्हणून बदलत्या काळाबरोबर या रांगोळ्या पाहायला मिळत नाहीत. ही एक छोटीशी रांगोळी रोज घालायला जमली तर उत्तम, पण कधी एखाद्या दिवशी काढली तरी याची प्रथा चालू राहील. आणि आपले अंगण देवघर, गोपद्म म्हणजे गायीच्या पावलांनी शुभ, पवित्र होऊन जाईल. गोपद्माच्या रांगोळी बरोबर प्रत्यक्ष पांडुरंगाची एक छोटी आणि सोपी रांगोळी पण आहे!!!



दिनांक शनिवार ८ जुलै २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## गुरु पौर्णिमा आणि रांगोळी

भारतीय संस्कृतीमध्ये गुरूची महती सांगायची गरज नाही.
“गुरु थोर कि देव थोर म्हणावा ? नमस्कार आधी कोणासी करावा ?
मनी चिंतीता सदगुरू थोर वाटे तयाचे प्रसादे रघुनाथ भेटे” !!!

अशा या सदगुरूची थोरवी मी काय सांगावी!! पण या रांगोळीतून आपल्याला आपल्या आयुष्यात लाभलेल्या प्रत्येक गुरूविषयी, शिक्षकाविषयी आदरभावना नक्कीच व्यक्त करू शकू. आपली परंपरा सांगते की आपल्या आयुष्यात प्रत्येक पावलावर कोणाचेतरी मार्गदर्शन मिळते. आणि त्यांना गुरु मानावे. या पौर्णिमेला व्यास पौर्णिमा म्हणूनसुद्धा ओळखतात.

रांगोळीतील पहिला गुरु अर्थात आपली आई आणि इतर नात्यातील, शेजारच्या महिला. या आपल्या दारात, उंबऱ्यावर रेखित असलेली दोन बोटे एका क्षणी आपले लक्ष वेधून घेतात, आणि मग दुसऱ्या दिवशीची प्रतीक्षा. हीच स्त्री तीच रांगोळी त्याच जागी दुसऱ्या दिवशी काढीत असेल तरीही ती वेगळी दिसते हे निश्चित. रांगोळीचे हेच वैशीष्ट्य आहे. एवढच काय ती जीच्याकडून शिकली असेल ती शिकल्यानंतर प्रत्यक्षात रेखताना त्यात स्वत:चा काही बदल, काही वेलवेलांट्या वाढवील. कदाचित आकार सुद्धा बदलेल. त्यात आपली भर घालील बदल करेल, आणि आपली कलाकृती तयार करील, तीही रोज नवी.


याशिवाय रांगोळीची अनेक पुस्तके बाजारात मिळतात. त्यामधून काही आकृत्या आपल्याला शिकायला मिळतील. आजकाल सुट्टीत अनेक रांगोळीचे वर्ग आयोजित केले जातात. त्यातून सुद्धा आपण चांगली रांगोळी काढायला शिकू शकतो.

अलीकडे आणखी एक मोठा आणि सहज पर्याय नव्या पिढीला उपलब्ध आहे तो म्हणजे इंटरनेट. इथे अनेक रांगोळ्या पाहायला मिळतात. त्याची माहिती, विडीओ क्लिप्स मिळतात. भारताच्या विविध भागात वेगवेगळ्या नावाने रांगोळीला ओळखतात अर्थात ती रेखायची पद्धतही त्या त्या विभागाची वेगळी असते. भारतीय संस्कृतीतील विविधतेतील एकता या कलेतून अगदी ठसठशीतपणे दिसते. याची माहिती आपल्याला अगदी सहज मिळू शकते.

पण रांगोळी ही काही केवळ वाचून किंवा पाहून येणारी कला नाही त्यासाठी लागतो तो सराव. आणि चांगली रेखीव रांगोळी काढायची तर सराव लागतोच. दोन बोटांच्या चिमटीतून एका ठराविक रीतीने सलग रांगोळी काढणे, रेघ वेलबुट्यां रेखणे, ठराविक आकाराचे, अंतरावर ठिपके काढणे हेही सरावाचेच काम. अनेक शुभचिन्हे सुद्धा खूप सोपी आणि सहज काढता येतात. यात सातत्य असावे लागते. कंटाळा करून चालत नाही. रांगोळी काढताना पाहणे खूप सोपे आणि त्यामुळे हे आपल्याला सहज जमेल असे पुष्कळ जणांना वाटते, पण प्रत्यक्षात होते ते वेगळेच. पण एकदा का रांगोळी जमली किंवा त्यातील मजा आनंद कळला की त्यासारखे सुख नाही. आपली कला जमिनीवर पाहताना खूप समाधान मिळते. शिवाय आपल्या आजूबाजूचे वातावरण प्रसन्न केल्याचे श्रेय सुद्धा मिळते. अलीकडे पाहायला मिळणारी फुलांची रांगोळी, वेगवेगळ्या धान्यांची रांगोळी असे अनेक पर्यावरणपूरक प्रकार आहेत. तेही आपण आपल्या निरीक्षणाने काढू शकू.

आपल्या प्रत्येक सणा समारंभात शुभ कार्यात अगदी प्राथमीकतेने मिरवते ती रांगोळी. तिची दोन बोटे घरातील शुभकार्याचे आणि आनंदाचे प्रतिक असते. म्हणूनच नव्या पिढीने रांगोळी काढायला शिकली पाहिजे. आणि आपल्या पारंपारिक रांगोळ्या पुढच्या पिढीपर्यंत पोचल्या पाहिजेत.

येणाऱ्या सणाच्या माहोलात अनेक मिरवणुका शोभा यात्रा, जाहिरीतीनी खचाखच भरलेल्या दैनिकांच्या आवृत्या, जेवणावळी, उष्ट्या पत्रावळीचा खच या साऱ्यात एक अगदी शाश्वत आणि मनोहारी गोष्ट म्हणजे त्यानिमित्ताने घातली जाणारी रांगोळी. आपल्या सणांचे नाते टिकवले ते रांगोळीने. आणि हे नाते आपल्या परीने निभावण्याचा माझा प्रयत्न आहे. मला वाटत आपलाही असणारच !!!!!!आजची रांगोळी अगदी सोपी आणि वेगळी खास गुरुपौर्णिमेसाठी -- १३-७ ठिपके काढून पहा नक्की जमेलच.



13-7

दिनांक शनिवार १५ जुलै २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## ठिपका ठिपका जोडीत जावा

रांगोळीत एक एक ठिपका रेखीवपणे काढावा लागतो. पण ठिपका लहान होऊन चालत नाही. आणि खूप मोठा पण होता नये. त्याशिवाय दोन ठिपक्या मधील अंतर सुद्धा अगदी सारखे समान असावे लागते. भारतातील वरच्या पट्ट्यातील म्हणजे गुजराथी वगैरे भागातील रांगोळ्यांची पुस्तके पहिली तर त्यातील ठिपके समान असतात. आणि होणारी रांगोळी चौकोनी तयार होते. याउलट महाराष्ट्र, गोवा भागातील ठिपक्यांची रांगोळी एक एक ठिपका कमी करीत दोन ठिपक्यांच्या मध्ये एक असे करत षटकोनी तयार होते किंवा गोल पण असते. दक्षिण भारतात मात्र ठिपके वेगळ्या रीतीने काढले जातात, आणि ठिपक्यांच्या बाजूने रेघ काढीत रांगोळी तयार होते. म्हणजे ठिपके मध्ये राहतात. त्याभोवतीने फिरत शेवटी रांगोळी पूर्ण होताना पुन्हा मूळ ठिपक्यापाशी येते. यात भौमितिक आकृत्या आहेत, त्याचबरोबर ठिपके मोजणे वाढवणे कमी करणे यात काही गणित सुद्धा असते. हे पूर्वी आपल्या अशिक्षित महिला कसे करीत हे खूप आश्चर्य वाटते. म्हणजे हे घालणाऱ्या या स्त्रिया नक्कीच शाळेत जाऊन शिकल्या नसल्या तरी त्यांना कलेची जाणीव आणि गणिताचा समज नक्कीच होती.

पूर्वी ही रांगोळी तांदळाच्या पिठाची काढली जायची. म्हणजे तांदूळ भिजत घालून काही तासांनी ते वाटून त्या पीठाने सुद्धा अशी रांगोळी काढली जाते. त्या ओल्या पिठात बोटे बुडवून त्यापासून ठिपके आणि पुढे रांगोळी रेखणे हे केवळ कौशल्याचे काम यात शंका नाही. काही वेळा त्या पिठात एखादी काडी बुडवून सुद्धा रांगोळी काढतात. यामध्ये हात न उचलता सलगपणे रांगोळीच्या मोठ्या आकृत्या काढणाऱ्या पुष्कळ महिला आहेत. आणि या महिलेला तिच्या या कलेमुळे तिला खूप मान दिला जातो.

ठिपका म्हणजे बिंदू किंवा शून्य. ज्यापासून सगळ्याची सुरवात होते आणि शेवट किंवा अंतही शून्यात होतो. रांगोळीत याचे खूप महत्व आहे. ठिपका दिसला पाहिजे पण तो ठळक असता नये. कारण रांगोळीचा जरी ठिपका महत्वाचा असला तरी त्यापेक्षा त्याभोवतीचे रेखाटन आकृती त्याहीपेक्षा महत्वाची असते.

पूर्वीच्या एकत्र कुटुंबातील स्त्री कशी घरातील प्रत्येक कामात महत्वाची असायची. ती सगळीकडे लक्ष ठेवून साऱ्यांचे हवेनको, नातीगोती, पाहुणे सारे सांभाळायची. पण घर मात्र ओळखले जायचे कुणा पुरुषाच्या नावाने. जमीन जुमला घर सारे कुटुंबप्रमुखाच्या नावावर. सत्ता त्याची. सगळे निर्णय, त्याचे. पण ठिपका मात्र

महत्वाचा तरीही कधी दिसतो न दिसतो असा. म्हणजे त्याचे अस्तित्व असून नसल्यासारखे. पण ठिपक्या शिवाय पूर्ण आकृती किंवा घर कसे बनणार ?

रोज सकाळी नवी रांगोळी ज्या दारात असते ते घर धार्मिक, विश्वासू आणि सज्जन माणसांचेआणि अगदी चांगले शेजारी असे मानले जाई. आणि ज्या घराच्या दारात रांगोळी नसेल तर त्या घरातील माणसे समाजात न मिसळणारी, कसल्याही रीतीभाती न मानणारी, शेजारधर्म न मानणारी असावी असे मानले जात होते. त्यामुळे असा शेजार आपसूकच वेगळा राहत होता.

येणाऱ्या अतिथीचे स्वागत मनापासून होते ते सर्व प्रथम होते ते रांगोळीनेच. एखाद्या उंबरठ्यावरची रांगोळी पाहताना त्या घरातील स्त्रीचे अस्तित्व, घरातील संस्कृती, हे सारे शेजारून पाहणाऱ्या व्यक्तीला न सांगताच कळते. मुक्तहस्त रांगोळीसुद्धा खूप महत्वाची आहे. कारण यात आपली कला मुक्तपणे मांडता येते. ठरवलेल्या जागेत पण ठिपका न काढता त्यामुळे ठराविक आकारात न रेखता आपल्याला हवी त्या आकारात रेखाण्याची मुभा असते. काही वेळा सुरवातीला ठिपके काढून रांगोळी रेखल्यावर मुक्त हस्त महिरप पण काढता येते. म्हणजे कला आणि परंपरा याचा सुरेखसा संगम. किंवा जुन्या नव्याचा मिलाफ.

देवापुढची देवघरातील रांगोळी हा एक सहसा कोणाला न दिसणारा प्रकार. कारण आजकालच्या लहान घरात देवघर वेगळे नसते. असलेल्या जागेत, ओट्याखाली, किंवा एखद्या कोपऱ्यात देवाला जागा दिली जाते. मग त्याच्या समोर कुठली रांगोळी? पण जुन्या मोठ्या घरातील देव मात्र भाग्यवान. आमच्या शिरोड्यातील मोठ्या घरात माझी सासू रोज वेगळी अशी छोटीशी सुबक सुरेख रांगोळी घालते. असे वाटू लागते की देव सुद्धा ते पाहून खुश होत असेल.

ठिपका जोडावा किंवा ठिपक्याभोवती रेघ काढीत वेलबुट्टी काढीत रांगोळी रेखणे हे आपल्या हातात असते. पण पारंपारिक रांगोळी मात्र जोडीत जाणारी किंवा ठिपक्याभोवती फिरणारी. अगदी आदर्श भारतीय स्त्री सारखी. कायम आपल्या कुटुंबा भोवती, नवरा मुले आई वडील सासू सासरे, घर याभोवती तिचे तन मन कायम फिरत असते. ती जगात कुठेही असली तरी आपल्या या माणसाभोवतीचे लक्ष कायम असते. मनाने ती कायम या ठिपक्यां भोवती फिरत असते किंवा मग हे सारे ठिपके स्वत:च पूल बनत - रेष होऊन जोडीत राहते. हा सारा तोल सांभाळत जाते आणि मग जणू तिचा अवघ आयुष्य बनते सुरेख रांगोळी!!!!! अशीच एक ठिपक्यांची रांगोळी, अगदी सोपी साधी तरी काही वेळा मुक्तहस्त वाटणारी --आपल्यासाठी.



दिनांक शनिवार २२ जुलै २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळीतील नाग प्रतिमा


श्रावण महिना म्हणजे सणाचा व्रत वैकल्याचा महिना. सृष्टी हिरवा शालू ल्यालेली आणि एकंदरीत वातावरण आनंदी समाधानी. त्यातच घराघरातून अनेक पूजा सुरु होतात. अलीकडे शहरी भागात याचा काही प्रभाव जाणवत नसला तरी खेडेगावात, विशेषत: कोकण, आणि गोव्यात तरी अजूनही सारेच सणाना खूप उत्साह असतो.

नागपंचमीचा सण हा श्रावण महिन्यातील पहिला आणि सर्वत्र साजरा केला जाणारा. घरात नागाची प्रतिमा काढून किंवा नागाच्या मुर्ती आणून पुजा केली जाते. घरात नागाची पुजा केल्यानंतर त्याचे घरात वास्तव्य राहिल म्हणुन बाहेर जाऊन वारुळाचीसुध्दा पुजा केली जाते. नागोबाची पुजा करून त्याला दूध लाह्यांचा नैवद्य दाखवतात. या दिवशी नागाला ईजा होऊ नये म्हणून शेतकरी शेतात नांगर देखील फिरवत नाही. या दिवशी घरात विळी देखील वापरली जात नाही. नागपंचमीच्या कथेनुसार यादिवशी विळी, कोयता नांगर वापरायचा नाही.

फार पुर्वीपासुन आपल्याकडे नागाला देव मानून पुजा करण्याची परंपरा आपल्या संस्कृतीत रुढ आहे. शेतातील उंदरांचा साप नाश करतात म्हणून सापाला शेतकऱ्याचा मित्र म्हणतात. प्राणी व पक्षी यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सण साजरे करण्याची प्रथा आपल्या संस्कृतीत फार पुर्वी पासून आहे. म्हणूच आपल्याकडे नागपंचमी साजरी केली जाते.

खर तर या दिवशी पारंपारिक रित्या पूजा करतात ती नागाच्या भिंतीवर काढलेल्या चित्राची किंवा पाटावर नागाची रांगोळी काढून. आणि जुन्या लोककथेप्रमाणे एका बहिणीने नागाला आपला भाऊ मानून उपास करून त्याची पूजा केली आणि त्याला नैवेद्य म्हणून दुध आणि लाह्या दाखवल्या. म्हणून नागाने म्हणजे तिच्या भावाने तिच्या इच्छा पूर्ण केल्या. दक्षिण कोकणात अजूनही बहिण आपल्या भावासाठी उपास करतात. नागाला देव म्हणून नाही तर आपल्या कुटुंबातील एक म्हणजे आपला भाऊ मानणे ही आपली संस्कृती. रक्षाबंधना एवढच याही सणाला महत्व आहे, पण आजकाल हे कोणाला माहितीही नसते.

खरा नाग आपल्या भागात पुजत नाहीत पण आजकाल कोणीतरी एखादा नाग टोपलीतून आणून पुंगी वाजवून त्याला डोलावतात आणि त्याच्या नावावर आपले पोट



भरतात. मुक्या प्राण्यांचे हे असे हाल करावे असे आपल्या पूर्वजांना कधीच वाटले नसेल. या सणामागील शास्त्र न समजता ज्याला पुजायचे त्यालाच उपाशी ठेऊन आपल्या पुंगीवर डोलवायचे काम केवळ मनुष्यच करू शकतो. त्यावेळी सुद्धा मातीची नागप्रतिमा किवा चित्र रांगोळी याचीच पूजा होत असे. पर्यावरणाची काळजी आपले पूर्वज अशा रितीने करीत होते. नागफणीची रांगोळी तर सर्वत्र प्रसिद्ध आहे.

दक्षिण भारतात या वेगवेगळया नागप्रतिमा रांगोळीतून पाहायला मिळतात. आपल्या नृसिंव्हवाडी मंदिराच्या परिसरात अनेक भगिनी नागप्रतिमा दारासमोर वेगवेगळया शैलीत रेखतात. प्रत्येकीची पद्धत, रेखन, नाजूकता, कलात्मकता वेगळी. पण अर्थ एकच नागप्रतिमा. विविधतेतून एकता याहून वेगळी कशी मानावी!!!कधी यात नर मादी अशी जोडी असते तर कधी एकच नाग असतो.

असेच प्रत्येक सणाला आपण वेगळी आणि सुंदर रांगोळी काढू शकतो. त्यातूनच आपला वेगळेपणा आणि आनंद साजरा होवू शकेल. सोबत एका नागफणीची अगदी सोप्पी रांगोळी!! काही मिनीटे लागतील काढायला.. .. .. .. .. ..

दिनांक शनिवार २९जुलै २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळीतील शंख प्रतिमा

संस्कृत मधील “रंगावली” या शब्दापासून रांगोळी शब्द तयार झालेला आहे. धार्मिक आणि मंगलमय कार्यक्रमात रांगोळीची नेहमी आवश्यकता भासते. रांगोळी नसेल तर तो सण, कार्यक्रम अपुरा भासतो. कार्यक्रमातील सुंदरता आणि धार्मिक आत्मीयतेचे ती दर्शन घडविते. रांगोळी हा भारतीय संस्काराचा एक उत्तम प्रकार आहे.

### सध्याची रांगोळी भुकटी तयार करण्याची पद्धत

डोलोमाइट नावाचा एक प्रकारचा दगड प्रथम भट्टीत भाजून मग त्यास बारीक कुटुन व त्यास वस्त्रगाळ करून वा चाळुन काढतात. ती बनते रांगोळी. त्यास वेगवेगळया प्रकारचे रंग देउन रंगीत रांगोळी तयार करतात. संगमरवराच्या फॅक्टरीतुन ते कापत असतांना जी भुकटी तयार होते तीपण रांगोळी म्हणुन आजकाल वापरतात.

तरीही दक्षिणेकडे काही विशिष्ठ पूजेसाठी तांदुळाची भिजत घालून वाटून तयार केलेली पेस्ट अजूनही रांगोळीसाठी वापरतात. विशेषत: काही देवीच्या पूजेच्या रांगोळया त्याच रीतीने घालायची प्रथा रूढ आहे. प्रत्येक रांगोळीचा एक सांकेतिक अर्थ असतो. त्यातील वेगवेगळे त्रिकोण चौकोन, षटकोन अष्ट कोन विशिष्ट रंगानेच रंगविले जातात. आणि या रंगोळीचीच देवता स्वरूप पूजा केली जाते.

रांगोळीचा छंद जोपासता जोपासता अचानक हाती गवसतो तो आनंदाचा घडा, ज्यामध्ये कुटुंबीय आणि कळत न कळत मित्रपरिवार शेजार पाजार सगळ्यांना सामावून घेता येते. अनेकजणी थांबून थबकून आपल्या दारातील रांगोळी पाहताहेत हे पाहून घालणारी अगदी आनंदून जाते. हा आनंद आपल्याला कोणत्याही गोष्टीशी तुलना करता येत नाही. कारण यामध्ये वेळ पैसा खर्च अगदी नगण्य. यातून कोणाचा दुस्वास नाही, द्वेष नाही, असतो तो निखळ शुभ संकेत, आपल्या कुटुंबासाठी, परिवारासाठी आणि समाजासाठी. संशोधन असे सांगते की सातत्याने रांगोळी घालण्याने मानसिक स्थिरता मिळते.


रांगोळी शिकवण्यात सुद्धा खूप समाधान मिळते. त्यामुळे ज्यांना ही कला येते त्यांनी जरूर एखाद्या सुट्टीच्या दिवशी ठरवून आवड असलेल्या तरुण मुला मुलीना शिकवता येईल. यातून आपल्या प्रथा संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोचवल्याचे खूप मोठे समाधान नक्कीच लाभेल.

अनेक सणामधे रांगोळी वेगवेगळी रांगोळी रेखली जाते. त्या त्या देवतांची विशिष्ठ अशी रांगोळी असते. एवढच काय प्रत्येक वाराची वेगळी रांगोळी असते. पण यासाठी त्याचा अभ्यास आणि सराव असावा लागतो.

ज्यांना रांगोळी काढायला वेळ नसतो त्यांच्यासाठी आजकाल खूप सुंदर स्टेन्सील मिळतात आणि अगदी काही सेकंदात खूप सुबक अशी रांगोळी तयार होते. पण त्याला जिवंत पणा मात्र नसतो. एका छाप्याच्या पण सुबक रांगोळया. म्हणून शक्यतो आपण छाप स्टेन्सिल न वापरता आपल्या हातानी अगदी लहान तरी रांगोळी काढावी. काही दिवसातच सराव होतो. आणि आपणच आपल्या रांगोळीच्या प्रेमात पडू लागतो. आणि नवनवीन छोट्या रांगोळया अगदी कमी वेळात काढू लागतो.

आता येणार आहे तो सण म्हणजे नारळी पौर्णिमा किवा रक्षा बंधन. यात समुद्राला नारळ अर्पण करून त्याची पूजा करतात. हे जलपूजन आहे. आपल्या देशाला लाभलेल्या कित्येक किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा आणि त्यावर अवलंबून असणारे कोळी बंधू भगिनी यांचा हा एक मोठा सण. म्हणूनच या सणाला दर्यापूजन केले जाते. त्याला अर्पण करायचे ते श्रीफळ म्हणजे नारळ. या दिवसाचा आणि नारळाचा खूप संबध आहे. या दिवशी नारळीभात, खोबऱ्याच्या वड्या करतात. नारळ म्हणजे शुभतेचे प्रतिक असते. नवीन कार्याची सुरवात नारळ ठेवून किंवा तो वाढवून करतात. असा हा नारळ म्हणजे प्रत्यक्ष गणपती सुद्धा मानतात.

दर्याराजातील शंखाची एक रांगोळी काढून आपली नारळी पौर्णिमा साजरी करूया.. .. .



13 - 7

दिनांक शनिवार ५ ऑगष्ट २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

# रांगोळीची महिरप

श्रावण आणि मंगळागौर हे दोन्ही शब्द एकात एक गुंफल्यासारखे. दोन्हीपैकी एक नाव घेतले की दुसरे लगेच मनात येतेच. नव्या नवरीची कोडकौतुकाची मंगळागौर, त्यानिमित्ताने तिचे माहेरी येणे, सजणे, मैत्रिणी किंवा वशेळ्या म्हणजे तशाच नव्या नवऱ्या. बरोबरच्या सख्यांनी घेतलेली फिरकी, चिडवा चिडवी, मस्करी, हास्य विनोद, आणि खूप महत्वाचे असे उखाणे असे सारेच अजूनही पुष्कळ ठिकाणी आवडीने हौसेने करतात. वेळ जागा या साऱ्याची कमतरता असूनही जमेल तशी हौस केली जाते. या पूजेला लागणारा चौरंग आणि त्याभोवतीची रांगोळी, सजावट ही सुद्धा खूप महत्वाची. मंगळागौरीची पत्री म्हणजे तर निसर्गपूजन. काही वेळा पूजेत ही पत्री सुद्धा रांगोळीसारखी सजवून ठेवतात. सकाळी पूजा मग आरती आणि त्यानंतर नैवेद्य. यानंतर पूजेच्या ठिकाणी चौरंगाभोवती घालायची सुरेखशी रांगोळी. ही रांगोळी बऱ्याचवेळा मुक्तहस्त तर कधी ठिपक्यानी काढलेली. ही रांगोळी खूप मोठी काढायची नसते. सुबक नेटकी आणि नाजूक अशी रांगोळी सायंकाळी होणाऱ्या हळदीकुंकू आणि रात्रीचे खेळ यात टिकली पाहिजे आणि उठून दिसली पाहिजे. पण ती घालताना खूप वेळपण वाया जाता नये.

रात्री फुगडी झिम्मा पिंगा घालताना सारे भान विसरून लहान थोर महिला भाग घेतात. सासुरवाशी सून रुसून बसली कैशी म्हणत असताना फेर धरलेली प्रत्येकजण मनातून रुसून बसलेली सून झालेली असते. आणि सासरा, सासू नणंद, जाऊ दीर समजावून जातात. पण आपला सखा येऊन बोलावतो तेव्हाच ती हसून जाते.

या साऱ्या खेळात ती अगदी मनापासून रमते. कोणत्याही वयाची स्त्री या तीन गोष्टीत रमतेच. एक म्हणजे मेंदी, दुसरी फुगडी आणि तिसरी आपली रांगोळी. मग त्यात सुशिक्षित, अशिक्षित, कोणत्याही वयाची महिला आपला थोडातरी सहभाग रस दाखवतेच. कधी एखादी त्यातील कलेत रुची घेईल तर कधी स्वत: काढेल, आणि कधी काढणारीला दोन सल्ले पण देईल. पण या तिन्ही कलेत भारतीय स्त्री यात कधी न कधी मनापासून रमतेच.

आपली मुक्तहस्त रांगोळी अशी सोपी पण तेवढीच कठीण, कारण वेलबुट्टी नाजूक नजाकतदार असली तरच सुंदर दिसते. म्हणून पुष्कळ वेळा ठिपक्यांची रांगोळी

सहज स्वीकारली जाते. कारण यात कुठेतरी आखीव पणा येतो. चौरंगाभोवतीची रांगोळी सोपी नाही कारण चौरंगासमोर पूजेसाठी उभ्या बसलेल्या कोणाचाच हात पाय बोट लागता नये. शिवाय तिथे असलेले पूजेचे सामान म्हणजे पंचपात्री, पळी, ताम्हण, फुले नेवेद्य ठेवायला अडथळा येता नये. अशी अनेक व्यवधाने ठेवावी लागतात. तशीही आजच्या स्त्रीला संसारात ठेवावी लागणारी कसरत पहिली तर हे सहजच सोपे आहे.

एक चौरंग जो तिथे ठेवलेला आहे, पूजा आरती झाली आहे आणि सायंकाळी पुन्हा होणार आहे, पुष्कळ लोकांचा छोट्या मोठ्यांचा वावर असणार आणि रात्री फुगडी खेळ एवढ्यामधे ती रांगोळी उठून दिसली पाहिजे आणि सुंदर वाटली पाहिजे त्याचबरोबर टिकली पाहिजे. हे म्हणजे कोल्ह्याचे निमंत्रण ‘ आमगेर येऊ नको, तुमगेर जेऊ नको आणि उपाशी राहू नको’ असे होते. तरीही चौरंगाभोवती रांगोळी असतेच. हेच तर वैशिष्ट्य आहे, रांगोळी या कलेचे. कारण रांगोळी घातल्याशिवाय ती जागा शुद्ध पवित्र मानली जात नाही. म्हणून दारातील आणि देवघरातील रांगोळी एवढीच पाटाभोवतीची आणि चौरंगाभोवती आणि ताटा भोवतीची रांगोळी महत्वाची असते.

एक पंगत ताटे पाट मांडली आहेत. ताटा भोवती सुंदरशी रांगोळी आहे. बाजूला एक मंद अगरबत्ती. साधे पण सजवलेले ताटातील विविध पदार्थ. ही काही राजा राजवाड्यातील वर्णने नसून काल पर्यंत आपण मनापासून मानीत आलेली संस्कृती आहे. यात सगळ्यात आवश्यक ही रांगोळी. आपण कोणत्याही सणाला, वाढदिवसाला अशी रांगोळी काढून अगदी काही वेळातच आपले घर एकदम वेगळे आकर्षक करू शकू. म्हणून आज अशीच रांगोळी आपल्यासाठी सोबत आहे. आपण ही रांगोळी पाट, चौरंग, ताट याभोवती थोड्या फरकाने घालू शकाल.. .. .





दिनांक शनिवार १२ ऑगष्ट २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी
रांगोळी स्वातंत्र्यदिनाची

रांगोळी म्हणजे स्त्रीचे स्वत:ची कला प्रदर्शित करण्याचे तिला मिळालेले पारंपारिक रित्या संस्कृतीने दिलेले स्वातंत्र्य. त्यामुळे ते स्वातंत्र्य घेऊन ती महिला आपल्या आई, मावशी, आजी आत्या अशा कडून मिळालेली ही कला आपल्या मेहनतीने फुलवते, त्यात भर घालीत जाते आणि त्यातूनच आपले वेगळे असे रांगोळीचे रूप निर्माण होत जाते. त्या रांगोळी चे स्वरूप बदलले पण मूळ ढाचा मात्र तोच राहिला. भारतावर झालेल्या अनेक परकीय, परधर्मीय आक्रमणात आणि शतकाहून अनेक वर्षे अनेक अत्याचार होऊन आपली संस्कृती टिकली ती अशा अनेक प्रतीकातूनच. मग ती लोकगीते असो लोककला किंवा हस्तकला.

गेल्या वर्षी म्हार्दोळ येथे एका लोहारकाम करणाऱ्याच्या झोपडीपुढे त्याच्या छोट्या मुलीने एक तिरंग्याची रांगोळी रेखली होती. एक गरीब, हाताच्या पोटावर, कष्टाने जगणारे. भिंत नाही छप्पर नाही, एका झोपडीत राहणाऱ्या एवढ्याशा त्या मुलीला आपल्या देशाचा आणि स्वातंत्र्य दिनाचा अभिमान पाहून आमची सुखवस्तू मान खाली झाली. त्या मुलीचे किती कौतुक करावे??? काही महिन्यासाठी गोव्यात वास्तव्य असणारे, वीज पाणी शौचालय यासारख्या प्राथमिक सुविधा नसताना लोहारकामासारखे कष्टाचे काम करणारे आई बाप. "लेऊ लेण गरीबीच, चण खाऊ लोखंडाच" असे ते गीताचे शब्द जिवंतपणे पाहायला मिळावे अशी स्थिती. तरीही देशप्रेम देशभक्ती व्यक्त करणारी ही मुलगी नकळत आम्हाला अनेक धडे शिकवून गेली. ही रांगोळी सोबत देत आहे.

परिस्थितीचा बाऊ करायचा नाही, आपल्या कलेला आणि देशाला विसरायचे नाही. आणि असलेल्या तुटपुंजा साधनातही व्यक्त होण किती सहजपणे साधून गेल तिला!!!. आपल्या देशासाठी केलेल्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांच्या त्यागातून आम्हाला मिळालेले हे स्वातंत्र्य आणि त्यामुळे त्यासाठी भोगलेले त्रास, त्याचे महत्व विसरलेली किंवा माहिती नसलेली आजची पिढी यांना हे भान येण्यासाठी असे काही प्रयत्न आणि अशा अंधारातल्या कलाकारांचे कौतुक होणे ही काळाची गरज आहे. म्हार्दोळ मधील काही समाजप्रेमी व्यक्तींनी, कृतार्थ सारख्या संस्थानी तिची दाखल घेतली हे मात्र खरे. त्या कुटुंबाला काही मदत सुद्धा केली होती.

यानंतर साजरा होणार असलेल्या भारतीय स्वातंत्र्यदिनाला त्या रांगोळीची आणि ती रेखाणाऱ्या त्या छोट्या मुलीची आठवण अगदी मनातून येते आहे. प्रत्येकाची देशभक्ती देशप्रेम व्यक्त करण्याचे वेगवेगळे मार्ग असू शकतील. "**आपल्या समृद्ध परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन**". हे आपल्या कृतीतून व्यक्त केले त्या इवल्याशा मुलीने. अशा आपल्या पुढच्या पिढीचे कौतुक करणे ही सुद्धा एक प्रकारे देशभक्ती आणि बंधुत्व दाखवणारी आहे. आजूबाजूच्या अंधारात आणि निराशेत ही एक पणती मिणमीणती असेल पण ती तिथे पेटती आहे आणि त्या प्रकाशात आपली वाट नक्कीच सापडेल.

आपल्या परिसराची, गावाची, शहराची स्वच्छता ठेवणे ही एक मोठी गरज आहे. म्हणून रांगोळीला महत्व आहे. कारण एखाद्या परिसरात रांगोळी काढण्यापूर्वी ती जागा स्वच्छ करावी लागते. मग ती पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे शेण सारवून, शेण सडा घालून असेल किंवा आताची फारशी, लादी, रस्ता, धुवून असेल. पण अपवित्र अस्वच्छ ठिकाणी रांगोळी काढीत नाही हे खरे. त्यामुळे त्यानिमित्ताने आपण हे एक स्वच्छता अभियान राबवायला हरकत नाही.

या स्वतंत्र्यदिनासाठी आपला परिसर स्वच्छ ठेवून रांगोळी घातली तर त्यातून एक प्रकारे देशप्रेमच व्यक्त होईल. आणि देशप्रेम दाखवायला स्वातंत्र्यदीनाची वाट का पहायची असेही वाटू शकते. एका दिवसापुरते देशप्रेम काय कामाचे ? म्हणून आपल्या नित्य क्रमात आपण परिसर स्वच्छता करायची इच्छाशक्ती दाखवायला हवी. आपल्या निसर्गसुंदर धबधबे झरे नद्या याच्या परिसरात सापडणाऱ्या बाटल्या प्लास्टिक पिशव्या कोणीतरी तिथे फेकलेले असतात. म्हणून या साऱ्या सवयी कधीतरी बदलूया. आपणही या छोट्या मुलीसारखे देश भक्ती केवळ रांगोळी नाही तर अनेक मार्गांनी दाखवू शकतो. ही रांगोळी घालणारी मुलगी आज जगाच्या पाठीवर कुठे असेल माहिती नाही कारण या कुटुंबाला कायम वेगवेगळया गावात फिरून पोट भरावे लागते. पण माझ्या आणि तुमच्या मनात प्रत्येक स्वातंत्र्य दिनी ही रांगोळी आणि ती अप्रसिद्ध देशप्रेमी कलाकार आठवतच राहील !!!!!!!!!!


मेरा
भारत
महान
15-8-2016


मेरा
भारत
महान
15-8-2016

दिनांक शनिवार १९ ऑगष्ट २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## तिचे व्यक्त होणे --- रांगोळीतून

रांगोळी म्हणजे घराच्या अंगणात, देवघरात, उंबऱ्यावर, तांदळाच्या पीठाने, वालीने, दगडाच्या बारीक पावडरने किंवा फुलांच्या पाकळयांनी काढलेली अल्पजीवी म्हणूनच अनोखी अशी कला. आजची रांगोळी उद्या त्याच जागी त्याच पद्धतीने त्याच रीतीने काढली तरी काहीतरी वेगळेपणा दिसतो. म्हणून प्रत्येक दिवसाची रांगोळी ही त्या त्या कलाकाराची आजच्या फेशनच्या परिभाषेत युनिक क्रिएशन म्हणता येईल. कारण कारण ती घालताना त्या कलाकाराची मनस्थिती, हाताशी असलेला वेळ आजूबाजूचा कोलाहल यावर अवलंबून असते. रांगोळी म्हणजे केवळ सजावट नसून त्या काढणारीचे होणारे स्वत:चे असे व्यक्त होणे आणि शुभ संकेत दाखविणारी असते.

अनेक वेळा निसर्गात आढळणारे प्राणी पक्षी वनस्पती फळे यांच्या प्रतिकृती रांगोळीत येतात. हत्ती, मोर, पोपट, तुळस, बेलाचे पान, केळी, आंबा, नारळ, अशा अनेक आकृत्या रांगोळीत शुभ मानल्या जातात. सर्वसाधारण पारंपारिक रांगोळी म्हणजे सुख समृद्धी, आतिथ्य, समाधान, आणि भरभराटीचे प्रतिक. पूर्वी सकाळी अंगण गायीच्या शेणाने स्वच्छ सारवून त्यावर पांढऱ्या रंगात रेखलेली रांगोळी केवळ हळद पिंजरीने सजायची. त्यानंतर पूर्ण दिवसात कितीही मोठा वारा आला तरी रांगोळी मात्र अविचल. अगदी बारीकशा पावसालाही ही रांगोळी दाद देत नसे. दुसऱ्या दिवशीची सकाळ होईतो रांगोळी बऱ्याचदा जशीच्या तशी असायची. कायम अंगण हसते बोलते वाटे. त्यावेळच्या पिढीसारखी. पूर्वीची माणसे आजूबाजूची वादळे संकटे सहज झेलत, पचवित आणि रिचवित. एकमेकांना आधार देत पुन्हा नव्या दिवशी तयार असायची नव्या उत्साहाने. आपली संयुक्त कुटुंबपद्धती होती. अनेक बंधने होती. त्याचबरोबर सामुदायिक अशी कर्तव्य भावना आणि ममता होत. त्यामुळे यात सारे सहज व्हायचे. यामुळे याउलट आताची पिढी छोट्या मोठ्या नकारानी निराश होते. परीक्षेत एखादा विषय राहिला कि लगेच वाईट विचार आणि ते घालवायला समुपदेशन. खर तर एखाद्या परीक्षेने सारे जीवन कसे मोजणार?? आणि पुढे आयुष्यात अशा अनेक परीक्षा कळत नकळत द्याव्या लागतात. त्यासाठी छोट्या मोठ्या नकाराना पचवायला पाहिजे ते सारवलेल्या अंगणातील रांगोळीसारखे. रोजचा दिवस नवा मानावा आणि नव्या उत्साहाने दिवसाला सामोरे जावे.

आजकाल मी स्वच्छ लादी पुसून घातलेली रांगोळी वाऱ्याच्या झुळुकी बरोबर उडायला तयार आणि मग स्वत:चे रूपही घालवून बसते. आता ते अंगण आणि शेणसडा काही परत आणणे आपल्याला शक्य नाही पण निदान असलेले मनाचे अंगण तरी नेहमी स्वच्छ आणि निर्मळ ठेवीत हसत राहणे जमवायला हरकत नाही. यातून आपले रोजचे व्यवहार सोपे आणि सरळ होवून जातील.

श्रावण भाद्रपद म्हणजे आपले धार्मिक, सांस्कृतिक वैभवाचे सणांनी भरलेले दिवस. या दिवसात मनात आणि घरात रोज नवी रांगोळी घालणे शक्य असेल तर उत्तमच. नाहीतर निदान सुटीच्या दिवशी तरी.. काही सोप्या रांगोळ्या घालून पाहायला सुरवात करूया. रोजच्या रांगोळीतून आपली कला, कौशल्य दाखविता येते. शिवाय त्यातून अनेक शुभ संकेत आपल्या घरात येणाऱ्या पावलांना सहज मिळतात. रांगोळीतून एकाग्रता, आणि मानसिक समाधान तर नक्कीच मिळेल.



दिनांक शनिवार २६ ऑगष्ट २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी



**श्री गणेशाय नमः**

चौदा विद्यांचा आणि चौसष्ट कलांचा अधिपती बुद्धिदाता श्री गणेशचे आगमन घराघरात झाले आहे, आणि अशा लाडक्या बाप्पाच्या साठी किती रोषणाई सजावट करावी हेच कळत नाही. वर्षातून एकदा घरात येणारा गणेश विघ्नहर्ता सुखकर्ता म्हणूनच खूप आवडता देव. भक्त याला मिरवणुकीने नाचत गात आणतात, घरात पक्वान्नानी खिलवतात. नातेवाईक मित्रमंडळी सारेच जमतात आणि असे आनंदी हसरे वातावरण बनते. या देवासाठी अनेक करमणुकीचे कार्यक्रम होतात. असेच मिरवणुकीने त्याचे विसर्जन सुद्धा केले जाते. असे भाग्य आणखी कोणत्याही देवाच्या वाटेला येत नाही.

तशीही श्री गणेशाची पूजा इतर कोणत्याही पूजेच्या आरंभी करतात. कोणत्याही शुभ प्रसंगी, शुभ कार्याचा आरंभ गणपती पूजनानेच होते. त्याशिवाय कोणत्याही पूजेला सुरवात होत नाही. एवढंच कशाला, आपल्या साऱ्यांची मराठी शिक्षणाची सुरवात श्री गणेशाय नमः असे पाटीवर लिहूनच होते. कोकण आणि गोवा प्रांतात घरोघरी पार्थिव गणपतीची पूजा करतात. आणि मुंबई पुणे इ ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या दबाजात साजरा होतो. लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यापूर्वी समाज सुधारणेसाठी लोकांनी एकत्र यावे म्हणून सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती हे उत्सव सुरु केले. आजकाल दिसणारे बाजारी स्वरूप तेव्हा नव्हते. अशा कानठळया बसवणारे संगीत, ते वेडेवाकडे नाच, त्यातून अभिप्रेत होणारे बीभत्स अर्थ आणि गणेशोत्सव सादर करणाऱ्या लोकांनी सामान्य जनतेची केलेली सतावणूक, अडवणूक आणि वाया जाणारा पैसा, तरुणाई पाहिली की वाटते लोकमान्य आज नाहीत तेच बरे आहे.

या गणपतीच्या आवारात एकच चांगली गोष्ट म्हणजे त्यानिमित्ताने दिसणारी सुबक अशी संस्कारभारतीची रांगोळी. त्यामुळे ही जागा आणि परिसर पवित्र बनतो. या निमित्ताने रांगोळी, गायन, आरती, घुमट आरती व इतर अनेक छोट्या मोठ्या स्पर्धा आयोजित होतात. कलाकारांना संधी मिळते. यामुळे चौसष्ट कलांचा अधिपती हे त्या गणेशाचे नाव शोभते.

या घरगुती आणि सार्वजनिक सजावटीचा एक महत्वाचा भाग म्हणजे रांगोळी. यावेळी घरोघरी आपल्या आपल्या बोटातील कला पणाला लावून घरातील गृहिणीबरोबर बालगोपाळ सुद्धा रंगून जातात. अशा या गणपतीचे चित्र आपल्याला पाहिजे त्या आकारात काढतात. याशिवाय गणपतीला स्वतःचे असे वेगळे रूप आहे. हत्तीची सोंड, एकदंत आणि धूम्रवर्ण अशा वर्णनांनी सजलेली त्याची आकृती वेगवेगळया तऱ्हेने रेखतात. रंगीत रांगोळी असेल तर ठीक नाहीतर केवळ पांढऱ्या रंगाची सुद्धा रांगोळी चालते. तसेच अनेकवेळा फुले फुलांच्या पाकळयांची विशेष म्हणजे त्याच्या आवडत्या जास्वंदीच्या लाल रंगीत फुलाची खूप वेगळी आणि "पर्यावरण"पूरक रांगोळी पाहायला मिळते. कधी तर गणपतीला वाहायच्या दुर्वा किंवा पत्री या खूप सुंदर रित्या मांडून एक आगळी कलाकृती सादर होते. निसर्गाशी नाते सांगणारा हा देव आपल्या अंगातील अनेक कलांना प्रेरणा देत असतो. या साठी सजवली जाणारी माटोळी म्हणजे परिसरातील सुंदर

फुले, फळे आणि पानांचा आपल्या देवांसाठी मांडलेला नयनोत्सव. अलीकडे पुष्कळ ठिकाणी माटोळी स्पर्धा घेतात. गावागावातून असलेले सुप्त कलाकार आणि त्यांच्या कला पाहण्याचा योग त्यामुळे येतो. निसर्ग आणि मानव यांचा अतूट असा संबध यातून व्यक्त होत असतो. एकदा एका सार्वजनिक गणपती साठी पूर्ण दुर्वांचा गणपती पहिला होता. या दुर्वा दोन महिन्याआधी त्या गणपतीचा मातीचा आकार करून त्यात रुजवून त्यांची निगराणी करून हा गणपती तयार झाला होता. यामागे त्या कार्यकर्त्यांची मेहनत, पर्यावरणाची तळमळ सारेच वाखाणण्याजोगे. तशाही गणपतीच्या खूप सोप्या आणि सुंदर रांगोळ्या असतात. सोबत एक अशीच रांगोळी –अर्थात ओमकार रुपी गणपतीची.. .. .

दिनांक शनिवार २ सप्टेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## मांडणा राजस्थानची

मांडणा – म्हणजे एक वेगळी अशी राजस्थानी रांगोळी. ही रांगोळी वर्षभर घातली जाते. चुन्याच्या पातळ अशा निवळी पासून कापसाच्या बोळयाचा वापर करून घराच्या भिंतीवर अंगणात, प्रवेशद्वारा वर ही रांगोळी किंवा रंगकाम केले जाते. नेहमीसाठी पांढरा रंग पण सणा समारंभासाठी मात्र लाल माती म्हणजे गेरूच्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या चुन्याच्या रंगाने रंगकाम करतात. साधारण पणे हे आकार भौमितिक आणि समतोल असतात. काही विशिष्ट अशी मांडणाच्या आकृत्या या कलेचे प्रतिनिधत्व करीत राज्याबाहेर मिरवीत असतात. झाडाच्या फांदीचा लहानसा तुकडा एका बाजूने मऊ करून त्याभोवती कापसाचा बोळा गुंडाळून तो पारंपारिक ब्रश असा तयार करीत असत. बऱ्याच खेड्यातील घरांच्या भिंती या अशा पद्धतीने सजवल्या जातात. या रांगोळीत वर्तुळ, त्रिकोण, चौरसाकृती असे अनेक आकार एकात एक किंवा स्वतंत्रपणे काढले जातात. यात टिंब बिंदू सरळ रेषा अशा अनेक आकृत्यांनी ही रेखतात. यात प्राणी, पक्षी, फळे पाने अशा निसर्गातील साधारण आढळणाऱ्या आकृत्या सुद्धा असतात. काही वेळा काही धार्मिक संकल्पना त्यात असतात.

सणाच्या दिवशी अत्यंत कलात्मक अशा मांडणा रांगोळ्या घराच्या उंबऱ्यावर किंवा घराच्या दारासमोर काढल्या जातात. यात सुरवातीला गेरूने जमीन लाल रंगाने रंगवली जाते आणि त्यावर अशा त्या सणाच्या वैशिष्ट्य पूर्ण मांडणा असतात. भारतातील इतर भागातील रांगोळ्याप्रमाणे ही रांगोळी सुद्धा महिलाच काढतात. सकाळी उठून ही मांडणा काढताना त्याची काही गीते गात गात आपल्या कुटुंबाच्या उत्कर्षासाठी, शांती समाधान यासाठी प्रार्थना केल्या जातात.

मांडणा म्हणजे रंगांच्या ओळी. मांडणाचा अर्थ सजवणे किंवा सुंदरता असाही असतो. पारंपारिक लग्नात घरातील स्त्री घराच्या प्रवेशद्वारावर किंवा भिंतीवर अशा वेगवेगळे मांडणे पाहुण्यांच्या स्वागतासाठी रेखते. धार्मिक पूजा, आणि घरातील आपल्या कुटुंबातील महत्वाचे जन्म, लग्न यासरखे प्रसंग मांडण्याविना होत नसतात. ही चित्रे धार्मिक प्रयोजनार्थ काढत असल्यामुळे यात मुख्यत्वे त्या त्या सणाची देवता, आणि त्याचे संदर्भ येतात. याचे ‘शुभ मांगलिक’ असे एक तांत्रिक नाव आहे.

पौराणिक काळापासून ही प्रथा राजस्थानातील गावागावात आहे. राजस्थान म्हणजे 'राजाची जागा किंवा ठिकाण' प्राचीन काळापासून सण पारंपारिक रित्या साजरे करताना वेगवेगळी लोकनृत्ये, गाणी म्हटली जातात. त्याचबरोबर ही मांडणा रेखणे हेही त्या सणाचाच भाग मानला जातो. नवरात्र, कृष्ण जन्माष्टमी, दिवाळी, असे अनेक सण उत्साहाने साजरे होताना त्यात रंग भरतो तो मांडणा ने. या सणाच्या दिवशी संध्याकाळी घरातील स्त्रिया वेगवेगळी रंगीत मांडणा काढून आपले घर अंगण सजवतात.

हे आकार घराच्या जमिनीवर आणि भिंतीवरही काढतात. मध्यप्रदेशाच्या काही भागात ही कला आढळते. राजस्थानात भिंतीवर आणि जमिनीवर काढले जाणारे मांडणा मध्यप्रदेशातील भागात मात्र फक्त जमिनीपूरतेच असतात. मांडणा म्हणजे घराचे संरक्षण, देवदेवतांचे स्वागत, आणि सणाचे प्रतिबिंब असेही मानले जाते. सवाई माधोपुर या भागातील स्त्रिया पारंपारिक रित्या अगदी रेखीव आणि नीटस मांडणे काढतात. हे ज्ञान एका पिढीकडून दुसरीकडे सहज आणि न कळत दिले जाते. या आकृत्यामध्ये गणपती, मोर, काम करणारी बाई, वाघ, फुलांचा गुच्छ, देवतांची प्रतीके अशी चित्रे असतात. यांना झुमोर्फस या नावाने आणि मानवी चित्रे भिंतीवर काढली जातात त्याला अन्थ्रोमोर्फस या नावाने ओळखले जाते.

खूप जुनी अशी विशिष्ट जमातीने टिकवून ठेवलेली अशी कला आहे. कोणत्याही औपचारिक शिक्षणाशिवाय आणि गुरूच्या विना हे पिढ्यान पिढ्या परिवर्तीत होत असते. मुली ही चित्रे काढताना आईला पाहूनच शिकत जातात. भिंतीवरची ही चित्रे आपल्याला 'वारली पेंटिंग'ची आठवण करून देतात.

राजस्थान आणि मध्यप्रदेश मध्ये कुमारीका मुली संझी या नावाने ओळखला जाणारा एक सण साजरा करतात. भाद्रपद महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात म्हणजे पौर्णिमेला सुरवात करून अमावस्येपर्यंत म्हणजे पितृपक्षात हा काळ येतो. या सणाचा आणि पूर्वजांचा तसा काही संबध नसतो. पण या कुमारिका आपल्या स्त्री पूर्वजांचे स्मरण करतात. यासाठी काही गीते म्हणत विशिष्ठ अशी मांडणा काढली जाते. सोबत असलेले एक मांडणा चित्र पाहून आपल्याला या संपन्न अशा लोककलेची ओळख होते.



दिनांक शनिवार ९ सप्टेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी ---ओणम ची

उत्सवप्रेमी भारतीय आपल्या आपल्या प्रांतातील सण आनंदाने पारंपारिक रित्या साजरे करतात. या आनंदात मग आपले घर सजवतात ते रंगानी आणि रांगोळीने. रंग म्हणजे उल्हास. आपल्या दक्षिणेकडे असलेले अगदी समृद्ध अशा परंपरांनी नटलेले राज्य केरळ. या राज्यातील वर्षभरातील अत्यंत महत्वाचा सण म्हणजे ‘ओणम’. हा सण मल्याळम मधील पहिल्या महिन्यात ज्याला कोला वर्षांम किंवा चिंगम असेही म्हणतात. अथम या दिवशी सुरु होऊन ते तिरू ओणम म्हणजे दहा दिवस हा साजरा केला जतो. साधारण आपला श्रावण भाद्रपद महिन्याच्या दरम्यान हे दिवस येतात. त्यामुळे याला श्रावणोत्सवम असेही म्हणतात.

हिरव्यागार केरळातील पिक तयार होत असलेला हा मोसम. बळीराजा थोडा सुखावलेला आणि हवाही खूप चांगली असते. पाऊस संपता संपता झालेला हलका शिडकावा आणि सोनेरी उन याचा एक आल्हाददायक मिलाफ यावेळी असतो. कृषिप्रधान आपल्या देशात अशा वेळी आनंद व्यक्त होतात ते अशा सणामधून. शेतातील धान्य सुद्धा तयार होताना आपले सोनेरी पंख मिरवीत सज्ज असते.

श्री विष्णू चा पाचवा अवतार जो वामनावतार म्हणून ओळखला जातो त्याचेच दुसरे नाव महाबली. चिंगम महिन्याच्या विशिष्ट दिवशी हा अवतार राजा म्हणून या राज्यात आला. त्याच्या आठवणीसाठी आणि सन्मान म्हणूनही ओणम साजरा होतो. ओणमच्या सणाला महाबली राजाचा आत्मा केरळात येतो यावर लोकांचा आजही विश्वास आहे. म्हणून हा सण वर्ष भरातील खूपच महत्वाचा असतो. असे म्हणतात की या राजाच्या राज्यात सारी जनता सुखी होती. रामराज्य च जणूकाही. म्हणून या आपल्या आवडत्या राजाच्या स्वागताला फुलांचा गालीचा किंवा रांगोळी दारासमोर घातलेली असते. त्याचबरोबर ओणमसाठी केलेले खाद्य पदार्थ, नृत्य, नाटके असे सारे दबाक्यात ठीकठिकाणी चालू असते. आपल्या राजाला प्रजा सुखात आहे असे कळावे यासाठी ही सारी खटपट. आपल्या प्रजेच्या आनंदात हा राजा सहभागी असतो असे मानले जाते. ओणम हा सण कुलसेखर पेरूमल या राजाच्या काळापासून म्हणजे सन ८०० या वर्षीपासून दर वर्षी साजरा केला जातो.

या सणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पूर्ण केरळ राज्यात सर्व धर्मीय लोक हा सण सारख्याच उत्साहाने आनंदाने साजरा करतात. म्हणून याला राज्याचा सण /स्टेट फेस्टिवलचा दर्जा दिला आहे. केरळाच्या बाहेर इतर राज्यात कामानिमित्ताने स्थलांतरीत झालेले लोक या सणाला आपल्या घरी येतात, आणि हे न जमल्यास आपल्या राहत्या भागात रंगी बेरंगी गालिचे रेखून आपल्याबरोबर आपल्या शेजारी मित्र मंडळींना या उत्साहात सामाऊन घेतात.

यासाठी प्रत्येक घरासमोर, अंगणात, मंदिराबाहेर फुलांची एक वेगळी रांगोळी पाहायला मिळते. याला पुकोलम असे नाव आहे. पु म्हणजे फुले आणि कोलम म्हणजे वर्तुळाकार. त्यामुळे ओणमची फुलांची रांगोळी पुकोलम नेहमी वर्तुळाच्या आकारात पाहायला मिळते. पिवळी केशरी झंडू, शेवंतीची फुले, आणि वेगवेगळया आकारातील हिरवी पाने यांची रंगसंगती साधून विविध आकारात सुंदर रांगोळया सर्वत्र पाहून मन अवाक होते. आपल्याकडे गणपतीच्या समोरची माटोळी आणि ही पुकोलम यांची संकल्पना एकच असावी. सभोवताली मिळणाऱ्या पानाफुलांचा वापर करून सजवणे. काही वेळा फुलांच्या पाकळया तर कधी पूर्ण फुलेच वापरतात. या मोसमामध्ये शेत पिकून तयार झालेली असतात. फुले फळे सुद्धा भरपूर उपलब्ध असतात. त्यामुळे यावेळी उत्साहाला उधाण आलेले दिसते.

हाच उत्साह मनामनातून सर्वत्र घरात आणि अंगणात पसरतो तो फुलांच्या रांगोळीतून. या रांगोळया म्हणजे एक रंगीबेरंगी गालीचा जणू. नेत्रसुखद अशा या रांगोळया नकळत पर्यावरण संरक्षण सुद्धा करतात. कारण याचा कचरा म्हणजे मातीतून जन्माला आलेला आणि मातीत सहज विरत असतात.. अर्थात काही रांगोळया नेहमीच्या असतात. तर काहीवेळा त्यामध्ये शेजारच्या राज्यातील कोलमचा प्रभाव असतो. भारतातील विविधतेतील एकता काही कोणी सांगून शिकवून नसून ती या आपल्या पारंपारिक प्रथा परंपरामधून सहज उमलून आली आहे.





दिनांक शनिवार १६सप्टेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## नवरंगी रांगोळी नवरात्रीची

नवरात्र म्हणजे नऊ रात्री. भारतातील अनेक भागात नवरात्रीची पूजा वेगवेगळ्या रितीने साजरी होते. बंगाल मध्ये दुर्गापूजा हा पूर्ण वर्षातील महत्वाचा सण. तर गुजराथेत या दिवसात रोज रात्री गरबा नृत्य खेळतात. आजकाल हा गरबा पूर्ण देशातही खेळला जातो. नवरात्र म्हणजे देवीच्या विविध रूपांची पूजा. या दिवसात आपल्या शेतातील धान्य तयार झालेले असते. शेतीचे महत्वाचे काम संपत आल्यामुळे आनंद आणि समाधान हे या अशा सणामधून प्रतीत होते. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटकात घटस्थापना म्हणजे मातीच्या घटाची पूजा असते. अशा वेळी पांढरी पिवळी शेवंती, आणि केशरी झेंडू यांची नयनरम्य अशी सजावट पाहायला मिळते. गोव्यातील मंदिरातून देव देवता मखरात बसून वेगवेगळ्या रुपात दर्शन देतात. सजवलेली मखरे, समोरच्या वेगवेगळ्या वाहना वर बसलेल्या मूर्ती (सिंह, मोर, वाघ) इ. इ. आणि त्या देवतांच्या अंगावरचे खरे सोन्या मोत्या हिऱ्याचे दागिने पाहून मन अगदी तृप्त होते. खरेच त्या त्या मंदिरातील देव पृथ्वीवर येऊन मखरात बसला आहे असे वाटते.

प्रत्येक दिवशी दुर्गा माता वेगवेगळ्या रुपात आणि रंगात दर्शन देते असे मानले जाते. म्हणून अलीकडे प्रत्येक दिवसाचा रंग आधीच सोशल मीडियात येतो तो त्या त्या रंगाची साडी तयार ठेवा अशी टिपणी घेऊन. गंमत सोडली तरी आपले आयुष्य वेगवेगळ्या रंगानी भरावे असे साऱ्यांनाच वाटते.

देवी ही ऊर्जा, शक्ती व स्फूर्तीचे प्रतीक आहे. आपण हा सण साजरा करतो वाईटाचा नाश आणि चांगल्याची सुरुवात करण्यासाठी. त्यामुळे आपल्यात जी ऊर्जा, स्फूर्ती, उत्साह व आनंद तयार होतो तो सजावटीमधूनसुद्धा प्रकट होणे जरुरी आहे. त्यासाठी जी सजावट करू त्यामध्ये रंग आणि संगतीला फार महत्त्व आहे. केशरी, पिवळा व लाल ज्याला आपण warm colours म्हणतो असे रंग नवरात्रीमध्ये वापरावेत. हे रंग वापरण्यामागे शास्त्रीय कारण आहे. या रंगांच्या तरंग लांबीमुळे (wavelength) आपल्या शरीरात जे हार्मोन्स तयार होतात त्याने आपल्याला उत्साही व आनंदी वाटते. पण केवळ नवरात्रीसाठी म्हणून घराचे रंगकाम काढणे व भिंतींना रंग देणे शक्य नाही. पण वेगवेगळ्या मार्गांनी आपण ही रंगसंगती साधू शकतो. रांगोळीतील एक प्रकार म्हणजे ही वेगवेगळी कडधान्ये /धान्ये घेऊन केलेली रांगोळी. या धान्यांमध्ये किती तरी वेगवेगळे आकार व रंग असल्यामुळे यापासून केलेली रांगोळी खूप सुंदर दिसते. एका मोठय़ा थाळीत किंवा ट्रेमध्ये

आपण धान्याची रांगोळी काढू शकतो. ही थाळी किंवा ट्रे मूर्ती पुढे ठेवल्यास दरवेळी आपोआप मूर्तीला पूजताना ही धान्येपण पुजली जातील.

या सणाला डेलिया, झंडू, आणि शेवंती या फुलांशी हिरवी पाने जोडीत रंगीत फुलांची रांगोळी पाहायला मिळते. योग्य अशी रंगसंगती साधत घातलेला फुलांचा गालीचा म्हणजे कला आणि परंपरा याचा पर्यावरणाशी योग्य समतोल साधून सादर झालेली रांगोळी. या शिवाय अलीकडे पूजेत वापरले जाणारे साहित्य वापरून एक रांगोळी काढली जाते. अत्यंत सुंदर आणि पुन्हा वापरता येणारे साहित्य वापरून घालता येणारी ही रांगोळी अगदी अनुकरणीय आहे. माझी एक मैत्रीण सौ. वनिता जांभळे या प्रकारची आणि विविध धान्याची त्याचप्रमाणे वाटलेल्या खोबऱ्याचा रस काढल्यावर वाया जाणाऱ्या चोथा सुकवून आणि त्याला रंग देऊन त्याची रांगोळी खूप सुंदर घालते. या रांगोळ्या दुरून पाहताना त्या कशाच्या आहेत हेपण कळत नाही. असे अनेक कलाकार आपल्या कलांनी आपले आणि ते पाहणाऱ्यांचे जीवन समृद्ध संपन्न करीत असतात. वापरल्या गेलेल्या अनेक वस्तू यात पुन्हा वापरून त्यात कला साधत या पर्यावरण पूरक रांगोळ्या घालणे म्हणजे एक आव्हानच आणि रेखल्या नंतर मिळते ते समाधान शब्दात न सांगता येण्याजोगे.

यात पूजेच्या सामानातील तांदूळ, नारळ, सुपारी, रंगीत काठाचे खण, खायची पाने, हिरवी काकणे, नाणी अशा अनेक वस्तू ज्या नंतर पुन:उपपयोगी असतात. त्याची योग्य रंग संगती साधणे आणि आपल्याला लुभावणाऱ्या आकारात ती रेखणे हे त्या त्या कलाकाराचे कौशल्य. पण तरीही त्यांचा आकार सामान्यपणे ओणमच्या पुकालाम सारखा वर्तुळाकार असतो.

येणाऱ्या नवरात्रीसाठी एक रांगोळी – देवीची आणि नवरंगी



दिनांक शनिवार २३ सप्टेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी – समईची--- आई सम ती समई !!!

करुनिया जमीन स्वच्छ । मांडावा पाट पुजेसाठी । काढावी रांगोळी पाटाभोवती । ठेवावा कलश त्यावरी //

रांगोळी हे शुभचिन्ह म्हणून भारतीय संस्कृतीचे आणि संस्कारांचे प्रतीक आहे. भारतात घरातील देवघरापुढे किंवा अंगणात छोटीशी का होईना रांगोळी रोज काढतात. ठिपक्यांच्या, गाठीच्या, वेलबुट्टीच्या, स्वस्तिक, ज्ञानकमळ अशा शुभचिन्हांच्या आणि अगदी अलिकडील काळातील 'संस्कारभारती'च्या मुक्तशैलीच्या, असे रांगोळ्यांचे काही प्रकार प्रचलीत आहेत. शुभ, मंगलकारक शक्तींचे स्वागत करण्यासाठी घराच्या उंबरठ्यावर, घरासमोरील अंगणात, देवघरात आणि तुळशीवृंदावनासमोर रांगोळी काढून लक्ष्मीचे - शुभ शक्तीचे, मांगल्याचे - स्वागत करण्याची प्रथा भारतात पुरातन काळापासून चालत आली आहे. घरे बैठी व पुढेमागे मोकळी जागा असणारी होती तेव्हा घरातील स्त्रिया भल्या पहाटे घरासमोरील अंगण झाडून, शेणसडा टाकून त्यावर शुभ्र रांगोळी काढत असत.

रांगोळी लोकपंरपरेतून जन्माला आली. रांगोळीला संस्कृतमध्ये रंगवल्ली म्हणतात. विशिष्ट शुभ्र चूर्ण चिमटीतून जमिनीवर सोडून रेखाटलेल्या आकृतीला रांगोळी म्हणतात. रांगोळी काढणे ही एक कला आहे आणि तिचा उगम धर्माच्या अनुबंधानेच झाला आहे. माणसे रांगोळी केव्हापासून काढू लागली व रांगोळीची पहिली रेघ कोणी ओढली हे निश्चित सांगणे कठीण आहे. त्या बाबतीत एवढेच म्हणता येईल, रांगोळी ही मूर्तिकला आणि चित्रकला यांच्याही आधीची आहे.

सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिद्धी हे रांगोळीचे दोन उद्देश होत. रांगोळीत ज्या आकृत्या काढतात, त्या प्रतिकात्मक असतात. सरळ रेषेपेक्षा वक्र रेषा ही सौंदर्याची विशेष अनुभूती घडवते. अशा वक्ररेषा आणि बिंदू, त्रिकोण, चौकोन व वर्तुळ यांतून विविध प्रतिकात्मक आकृत्या निर्माण करता येतात. पाटाभोवती रांगोळीचा चौकोन काढला, तर त्याला समोरच्या रेषेवर एक त्रिकोण काढतात. चौकोनाची आडवी रेघ हा त्या त्रिकोणाचा पाया असतो. त्रिकोणाच्या शिरोभागी एक वर्तुळ काढतात. असे केल्याने त्या रेषेला मखराचे स्वरूप येते. चौकोनाचे कोपरे मोकळे ठेवण्याची चाल नाही. त्या कोपऱ्यांवर रांगोळीची एक चिमूट ओढून तेथे त्रिदळाची आकृती काढतात. हे त्रिदळ त्रिभुवन, तीन देव,


तीन अवस्था आणि त्रिकाल यांचे म्हणजेच पर्यायाने त्रिधा विभक्त अशा विश्वतत्त्वाचे प्रतीक असते. शंख, स्वस्तिक, चंद्र, सूर्य ही आणखी प्रतिके होत. रांगोळीच्या दोन समांतर रेषांच्या मध्यभागी दोन वक्ररेषा एकमेकींवर चढवून एक साखळी आकाराला आणतात. ती साखळी म्हणजे नागयुग्माचे प्रतीक असते. कमळ हे लक्ष्मीचे व प्रजननशक्तीचे प्रतीक असून, वैष्णव उपासनेत त्याला विशेष महत्त्व आहे. त्याशिवाय एकलिंगतोभद्र, अष्टलिंगतोभद्र, सर्वतोभद्र अशाही रांगोळया धर्मकृत्यात काढल्या जातात. त्यात मोठ्या चौकोनातील बारीक चौकोन विशिष्ट पद्धतीने, कुंकवाने भरून त्यातून शिवलिंगाची आकृती निर्माण करायची असते. त्या रांगोळया शैव धर्माशी संबंधित आहेत. श्री. अ. दि. कोकड लिहितात – रांगोळयांत प्रतिकांचा प्रपंच फार मोठा आहे. सुरुवातीच्या रंगावलीरचना केवळ प्रतिकांच्या भोवतीच रेंगाळत राहिल्याचे दिसते. एके काळी प्रतिके हाच रांगोळयांचा मोठा आधार होता. प्रतिकांच्या रचना म्हणजे एक प्रकारची सांकेतिक भाषाच आहे. प्रत्येक प्रतिकात फार मोठा अर्थ भरलेला असतो. शिवाय प्रतिकांच्या त्या आकृत्या भावनेला आवाहन करणाऱ्या, तशाच कलात्मक व आकर्षक असतात.

त्याशिवाय ठिपक्यांवरची रांगोळी या नावाचा आणखी एक रांगोळीप्रकार रूढ आहे. प्रथम भूमीवर मोजून काही ठिपके देतात व ते उभ्या आडव्या रेषांनी जोडून त्यातून मोर, कासव, कमळ, वेल इत्यादी आकृती निर्माण करतात. ठिपक्यांची रांगोळी जटिल पण आकर्षक असते.

चौसष्ट कलांमध्ये रांगोळी या कलेचा उल्लेख वात्सायनाच्या कामसूत्रात आढळतो. त्या काळी (इसवी सनाचे तिसरे शतक) धान्याचा उपयोग करून रांगोळी काढत. सरस्वतीच्या मंदिरात, तसेच कामदेव व शिवलिंग यांच्या पूजेसाठी विविधरंगी फुलांनीही आकृतिबंधात्मक रांगोळी काढत. ‘वरांगचरित’ (सातवे शतक) यांत पंचरंगी चूर्णे, धान्ये व फुले यांनी रांगोळीचे चित्रविचित्र आकृतिबंध तयार करत असल्याचे सांगितले आहे. ‘नलचंपू’मध्ये (दहावे शतक) उत्सवप्रसंगी घरापुढे रांगोळी काढत असल्याचा उल्लेख आहे. वादीभसिंहाच्या (अकरावे शतक) ‘गद्यचिंतामणी’ या ग्रंथात भोजनसमारंभात मंगलचूर्णरेखा काढत असा रांगोळीचा उल्लेख आहे. हेमचंद्राने (अकरावे-बारावे शतक) ‘देशीनाममाला’ या ग्रंथात तांदळाच्या पिठाने रांगोळी काढत असल्याचे सांगितले आहे. ‘मानसोल्लासा’त (बारावे शतक) ‘सोमेश्वरा’ने धुलिचित्र या नावाने व श्रीकुमार याने ‘शिल्परत्ना’त धुलिचित्र किंवा क्षणिकचित्र या नावाने रांगोळीचा निर्देश केला आहे.

भास्करभट्ट बोरीकराच्या 'शिशुपालवध' या काव्यात रांगोळीचा उल्लेख रांगवळी असा आहे. त्यापुढील मराठी वाङ्मयात रांगोळीचे अनेक ठिकाणी निर्देश झालेले आहेत. त्या सर्व संदर्भावरून रांगोळी ही कला सुमारे दोन हजार वर्षांपूर्वीपासून प्रचलित असल्याचे कळते.

सध्या चालू असलेल्या नवरात्री साठी समई ची रांगोळी देत आहे.. .. समई म्हणजे सम आई (आई सारखी) यासाठी लग्नात आई मुलीला देते. समई ची रांगोळी खूप वेगळी पण सोपी!!!!!



दिनांक शनिवार ३० सप्टेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## दसरा सण मोठा, आनंदाला (रांगोळीला) नाही तोटा!!!!

आसमंतात चोहीकडे वेगवेगळ्या रंगछटांमधून साकारणारा उत्सवाचा कल्लोळ नवरात्रीच्या निमित्ताने अधिकच बहरून येतो याचं कारण नैसर्गिक आहे आणि निसर्गाच्या सहजसुंदर फुलण्याचं आणि बहरून येण्याचं हे द्योतक आहे. हा 'नवसृजनाचा सोहळा' आहे. नऊ दिवसांचे नऊ विभ्रम, नऊ रस आणि नऊ विकार पूर्णत्वाला पोहोचले की येणारा 'दहावा' दिवस सृजनतत्त्वाचा साक्षात्कार, अर्थातच दसरा या सणाचं रूपक व लेणं लेवून येतो.

नवरात्रोत्सव सर्वच घरांमधून साजरा होतो असं नाही, मात्र 'दसरा' सण मोठ्ठा असल्याने त्याच्या आनंदाला तोटा नाही, कमतरता नाही. दसऱ्याची धामधूम सर्वत्र आणि सारख्याच प्रमाणात पाहायला मिळते. या निमित्ताने प्रापंचिक रामरगाड्यात गुंतलेलं 'मन' अंमळ सैलावतं. एकमेकांकडे जाणं-येणं घडतं, आठवणींचं आदानप्रदान होतं, गतस्मृतींना उजाळा मिळतो आणि त्यातूनच एकमेकांमधलं सौहार्द आणि नातेसंबंधांमधले भावबंध पुन्हा नव्याने घट्ट होतात, परिपक्व होतात.

अशा वेळी दारादरात दिसते ते केशरी, पिवळे झंडू आणि आंब्याच्या पानांचे तोरण आणि रांगोळी. इतर वेळी वेळ नसल्याची सबब या वेळी मात्र चालत नाही आणि मग सर्वसाधारण पणे बऱ्याच घरात रंगीत रांगोळी उंबऱ्यावर दारासमोर मिरवतेच. पायाशी रुंजी घालणारी रांगोळी, त्यामधील शुभ सूचक गोपद्म स्वस्तिक यामुळे वास्तू सजीव होते, पवित्र होते. सणासुदीचा आनंद जणू माणसांच्या मनातून वास्तूभोवती सुद्धा रुंजी घालतो. म्हणूनच अशावेळी केवळ पांढरी रांगोळी न काढता सर्व रंग विशेषत: पिवळा, केशरी, निळा, जांभळा असे रंग भरून आपला आनंद पाहणाऱ्याच्या मनात भरून जावा.

पण रंगीत रांगोळी काढताना काही काळजी घ्यावी लागते. म्हणून आपण जे रंग वापरणार ते वेगवेगळ्या वाटीत, बाऊलमध्ये भरून तयार ठेवावे. त्याचबरोबर जर रंग फिके करायचे असतील तर पांढरा रंग सुद्धा तयार असावा. मूळ रांगोळीचे चित्र पांढऱ्या रंगाने किंवा खडूने रेखून घ्यावे. आणि गरज असेल तर बाजूला एखादा पांढरा कागद ठेवून त्यावर आपला रंग छोटा ठिपका घालून त्याशेजारी दुसरा रंगाचा ठिपका ठेवून हे रंग एकमेकाबरोबर कसे दिसतील हे अगदी सहज पाहता येते. रांगोळीत रंग भरताना साधारण सारखे रंग जवळ जवळ घ्यावेत. उदा हिरवा पिवळा. त्यासोबत विरुद्ध रंग वापरावेत.


रंगसंगतीवर रांगोळीचे सौंदर्य अवलंबून असते. म्हणून निरनिराळ्या रंगांचा वापर करून सरावाने एकदम रांगोळी खुलून जाते. अर्थात स्वत:ला त्यातील रंगांचे ज्ञान असणे महत्वाचे. अलीकडे एकप्रकारची चकमक मिळते ज्यात रंगीत रंगीत बारीक पावडर असते, ती सर्वात शेवटी रांगोळीवर भुरभुरावी म्हणजे त्याची शोभा आणखीनच वाढते. पण हे दसरा दिवाळीलाच शोभते. कारण मोठ्या सणासाठी रांगोळी घालताना तेवढा वेळ आणि जागा आपण देऊ शकतो. आणि आपण आपले सारे कुटुंबीय, मित्रमंडळी आप्त स्वकीय असे सारे या रांगोळी पाहण्यासाठी उत्सवी मूडमध्ये असतो.


असे म्हणतात “दसरा सण मोठा, नाही आनंदा तोटा” मग हा आनंद व्यक्त करण्याचा आपला आपला मार्ग वेगळा असू शकेल. पण यामध्ये नवीन कपडे, श्रीखंड पुरी याबरोबर अगदी सोपी रांगोळी पाहिजेच.

पूर्वी दसऱ्याला मुलांना पहिल्यांदा शाळेत धाडीत असत. त्यामुळे शाळेची विद्येची पहिली ओळख किंबहुना छोट्या बाळाला बाहेरच्या जगाची ओळख याच दिवशी होत असे. या दिवशी पारंपारिक सिमोलंघन असतेच. कदाचित शाळेत घालणे वेगळ्या नव्या जगाची ओळख करून देणे असेही सिमोलंघन पूर्वजांच्या मनात असावे. आणि मग सीमेवरून आपट्याची पाने सीमेवरून आपल्या घरी सोने म्हणून आणायची.

अशा वेळी दगडी पाटीवर सरस्वतीचे चित्र काढून त्याची पूजा करून मग श्री गणेशा लिहायचा प्रघात होता. आज आपण शाळेची सुरवात जून मध्ये करतो. पण सरस्वती म्हणजे विद्यादात्री देवी. मग तिचे चित्र आणि त्याची रांगोळी जी प्रतीकात्मक आणि अगदी सोपी आहे ती आपण अगदी सहज काढू शकतो.

म्हणून सोबत देत आहे सरस्वतीची रांगोळी. . !




शुभ दसरा

दिनांक शनिवार ७ ऑक्टोबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी --एक स्वतंत्र कलाविष्कार

रांगोळी काढायची तर सर्वप्रथम पुरेसा वेळ हवा आणि त्यानंतर रांगोळी काढण्यासाठी पुरेशी जागा. जागेची अडचण असली तरी छोटय़ाशा जागेत तितकीच आकर्षक रांगोळी काढू शकतो. रांगोळी काढण्यापूर्वी त्याची पूर्वतयारी आवश्यक आहे. रांगोळी नेमकी कशी काढायची आहे याचं रेखाटन को-या कागदावर करून घ्यावे. थेट रंगांचा वापर करत रांगोळी काढणे अवघड वाटत असेल तर खडू जवळ बाळगावा. जेणेकरून खडूने रेखाटन करत त्यावर रांगोळी काढणं सोपं जाईल. सोबत एखादं रांगोळीचं पुस्तक घ्यावं. इंटरनेटवरही रांगोळयांचे विविध प्रकार शोधू शकतो. रांगोळी काढताना शक्यतो उठावदार रंगांचा वापर करावा. विरोधी रंगसंगती वापरत काढलेली रांगोळी अधिक उठावदार दिसते. त्या अनुषंगाने बाजारात जाऊन रांगोळी, रांगोळीचे साहित्य विकत घ्यावे. आधी कागदाच्या पुडीत सुटय़ा मिळणा-या रांगोळया आता प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये मिळू लागल्या आहेत. प्रत्यक्ष रांगोळी काढताना सर्व साहित्य जवळ ठेवावे. रांगोळी काढताना जमीन खराब होऊ नये यासाठी कागदावर हे सर्व सामान ठेवावे. हात पुसण्यासाठी कापड जवळ बाळगावं. रांगोळी काढण्यासाठी चाळणी, प्लास्टिकचा कोन आदी साहित्य बाजारात सहज उपलब्ध आहे. अलीकडे मुक्तचित्र रांगोळया काढण्यावर भर दिला जात असून निसर्गचित्र, पानं-फुलं, फुलांचा गुच्छ, नक्षीकाम, पक्षी, मोर किंवा स्वत: एखादा काल्पनिक देखावा

आपण काढू शकतो. रांगोळीभोवती चमचम, फुले, पणत्यांची आरास करत ती अधिक खुलवू शकतो. विविध ठशांच्या वापर करतही रांगोळी सजवता येईल. प्रवेशद्वारावर रांगोळीचं असं मोहक रूप पाहून घरात येणा-यांचं मन प्रफुल्लीत होतं. रांगोळी पुसताना ती अलगद हाताने पुसावी. पुसताना ओला हात लावू नये. त्यामुळे जमिनीवर डाग पडू शकतात. सर्व रागोळी एकत्र झाल्याने एक वेगळा रंग तयार होतो. ही रांगोळी जमा करत पिशवीत भरावी. रांगोळी टाकून न देता त्याचा पुनर्वापरही होऊ शकतो. अगदी रंग भरण्यासाठी या रांगोळीचा वापर करायचा नसेल तर बॉर्डर, ठिपके काढण्यासाठी त्याचा उत्तम वापर होऊ शकतो.

“रांगोळयांनी सडे सजवले.. ”अमर झालेली ही भूपाळी मनात ऐकू येऊ लागली की का कोण जाणे दिवाळी आल्याची चाहुल लागते. तो हवेतला गारवा. ती स्वच्छ, सुंदर पहाट. ते तुळशी वृंदावन. तो दारात घातलेला पाण्याचा सडा. त्याचा येणारा एक मंद मृदगंध आणि त्यानंतर हातातून जमिनीवर उमटत जाणारी आखीव रेखीव रंगांची रांगोळी. ही रांगोळी आपल्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग बनून गेली आहे. रांगोळी घालणं हे एक कलाकौशल्य आहे. केवळ चित्रकलाच चांगली असून चांगली रांगोळी येईलच असं नाही. क्रिकेटमध्ये मनगटाची सफाई दिसून येते तशीच रांगोळी घालताना बोटांची व त्या बोटांच्या चिमटीची करामत दिसून येते. एका संथ लयीत व एका रेषेत पडणारी ही रांगोळी आपल्या समोर अनेकाविध

आकार घेत असते तेव्हा नकळत आपण त्याचा दृश्यआस्वाद घेत असतो.

रांगोळी घालण्याची पद्धत ही तशी प्राचीनच. पूजेचा साधा पाट मांडायचा असो की जेवायला बसायचं असो, रांगोळी ही हवीच. खास दिवाळीच्या दिवसांमध्ये आकाशकंदिलाच्या बरोबर खाली ही रांगोळी घालून त्याला एक प्रकाश योजनाही देण्याचा प्रयत्न होत असे. ठिपक्यांची रांगोळी ही त्यातल्या त्यात जवळ जवळ सर्वच घरापुढे घातली जात असे. त्याचबरोबर रांगोळीच्या माध्यमातून आकर्षक चित्रं तयार करणारी अनेक कलाकार मंडळी आपल्याकडे आहेत. अनेक प्रदर्शनामधून ही कला आपल्या समोर येत असते. मात्र घरोघरी आजही ठिपक्यांची किंवा आकृत्यांची रांगोळी घालण्याची प्रथा आहे. एकेकाळी आपल्याकडे मोठं अंगण असायचं. त्यामुळे हव्या तेवढय़ा व वेगवेगळया प्रकारच्या रांगोळया घातल्या जात असत. आताशा इमारतींमध्ये वा चाळीतही जागेची कमतरता भासू लागली आहे. त्यामुळे आखीव रेखीव अशा मोजक्या जागेत रांगोळया घालण्याकडे अनेकांचा कल आहे. येणा-या जाणा-यांपासून ते अगदी हवेपासूनही ही रांगोळी सांभाळावी लागते. असं वाटू लागलं..

म्हणून आज सोबत आहे एक फुलांची रांगोळी !!!!! एका मोठ्या ताटात किंवा परातीत ही पर्यावरण पूरक आणि सहज दुसरीकडे हलवता येण्याजोगी मोबाईल रांगोळी म्हणा ना !!!!



दिनांक शनिवार १४ ऑक्टोबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळीतील पणती ----

**पणती लावा पुढच्या दारी लक्ष्मी येईल गोरी गोरी**
**पणती लावा मागच्या दारी नाही होणार कधी चोरी**
**पणती लावा तुळशी पाशी धनधान्याच्या पडतील राशी**
**अंगणात लावा पणत्या साठ देवदूतांना दिसेल वाट. !**

**'उठा उठा दिवाळी आली.. अंगणी रांगोळी काढण्याची वेळ झाली', दिवाळीचा सण जसा दिव्यांचा असतो, तसाच तो रंगांची मुक्त उधळण केलेल्या रांगोळ्यांचाही असतो. मांगल्याचे प्रतीक मानली जाणारी रांगोळी घरअंगणी काढण्याची पद्धत पूर्वापार चालू आहे. गेरुने सारवलेल्या चौकोनात खडूचा वापर, पांढ-या रंगाच्या रांगोळीचा वापर करत ठिपक्यांची रांगोळी काढायची. त्यात स्वस्तिक, हळद-कुंकू, लक्ष्मीची पावले काढत रांगोळीला सजवायचे. संस्कारभारती तर हवीच. तुळशी वृंदावनजवळ, अंगणात रांगोळी काढत दिवाळीची पहाट होते. बदलत्या काळानुसार रांगोळीचे रूपही बदलत गेले.**

... दसरा-दिवाळीत तर काय करू आणि काय नको? असे होऊन जाते. दरवाजाच्या चौकटीपासून ते रांगोळीपर्यंत सगळ्या गोष्टी आपल्या मनाला हव्या तशा सजवण्यात आपला किती वेळ खर्ची जात असेल ना! पण, हे सगळं करून स्वतःला आणि आपल्या कुटुंबीयांना खूश करण्यातला आनंद काही औरच... दिवाळी आहे आणि आपल्या घराचा दरवाजा रांगोळीने सजला नाही, असे तर होणंच शक्य नाही. पण, तुम्हाला कधी प्रश्न पडलाय का? की आपल्या सणांच्या दिवसात रांगोळीचे एवढं महत्त्व का आहे? तसे पाहायला गेले तर भारतातील प्रत्येक सणांत आणि त्यांच्या परंपरेमध्ये एक गर्भित अर्थ आहे. तसंच रांगोळीचंदेखील आहे... पण, घराची, दाराची सजावट करण्यासाठी म्हणून रांगोळी रेखाटली जात नाही... तर घरापासून नकारात्मक गोष्टींना दूर ठेवण्यासाठी ही रांगोळी काढली जाते. वातावरणात सकारात्मक आणि नकारात्मक अशा दोन्ही ऊर्जा असतात. त्यातून सकारात्मक ऊर्जा आपल्यामध्ये समावून घेऊन त्याच पद्धतीने विचार करण्याची शिकवण रांगोळीच्या माध्यमातून दिली जाते. आशावादी राहण्यातून घराची भरभराट होते असा समज आहे.

रांगोळी म्हणजे भूमी-अलंकरण… भूमीला सजविण्यासाठी, देवघरातील देव्हारा, अंगण, भोजनाची पंगत, शुभकार्यस्थळ इत्यादी जागा सुशोभित करण्यासाठी रांगोळी, तांदळाची पिठी, खडू, शिरगोळ्याचे किंवा संगमरवराचा भुकटी, चुन्याची भुकटी, भाताच्या तुसाची जाळून केलेली राख, मीठ, पानं, विविध धान्ये अशा विविध गोष्टींनी रांगोळी काढली जाते. आणि त्यात वेगवेगळे रंग भरून ती सुशोभित केली जाते.

आपले जीवनही अशाच वेगवेगळ्या रंगांनी रंगलेले असावं, ही त्यामगची इच्छा आणि मागणी. धार्मिक, सांस्कृतिक समारंभ प्रसंगी, शुभकार्य प्रसंगी घरासमोर, अंगणात, उंबर्यामवर, देवघरासमोर, चौरंग वा पाटाभोवती रांगोळी रेखाटली जाते. पूजापाठ, यज्ञ, अभ्यंगस्नान, औक्षण, नामकरण, भोजन अशा सर्व प्रसंगी सर्वप्रथम रांगोळी काढणे भारतात सर्वत्र प्रचलित आहे.

आता समजले का… सणांच्या दिवसांत रांगोळी का महत्त्वाची आहे ते… मग, आता जेव्हा तुम्ही या दिवाळीमध्ये आपल्या घरासमोर बसून रांगोळी रेखाटत असाल तेव्हा हे लक्षात असू द्या की तुम्ही फक्त घराची सजावट करत नाही तर तुम्ही तुमच्या संपूर्ण घराला आणि कुटुंबीयांना एका सकारात्मक ऊर्जेमध्ये घेऊन जाताय. शिवाय यासाठी तुम्ही रासायनिक रंगांचा वापर न करता प्राकृतिक रंगांचा जेवढा जास्त वापर कराल तेवढं चांगले… कारण हे रासायनिक रंग तुमच्या त्वचेला हानिकारकही असतात.

रांगोळी काढताना थोडीशी काळजी घ्यावी, ती म्हणजे ज्या पृष्ठभागावर आपल्याला रांगोळी काढावयाची आहे तो भाग स्वच्छ सारवून किंवा मातीने लिंपून किंवा, पुसून घ्यावा. म्हणजे रांगोळी स्पष्ट दिसते. रंगसंगती करताना, नीट विचार करून करावी नाहीतर रांगोळीला उठाव येणार नाही. रांगोळी कितीही मोठी असली तरी ती आटोपशीर असावी, पसरलेली व वेडीवाकडी असू नये. रांगोळीची आकर्षकता ही त्या रांगोळीच्या रंगसंगतीवर खूप अवलंबून असते. जितकी आकर्षक रंगसंगती तितकी आकर्षक रांगोळी.

रांगोळी आपल्या दारासमोर असावी असे प्रत्येकालाच वाटत असते. म्हणून सणाचे औचित्य साधून महिला आपली हौस पूर्ण करतात. दिवाळीतील रांगोळी ही एक आकर्षणाची गोष्ट आहे. जुन्या काळात फक्त ठिपक्याची रांगोळी काढत असत. पण आता

आजकाल विविध पद्धतीच्या रांगोळ्या काढता येतात. रांगोळ्यांमध्ये आजकाल ठिपक्यांची, संस्कारभारतीची तसेच फुलांनी सजविलेली असे अनेक प्रकार दिसतात. त्यामध्ये फुले, पाने इ. वापरले जाते.

छोट्या घरात छोटी तर मोठ्या घरात मोठी अशी ज्याला जशी सुचेल तशी रांगोळी काढली जाते. पण रांगोळीला मात्र पर्याय नाही. ती सर्वत्र असतेच.

**इंद्रधनूषच्या रंगांनी सजविते अंगणी रांगोळी ठेवूनी**
**त्यात इवलीशी पणती प्रकाशल्या अनेक ज्योती..**

**असं दिवाळीचं सार्थ वर्णन केलं जातं ते काही उगीच नाही.**

**आपल्या साऱ्यांच्या मनातील दिवाळी अशी शब्दातून आणि दारातील रांगोळीतून व्यक्त झालेली पाहताना एक वेगळाच आनंद येईल !!!! रांगोळीतूनही एक छोटी पणती रेखता येते.. .**

**Figure 1**


vanathisrangoli.com



दिनांक शनिवार २१ऑक्टोबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी- प्रिय सखी

घराचे अंगण हाही एक प्रकारे घराचा स्वागतकक्षच असतो व तिथे रेखाटली गेलेली रांगोळी ही स्वागतसुंदरी असते, असे म्हटले तर वावगे होणार नाही. म्हणूनच ते अंगण समतल, स्वच्छ, नीटनेटके असेल, चारदोन फुलझाडे अंगणात असतील. या फुलझांडात देवतातुल्य तुळस असेल. घरातील तुळशीला पाणी घालणे सुनालेकींना सोपे जावे म्हणून महाराष्ट्रात तुळशीवृंदावन मागील अंगणात असते. पण गोवा व दक्षिण भारतात बव्हंशी ते पुढच्या अंगणात असते, किंबहुना गोव्यात तुळशीवृंदावन ही हिंदू घराची एक खूणच बनली आहे. तुळस ही हवा शुद्ध करणारी आणि अनेक औषधी उपयोग असलेली वनस्पती आहे. अंगणात सुंदरशी रांगोळी काढलेली असेल, तर प्रवेश करणाराचे मन प्रसन्न व आनंदित होते. बाहेरच्या धकाधकीच्या जीवनातील संघर्ष, चिंता, काळज्या यांचा ताण कमी होण्यास यांची मदत होते. दुष्ट विचार जरा थबकतात.

घरातील गृहिणीने पहाटेच्या वेली संडासंमार्जन करून रांगोळी काढावी, ही पद्धती मोठी सार्थ आहे. त्याने आलेला अतिथी तर खूष होईलच, पण सकाळच्या शुद्ध, मोकळया, आल्हाददायी वातावरणाचा परिणाम म्हणून ती गृहिणीही आनंदित होईल व प्रसन्नतेने सुरू झालेल्या दिवसावर तो आनंद पसरून राहील. दिवसभर विविध कामांच्या रेट्यात गुंतलेल्या गृहिणीच्य कलाविष्काराला सकाळी सकाळीच संधी मिळेल. रांगोळीची रेघ बारीक व नीटनेटकी असेल तर त्यावरून घरातील गृहिणी टापटिपीने संसार करणारी असेल हे लक्षात येते. एखाददुसरी रेघ पुसल्यासारखी दिसत असेल तर समजावे की, त्या घरात छोटे मूल आहे. रांगोळीला अगदी खेटून पुरुषी चपला वा बूट दिसले की समजावे, गृहस्थ गृहिणीची कदर बाळगणारा नाही. अंगणात येणाराला ठेव लागू नये अशी काळजी घ्यावी ठेच लागली तर घरात शिरण्याआधीच मन दुखावलेले असते व घरातल्यांबद्दलची सहानुभूती नष्ट झालेली असेल. पूर्वी असे सारे बारकावे घरातील आई या आजी मुलीला सांगत असत.

अजून काही घरांत रांगोळीची पद्धत आहे. काही घरांच्या प्रवेशद्वाराजवळच लहानमोठी काळी फरशी मुद्दाम रांगोळीसाठी बसवलेली असते. रांगोळीने रांगोळी काढायची पद्धत कमी झाली असली तरी रांगोळीचे स्टिकर्स चिकटविलेले असतात.


पूर्वी पुष्कळदा घराच्या अंगणात एक छोटीशी मोरी असावयाची व तेथे पाय धुवून घरात प्रवेश करावा, अशी पद्धत असे. आरोग्याच्या दृष्टीने ते किती आवश्यक आहे हे

सांगायला नकोच. आजही गुरुद्वारांसमोर तशी व्यवस्था असते. घरात बाळंतीण असेल तर आजही पाय धुतल्याविना तिच्याजवळ जात नाहीत. पण हे सगळे वयस्क लोकच पाळताना दिसतात.

आज घराला अंगण असतेच असे नाही. फ्लॅट पद्धतीत तर दाराबाहेर रांगोळी काढायलाही जागा नसते. घरातले केरवारे मोलकरणींच्या हातात असतात. ती येईल तेव्हा केर निघतात. रांगोळी काढणे जुनाटपणाचे लक्षण मानले जाते. बाहेरचे चपला-बूट घालूनच घराच्या आंतर्भागातही वावरणे हे सुधारलेपणाचे लक्षण मानले जाते. तरीही पुष्कळ घरातून रांगोळीची आवड आणि उंबऱ्यापाशी असणाऱ्या त्या कलेचा आदर आदब राखणे हे असतेच. दिव्यांच्या वेगवेगळया रांगोळया काढून आपण आपल्या प्रियजनांचा वाढदिवस साजरा करू शकतो. आजकाल नवीन मोबाईल मध्ये फोटो काढणे सोपे झाले आहे. आपल्या एखाद्या प्रिय सखीला विशेष शुभेचछा अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पण आपल्या परंपरांचा आदर करून व्यक्त करण्यात एक वेगळाच आनंद आणि समाधान मिळते.

दिवाळीतल्या बलिप्रतिपदा या दिवसाचं आगरी /कोळी समाजात अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा समाज शेतीप्रधान आहे. म्हणूनच दिवाळीत शेतक-यांचा राजा असलेल्या बळीची 'बलिप्रतिपदा' मोठया उत्साहात साजरी केली जाते. तांदळाच्या पिठात रांगोळी मिसळून दिवाळीत रांगोळी काढली जाते. खास बलिप्रतिपदेच्या दिवशी या रांगोळीवर चार चौकोनात प्रत्येकी चार शेणाचे गोळे ठेवले जातात. त्याच्या मधोमधही एक गोळा ठेवला जातो. हे गोळे म्हणजे बळीराजाचं प्रतीक. त्या गोळय़ांवर गोंडय़ाचं फूल ठेवून बळीराजाची पूजा केली जाते. 'बळी हा शूर आणि दानी राजा होता. त्याचं राज्या पृथ्वीवर पुन्हा येवो. सारे लोक सुखी-समाधानी राहो, अशी मागणी केली जाते.

जे जे उत्तम, उदात्त, सुंदर, जे जे प्रसन्न, मोहक, मंगल ते सगळंच तर आहे तिच्या आविष्कारामध्ये! ती आता रोज अंगणात भेटत नसली तरी सणावारी आवर्जून भेटते. अधून-मधून भेटणाऱ्या आणि खूप आनंद देणाऱ्या सखीसारखी.. . दिव्याची रांगोळी अगदी सहज जमेल अशी !!!!!ठिपके आहेत ९-५ ५-१ थोडी क्लिष्ट वाटेल सुरवातीला पण लक्ष देऊन पहिली तर जमून जाईल. तीन वर्षांपूर्वी पारंपारिक रांगोळीच्या स्पर्धेत मला पहिले पारितोषिक मिळाले ते या रांगोळीने. त्यामुळे ही रांगोळी काहीशी मनातली,



दिनांक शनिवार २८ऑक्टोबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी -तुळशीवृंदावनाची


दारातली रांगोळी ही सौंदर्याची, मांगल्याची 'भाषाच' असते. आकाराने अगदी छोटी असते. अनेक घरं हे संस्कृतिवैभव जपत असतात. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांनी एका व्याख्यानात दिलेल्या दृष्टांताची आठवण होते. ते म्हणाले, ''रांगोळी पुसली जाणार आहे याचे गृहिणीला भान असते. पण म्हणून ती वाटेल तशी रांगोळी काढत नाही. रांगोळी मनापासूनच काढते. '' सूर्य उगवतो, 'पूर्वा' उजळते आणि त्या दिवसाचं प्रतिबिंब गृहिणीच्या रांगोळीत उमटतं. यातूनच संस्कृतिसंवर्धनाचा आनंद रांगोळी रेखाटणारीच्या वाटेला येतो.. या रांगोळीद्वारे, स्वत:ची 'ओळख' करून देताना, तिचा ओळखीचा परीघ आपोआप विस्तारत जातो. एका छोट्या कृतीतून तिची ओळख जगाला वेगळ्या नात्याने होते. रांगोळी ही कला त्यासाठी लागणारा काही मिनिटांचा वेळ, जागा हे सारे मनापासून केल्यास आपल्यालाही सरावाने जमून जाईल आणि तिच्यासाठी त्या बदल्यात मिळेल ते समाधान, आनंद आणि दिवसभरासाठीची एक अनामिक तृप्ती. **ठिपक्यांची रांगोळी तशी अवघड असते. रांगोळीच्या ठिपक्यांची (यालाच काही जण थेंब असेही म्हणतात) थेंबांची मांडणी सरळ, आडव्या, तिरप्या रेषेत, समान अंतरावर मांडावी लागते. ठिपक्यांची जोडणी कल्पकतेने करून त्यातून सुंदर प्रकारचे पक्षी, फुलं नक्षीकामाच्या आकृती साकारतात. कासव, सीताफळ, कोयरी असे विविध प्रकार ठिपक्यांच्या रांगोळीद्वारे काढली जातात. सध्याच्या रांगोळया सुंदर असतात. पण त्यामध्ये खूप रांगोळी, रंग व जागा यांचा अंतर्भाव असतो. पारंपरिक रांगोळीत नाजूक, कमी खर्च व एकाग्रता यांचा त्रिवेणी संगम साधला जातो. तुळशी वृंदावना पुढे किंवा दारात मी रोज काढत असलेली रांगोळी मला आत्मिक समाधान देते.** रांगोळीला भू-अलंकार असेही म्हटले जाते. भू-अलंकार म्हणजे जमिनीला सजवणे. आपण रांगोळी काढतो म्हणजे एका अर्थी आपण धरती मातेला सजवतो. आश्चर्य म्हणजे, रांगोळी हा प्रकार फक्त भारतातच आढळतो. भारतीय संस्कृतीमध्ये रांगोळीला सांस्कृतिक व धार्मिकदृष्ट्या अनन्यसाधारण महत्त्व आहे. रांगोळी शुद्धता, प्रसन्नता, पवित्रता प्रकट करते.

रांगोळीची अनेक पारंपरिक व आधुनिक रूपे आपल्याला बघायला मिळतात; पण तिचा नक्की उगम कुठे व कधी झाला, हा प्रश्न पडतोच. श्रीरामचंद्र अयोध्येत 14 वर्षांचा वनवास भोगून येतात, तेव्हा सडा-रांगोळीने रस्ते सजवल्याचा उल्लेख पुराणात आढळतो.

रांगोळीतून संस्कृतीचा विकासही दिसून येतो व रांगोळीने तत्त्वचिंतन नि लोकधारणेचा वारसा जपला आहे, हेही कळते. रांगोळी ही एक अशी कला आहे, ज्या कलेने सर्व जाती, जमाती, पंथ, धर्मांना आपलेसे करून घेतले आहे. रांगोळी अतिसामान्य माणसाला, म्हणजेच गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत कोणालाही परवडण्यासारखी आहे. अगदी निषाद, किरात, पारध, भिल्ल, मुंड, कोला, नाग, वारली, चंचू, ठाकूर, कातकरी सर्व वर्णांनी रांगोळीला मान्यता दिली आणि रांगोळीनेही सर्वांना सामावून घेतले आहे. रांगोळी हे एक मांगल्याचे प्रतीक मानले जाते. देव्हाऱ्यापुढे, अंगणात, भोजनाच्या वेळी, पंगतीमध्ये, औक्षण, यज्ञ-याग, पूजापाठ, नामकरण, अभ्यंगस्नान, मुंज, सण, उत्सव, लग्नकार्य अशा कुठल्याही छोट्यात-छोट्या व मोठ्याहून मोठ्या शुभप्रसंगी रांगोळी घातलीच जाते. रोज दारात रांगोळी काढण्यामागचे अजून एक कारण म्हणजे, रांगोळी अशुभ शक्तींना घरात प्रवेश करू देत नाही व शुभ शक्तींना घराबाहेर पडण्यास अडथळा निर्माण करते. अंगणातली रांगोळी खास पाहुण्यांचे स्वागत करते, तसेच गृहलक्ष्मीच्या अंत:करणातील भावतरलता, सृजनशीलता नि घरातली समृद्धी, स्वच्छता, शांतता दर्शवते. रांगोळीच्या चार रेघांनी निर्जीव उंबरठा पण चैतन्यमयी दिसतो. घराला जिवंतपणा येतो. आपल्या गोव्यात महाराष्ट्रात व कर्नाटकात ‘रांगोळी’ असे म्हणतात. ती शिरगोळे नावाच्या पांढऱ्या दगडापासून रवाळ चूर्ण बनवून तयार केली जाते. उत्तर भारतात तिला ‘रंगोली’ म्हणतात. गुजरातमध्ये ती ‘साथिया’ म्हणून प्रसिद्ध आहे व ती एक बिंदू दुसऱ्या बिंदूशी जोडून जाळी बनवली जाते. तीनपासून एकशे आठ बिंदूंपर्यंत मोठी रांगोळी काढली जाते. तामिळनाडूमध्ये तांदळाची पिठी, वीट, संगमरवराची पावडर, करवंटीचा चुरा वापरून रांगोळी काढली जाते. राजस्थानात मांडणा, मध्य प्रदेशात चौकपूरना अशी नावे रांगोळीला आहेत. उत्तर प्रदेशात रांगोळीत पूजनीय प्राणी व देव काढण्याची पद्धत आहे. एका शास्त्रशुद्ध पद्धतीने उत्तर प्रदेशातील सोनारख्खा रांगोळी रेखाटली जाते. बंगालची अल्पना रांगोळी वेलबुट्टी, स्वस्तिक, पद्म चिन्ह, सूर्य, चंद्र इत्यादीने सजवली जाते. सौराष्ट्रात सस्या किंवा सांझी ही नावे रांगोळीला असून यामध्ये सूर्योदयापूर्वी दिसणा-या प्रकाशाचे व संध्याकाळच्या पूजेचे चित्र रेखाटले जाते. केरळात रांगोळीला पुवीडल म्हटले जाते व ती पाने-फुले वापरून काढतात. आंध्र प्रदेशात मुग्गू, बिहारमध्ये अरीपण, ओरिसात झुंटी इ. नावाने रांगोळीला संबोधले जाते. अशा रांगोळीला जैन व पारशी धर्मानेही महत्त्व दिले आहे.

बहुतांशी रांगोळी ही गारगोटीचा दगड व संगमरवराच्या दगडापासून चूर्ण करून बनवली जाते. मध्य प्रदेशात चुन्यात रंगांची पाने वाटून हळद किंवा गुलाल घालून रंगीत रांगोळी

तयार करतात. व्यक्तिचित्रण, निसर्ग देखावे, पशुपक्षी, काळीज हेलावून टाकणारे प्रसंग, मुक्तहस्त, समाज प्रबोधनात्मक, उपदेशात्मक रांगोळ्या असे अनेक रांगोळीचे प्रकार प्रचलित आहेत. ठिपक्यांची रांगोळी ही पारंपरिक असून पानाफुलांची रांगोळी, डाळी, कडधान्ये, मिठाचे खडे, रंगवलेले तांदूळ इ. साधने वापरून रांगोळी रेखाटन केले जाते. आपल्या परंपरेत प्रत्येक सणाची रांगोळी आहे. तशी तुळशीची सुद्धा. रोज सकाळी तुळशीचे पूजन करणाऱ्या संस्कृतीला तुळशी विवाह म्हणजे छोटा समारंभच. आणि मग रांगोळी पाहिजेच. अशीच एक रांगोळी तुळशीची !!!!!!!



दिनांक शनिवार ४ नोव्हेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

# ठिपका ठिपका !!!! रांगोळीचा

घरापुढचं नेटकेपणाने सावरलेल्या अंगणावर केलेली सडा-रांगोळी हे आता फक्त जुन्या चित्रपटातून बघायला मिळेल. आज अंगणच नाही, तर सडा-रांगोळीचा प्रश्नच उद्भवत नाही आणि जरी अंगण असेल तरी रांगोळी घालण्याची आवड आणि सवडदेखील आहे कोणाकडे! त्यापेक्षा बाजारात रांगोळीचे तयार स्टीकर्स मिळतात ते दारापुढे लावले की झालं. पण त्यात ना निर्मितीचा आनंद आहे ना रांगोळीच्या जीवंतपणाचा अनुभव आहे. ठिपक्याला ठिपके जोडत गेले की बघता बघता सुरेख आकार उमटत जातो आणि मग त्यात रंग भरले की त्या आकाराची होते रेखीव, रंगमय रंगवल्ली म्हणजेच रांगोळी!

हा जो निर्मितीचा आनंद असतो तो त्या स्टिकरमध्ये कुठे मिळणार. हा अनुभव कितीही आनंददायी असला तरी रोज उठून इतकी मोठी रांगोळी काढणं शक्यच नाही हेही तितकंच खरं. दारापुढे उंबरठ्यात रांगोळीची जरी चारच बोटं उमटलेली असतील तरी त्या घराचा निर्जीव उंबरठा जणू चैतन्याने झळाळून उठतो. हिंदू संस्कृतीत भारतभर सगळ्याच प्रांतात रांगोळीचं अनन्यसाधारण महत्त्व आहे. सुख, शांती, भरभराट, मांगल्य याचं प्रतीक मानली जाणारी रांगोळी बघितली की छान प्रसन्न वाटतं. आपल्याकडे अनेक अशा परंपरा आहेत ज्या प्राचीन काळापासून आजतागायत प्रवाहात आहेत. त्यातलीच एक रांगोळीची परंपरा.

प्राचीन काळी गुहेत राहणाऱ्या माणसालादेखील आपण नटावं, सजावंसं वाटत असे, घर सजवावसं वाटत असे. त्यातूनच रांगोळीचा जन्म झाला. माणूस गुहेत राहत असल्यापासून गुहेच्या आतल्या- बाहेरच्या भिंतीवर चित्रं काढली जात असल्याचे उल्लेख आहेत. असंही म्हटलं जात असे की हे चित्रविचित्र आकार बघून जंगली जनावर पुढे येणार नाहीत हेही अशी चित्र काढण्यामागचं कारण होतं. भोपाळजवळ भीमबैटका म्हणून प्राचीन गुहा आहे. त्या गुहांच्या भिंती अनेक प्रकारच्या चित्रांनी सजलेल्या दिसतात तोही रांगोळीचाच एक प्रकार म्हणता येईल. रांगोळी म्हणजे काय एक प्रकारचे चित्रच. मग ते कायमस्वरूपी असेल किंवा क्षणक आयुष्य असणारे असेल. या काही काळापुरते आयुष्य असणाऱ्या रांगोळीला धूलिचित्र म्हटले जाते. जे सुक्या भुकटीचा वापर करून काढले  जाते, तर द्रवरंगाने काढल्या जाणाऱ्या चित्राला रसचित्र म्हटले जाते. रांगोळीला

भूमीवर काढली जाणारी म्हणून 'भौम'ही म्हटले जाते.

घर सजविण्यासाठी चित्रे काढायची मग ती शुभशकुनी का नसावीत या विचाराने बहुधा रांगोळीत स्वस्तिक, कमळ यांसारख्या आकृत्या काढल्या जाऊ लागल्या असाव्यात. मग आपल्या भोवताली जे दिसते तेच आपण कलेत उतरवणार याचा परिणाम म्हणजे फुलं, पानं, वेली, पक्षी, साप, हत्ती, घोडे यासारख्या आकृत्या रांगोळीतून दिसू लागल्या.. पूर्वी त्यासाठी नदीच्या पात्रातले संगमरवराचे तुकडे किंवा दगड गोळा करून ते भट्टीत भाजून त्याची कुटून भुकटी केली जात असे. ही भुकटी वस्त्रगाळ केल्यावर तयार होत असे ती रांगोळी. आज संगमरवराच्या फॅक्टरीमध्ये संगमरवर कापताना जी पूड निघते ती रांगोळी म्हणून वापरली जाते. डोलोमाइट दगडापासूनदेखील रांगोळी तयार केली जाते. डोलोमाइट दगड पांढरा, पिवळा, करडा तसेच पारदर्शकही असतो, पण रांगोळीत रंग भरले जात नाहीत तोपर्यंत ती रांगोळी पूर्णत्वाला येत नाही.

पण रांगोळीचे रंग भरणे हे खूप काळजीपूर्वक करावे लागते. एक म्हणजे एकाबरोबर दुसरा कोणता रंग शोभतो ते पाहावे आणि त्याच बरोबर तो रंग एकसारखा समतोल पडला पाहिजे. आणि दुसऱ्या शेजारच्या रंगाबरोबर मिसळता नये. यासाठी लागतो तो सराव. आणि काही वेळात आपली नजरही तयार होते.

ठिपक्यांची रांगोळी काढणे ही एक वेगळी कला. त्यासाठी ठिपके काढणे जमावे लागते. एकसारख्या अंतरावर आणि सारख्या आकाराचे ठिपके रेखणे सोपे नाही पण कठीण सुद्धा नाही. शिवाय ती आपली परंपरा आहे. ठिपके जोडीत जायचे का ठिपक्याभोवती रांगोळी काढायची हे आधी ठरवावे लागेल. मग अगदी सोपे होईल. .. अशीच एक ठिपक्याभोवतीची रांगोळी. रांगोळी काढल्यावर एक इयर बड घेऊन त्यात फिरवला आहे. अगदी साधी सोपी पण सुंदर !!!!



दिनांक शनिवार ११ नोव्हेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## ताटा भोवतीची महिरप रांगोळी

*माणसाची प्राथमिक गरज म्हणजे अन्न वस्त्र निवारा. यातही अन्न अगदी महत्वाचे. आपल्या संस्कृतीत अन्न म्हणजे पूर्ण ब्रम्ह. म्हणजे परमेश्वराचे प्रतिक. म्हणून अजूनही कित्येक माणसे ताटाला नमस्कार करूनच घास घेतात. आता पोट भरणार आणि अंगभर वस्त्र डोक्यावर छप्पर आले की मग येते ती संस्कृती. फक्त रुचकर भोजन नाहीतर आजूबाजूचे वातावरणही सात्त्विक हवे. शिवाय नुसते वातावरण नाहीतर आजूबाजूची, जेवणघरात स्वच्छताही हवी. आणि मग सजावट असेल तर जेवण आनंदाने होते.*

*जेवायला बसायची जागा कशी स्वच्छ सजवलेली असावी. नीटनेटकी बैठक, स्वच्छ भांडी, सुबक मांडणी मनाला कसे प्रसन्न करते. पूर्वी कशा छान सारवलेल्या जमिनी असायच्या. बसायला पाट, ताटाखाली पाट, चकचकीत तांब्या भांडे असायचे. आता टेबल आले तरी ते स्वच्छ सजवलेले असेल तरच छान वाटेल. पूर्वीचा पेशवाई, सावकारी थाट तर अजूनच निराळा. सव्वा हात केळीचे पान, चंदनी पाट, ताटाखाली लाल पाट, उत्कृष्ट उदबत्त्या, आग्रहाचे वाढणे, साखळीचे गंध, श्लोक, चांदीची भांडी, पदार्थांनी भरलेले पान आणि त्याभोवती विविधरंगी सुरेख रांगोळ्या. आता असा सगळा सरंजाम करणं शक्यच नाही पण सणासुदीला, एखाद्या विशेष प्रसंगी निदान आपण ताटाभोवती रांगोळी तरी काढू शकतोच की. आम्ही आजही दिवाळीच्या फराळाला पानाभोवती (केळीच्या हिरव्यागार पानाभोवती) रांगोळी काढतो. त्यात रंगही भरतो. दिवाळीचा फराळ चवीला कसा आहे हे पाहण्यापूर्वी तो अशा रीतीने सजवला की खायची इच्छा झालीच पाहिजे.*

*या रांगोळ्या अशा वाढलेल्या ताटाला काही वेगळीच शोभा आणतात. काहीतरी विशेष असल्याची जाणीव करून देतात. लांबलचक पंगत असो वा एका ताटाभोवती मांडलेली महिरप असो दिसते सुरेखच. मला आठवतंय लहानपणी आणि अजूनसुद्धा सण वा वाढदिवस असला की आई आवर्जून ताटाभोवती रांगोळी काढायची. आईची बोट कशी झरझर फिरायची, नाजुक फुलांची नाहीतर मोराची, वेलबुट्टीची नक्षी ताटाभोवती काढायची. कधी फुलांची तर कधी मोत्यांची. पुढे घरात टेबल आले तरी*

*महिरप सणासुदीला असतेच. खाली जमिनीवर पंगत वाढली तर एकच वेलबुट्टीची लांबलचक महिरप रेखाटली जाते. पूर्ण पंगतीला एकाबरोबर रांगोळी रेखणे हे कौशल्याचे आणि सरावाचे काम. माझे बाबा खूप सुंदर आणि अगदी कमी वेळात अशा रांगोळ्या घालतात.*

*आपल्याकडे केळवण करताना म्हणजे लग्नाच्या पहिल्या दिवशी नवरा नवरीला ओवाळण्यापूर्वी जेवणाच्या ताटा भोवती रांगोळी असतेच. आणि लग्नानंतर तर नव दाम्पत्याला आणि जवळच्या माणसांसाठी रांगोळीची महिरप आजही असते. आगदी कार्यालयात सुद्धा ही प्रथा पाळतातच. काही वेळा पुठ्यावर रंगीत कागद चिकटवून विशिष्ट आकार दिला जातो. वेलबुट्टी च्या आकारात लाल सोनेरी किरमिजी कागदाने ही महिरप सुंदर दिसते. नाहीतर ताटाभोवती विविध रंगाचा वापर करून सुरेख रांगोळ्या वापरून सजावट करता येते. आता बाजारात तसे छापही मिळतात आणि अनेक रंगही. शिवाय मोत्यांच्या मण्यांच्या महिरपी मिळतात. या साऱ्या टिकावू रांगोळी महिरपी. व्यवस्थित ठेवल्यास वर्षानुवर्षे वापरू शकतो. पाणी धूळ यापासून मात्र दूर ठेवल्या तर आकर्षकपणा यत्किंचितही कमी होत नाही.*

*यातील एक वेगळा आणि सोपा प्रकार म्हणजे फुलांची महिरप. छान विविधरंगी फुल घ्यावीत काही सुगंधी तर काही नाजुक. नुसत्या पाकळ्या घेऊन त्यात फुलं मांडून मोहक रचना करता येते. ताज्या फुलांनी त्यांच्या सुगंधाने मन प्रसन्न होते. कधी गुलाब पाकळ्या, कधी निशिगंध, कधी झेंडूच्या पाकळ्या. मंद सुगंध छान वाटतो. हवे तसे नक्षीकाम करून फुल मांडता येतात. आकार आणि सुगंध असा दुहेरी आकर्षणाचा भाग होतो. या महिरपी लगेच मांडून काढताही येतात. लहान मुलांसाठी केलेल्या चॉकलेटच्या, क्विलिंगच्या, लोकरी फुलांच्या अनेकविध सुंदर महिरपी बनवता येतात. भारतीय खाद्यसंस्कृतीत असणारी ही अशी पारंपरिक महिरप सजावट, कोणत्याही सजावटीपेक्षा जवळची वाटणारी.*

व पु काळे यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे –‘ यश म्हणजे ताटाभोवतीची रांगोळी. सतत अस्तित्व दर्शवणारी. रांगोळीचा भुकेशी संबंध नाही. म्हणुनच ती पचवण्याचा प्रश्न उदभवत नाही. अपयश हे वाढलेल्या ताटासारखं. अन्नावर वासना नसली तरी ते वाढूण गिळावं लागतं, पचवावं लागतं.

चेहरयाची रांगोळी विस्कटु न देता.. .. ’

*आपल्या जेवणाला म्हणजे पूर्ण ब्रह्माला पूरक अशी ही महिरपीची रांगोळी. पोटपूजा करताना आनंदी आणि नयनरम्य वातावरण निर्माण करणारी. आपल्या संस्कृतीचे खरे प्रतिक -----*



दिनांक शनिवार १८ नोव्हेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## आकाशातील ग्रह आणि अंगणातील रांगोळी

रांगोळीचे घराच्या अंगणातील अस्तित्व म्हणजे पावित्र्य, सात्विकता, आनंद आणि प्रसन्नता या साऱ्याचे एक सुंदर मिश्रण. बाहेर एक छोटी रांगोळी पाहताना आणि तिला ओलांडून प्रवेश करताना अगदी पहिल्यांदा येणारा अतिथी सुद्धा घरात येताना काहीशा आपुलकीने, सहजतेने येतो. घरातलाच बनून जातो. सहजपणे हे अगदी नकळत होते आणि पाहुणा घरात सहजतेने वावरू लागतो.

रांगोळी रेखताना काहीवेळा तिथल्या तिथे काही आकार किंवा ठिपके बदलावे लागतात. रचना रंग बदलतात. याचे निर्णय काही क्षणात घेऊन आकृती पूर्ण करावी लागते. थांबून राहायला वेळ नसतो. शिवाय जागा पण अगदी नेमकी त्यामुळे काही प्रमाणात स्वतंत्र्य आणि ठाम निर्णय घेण्याची सवय जी सर्वत्र गरजेची असते ती होण्यास मदत होते. यासाठी मदत होते ती रवी या ग्रहाची. आपले एक वेगळे स्थान कलेच्या क्षेत्रात निर्माण करण्याचे काम रवीच्या मदतीने सहज होते. निर्णय ठाम पणे घेणे आणि मग त्या निर्णयामुळे होणाऱ्या अनुकूल वा प्रतिकूल परीस्थितीला सामोरे जाणे यासाठी मदत मिळते ती रवी आणि बुध या दोघांची. निर्णय घेण्यापूर्वी विचार जरूर करावा पण घेतल्यानंतर तो चुकला तर त्याही परिस्थितीत जमवून घेणे आणि त्यातून सकारत्मक विचार आणत आपले जीवन पुढे नेणे हे आयुष्याचे मर्म. रांगोळीत ठिपका चुकला रेघ लहान मोठी झाली तर त्यातील आकृती रचना बदलावी लागते. जुळवून घेत ते चित्र पूर्ण करणे हे जमवायला मनाची शांती असावी लागते.

संसारात सातत्य आणि चिकाटी खूप महत्वाची. यासाठी शनी सारखा ग्रह मदत करतो. रोजच्या रोज दारापुढे पुसून रांगोळी घालणे त्यासाठी वेळ काढणे म्हणजे आजकालच्या टाइम मॅनेजमेंट मध्ये सहज समजणारे आहे. एखादे काम रोजच्या रोज केले की त्याचा कंटाळा येतो, नाविन्य संपते, आणि मग बेचव होत जाते. पण रांगोळी रोज काढणार असलात तरी त्यात आपल्या कल्पनेने वेगळेपणा आणू शकतो. तीच पावले लक्ष्मीची आपण वेगळ्या पद्धतीने काढू शकू, त्यात हळद आणि पिंजर हे दोनच रंग भरताना सुद्धा त्या आकृतीचे वेगळेपण दाखवणे शक्य असते.

शुक्र हा ग्रह कलेचा. दारातील छोटी सुबक रांगोळी त्या घराचे प्रसन्नत्व दाखवते. शुक्र आणि गुरु या ग्रहाचे अस्तित्व घरातील माणसाना आनंदी कलाप्रेमी बनवतेच पण आपल्याबरोबर या घरात येणाऱ्या अतिथीला सुद्धा उत्साही बनवते. घरातील

माणसांचे विचार, मनोवृत्ती, आणि मुख्य म्हणजे घराचे घरपण याचा आरसा म्हणजे दारातील रांगोळीची दोन बोटे.

चंद्र म्हणजे मनाचा कारक ग्रह. रांगोळीतील कल्पनाशक्ती आणि आणि ती काढल्यानंतर मनात येणारे समाधान हे सारे चतुर्थ स्थानातील चंद्र करतो. सकाळची ती कोवळ्या उन्हाची वेळ साधून सुंदर रांगोळी घराच्या अंगणात किंवा दाराबाहेर घातली की पूर्ण दिवसाच्या व्यस्त वेळापत्रकासाठी मन आणि शरीर दोन्ही सज्ज होते.

रांगोळीतील बदल आपल्या शरीर आणि मन दोन्हीतील बदल दाखवितात. लहानपणी मीच काढलेली रांगोळी आज वेगळी बनते. त्याला वेगळीच वेलबुट्टी लावली जाते. रांगोळी रेखणारे हात जरी तेच असले तरी रांगोळीची रचना आज मुक्त हस्त असेल, उद्या ठिपक्यांची तर परवा फुलांची पानांची असेल. कधी केवळ ठिपके तर कधी त्याभोवती वेली पाने असतील. आजकालच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक दिवशी आपल्या आजूबाजूला भेटणारे अनेक प्रकारचे स्वभावाचे लोक त्यांच्यात समन्वय ठेवायचा, बंध निर्माण करायचे, जोडायचे शिक्षण रांगोळीएवढे दुसऱ्या कोणत्या कलाप्रकारात असेल ? आपले जगणे या साऱ्यांच्या मदतीने किती आणि कसे समृद्ध करायचे यासाठी बुध या ग्रहाची मदत होते.

आज रांगोळीचे नवनवीन प्रकार आले आहेत. रोजच्या धावपळीत सहज साथ देते ती स्टीकर वाली ‘रेडी टू युज’ रांगोळी. पुष्कळ वेळा चाळण्यातून वेगवेगळे आकार मिळू लागलेत. वेळ असणारी किंवा जमवणारी कोणी दोन रेषात आपल्या दारात आपली कला दाखवते. कोणी मुद्दाम चैत्रांगण काढतात. हर्षल हा ग्रह म्हणजे नवीन युगाचा प्रतिनिधी म्हणूनच नाविन्य आणि काळाबरोबर पुढे जाणे. पाण्यावर, धान्य वापरून, खण नारळ तांदूळ बांगड्या सुपारी असे वापरून, फुलापानांनी सजवून रांगोळी दर दिवशी आपल्याला सजवत रंगवत चालली आहे. ‘जुने ते सोने आणि नवे ते हवे’ या दोन्हीची सुरेख सांगड घालत रांगोळी आपले रूप बदलते आहे. या आणि यापुढच्या लेखांसाठी मला प्रसिद्ध ज्योतिषी आणि ब्रम्हज्ञान या दिवाळी अंकाचे संपादक श्री रवींद्र कामत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले आहे.

जुन्या नव्याची सांगड घालणारी आणि पर्यावरणपूरक म्हणजे त्यातील वस्तूंचा पुनर्वापर करता येणारी रांगोळी सोबत देत आहे. ही रांगोळी घातली आहे माझी मैत्रीण वनिता जांभळे हिने.. ..



दिनांक शनिवार २५ नोव्हेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी वाराची – भाग -१

आठवड्यातील प्रत्येक वार एक एक देवतेचा मानला जातो तसाच त्यावर एका ग्रहाचा प्रभाव असतो असेही शस्त्रात सांगितले आहे. रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र शनी या ग्रहानी त्या वाराला आपले मानले आहे. त्यामुळे त्या त्या वाराची रांगोळी त्या दिवशी देवापाशी काढली जाते. यात त्या ग्रहाचे पूजन व्हावे असा प्रघात आहे. या रांगोळ्यातील बीजाक्षरे म्हणजे त्या त्या देवतांना आवाहन करण्याचे मंत्र.

या बीजाक्षरातून पंच महाभूतांची लय तयार होते आणि त्या परिसरातील माणसाच्या शरीरातील पंचमहाभूते जागृत होण्याएवढी ताकद या मंत्रात असते. अतिशय श्रद्धेने ही बीजाक्षरे काढल्यास त्यातून येणाऱ्या शुभ स्पंदनामुळे आजूबाजूचे वातावरण शुभ प्रसन्न होते. त्या परिसरात असणारी माणसे सकारात्मक विचार करू लागतात. आणि या पुढचे यश हे त्या विचारांच्या मागे धावत येते.

अर्थातच रांगोळी साठी ती जागा स्वच्छ पुसली जाते, आणि स्वच्छते बरोबर येते ती लक्ष्मी. देवासमोर ही रांगोळी असते, तिथे धूप दीप लावला जाईल आणि त्या सभोवतालचे सारे वातावरण पवित्र सात्विक बनेल हे काही सांगायची गरज नाही. आणि मग सुबत्ता आणि समाधान येतच राहील. यासाठी गरज असते ती दृढ श्रद्धा, भक्ती आणि संपूर्ण शरणागती ची. एकदा ईश्वराला आपले करावयाचे ठरवले की मग त्यासाठी अनेक मार्ग सापडतात. त्यातील त्या त्या ईश्वरी अंशाची बीजाक्षर मंत्र रुपी रांगोळी त्या वाराला रेखणे ही एक प्रकारची भक्तीच आहे.

प्रत्येक वाराची रांगोळी काढायची पद्धत आणि त्या काढल्याने मिळणारे फायदे आपण पाहूया

भारतीय पद्धतीतील पहिला वार रविवार


**रविवारची रांगोळी** –या रांगोळी मुळे रवी म्हणजे सूर्यपूजनाचा लाभ मिळतो. आपल्या आतील आत्मशक्ती वाढविण्यासाठी या रोज दिसणाऱ्या सूर्य म्हणजे रवी पूजनाचा लाभ होतो. त्रिकोणात पिवळा रंग भरून नंतर ऱ्हीम रेखावे आणि बाजूच्या तिन्ही गोलात लाल रंग भरावा. ऱ्हीम यासारखे बीजाक्षर आणि त्याबरोबर सूर्यतत्व याठिकाणी असल्याने आपल्या बुद्धीचे तेज वाढविणे तसेच आरोग्य रक्षणासाठी याचा उपयोग होतो. आजूबाजूचे वातारवण शुद्ध करण्याबरोबरच मनालाही शुद्ध करण्याचे कामही यातून होते. आकलन शक्ती वाढविणे आणि हाती घेतलेल्या कामात यश मिळवणे असे सारे या रांगोळीने प्राप्त होते.

**सोमवारची रांगोळी** –

ही रांगोळी विघ्न हर्ती आणि प्रगती करणारी मानतात. सोम म्हणजे चंद्राची पूजा याद्वारे केली जाते. यातील ‘क्लीम’ हे बीजाक्षर श्रीकृष्णाशी संबध दाखविते. हे बीज बुद्धीचे कारक आहे. कालीमातेचा प्रभाव या अक्षरावर असतो. दुष्ट बुद्धीचा नाश आणि चांगल्याचे संवर्धन करणारी कालीमाता. त्याचबरोबर हे लक्ष्मीरूप सुद्धा म्हटले जाते. समृद्धी सुबत्ते साठी धनधान्यासाठी याचा उपयोग होतो. या रांगोळीचा आकार म्हणजे एक आयताकार आसन किंवा चौरंग वाटतो. क्लीम रुपात ती त्या आसनावर प्रत्यक्ष विराजमान असते. ही रांगोळी पूर्ण स्वरुपात काढल्यावर त्यातील चैतन्याची जाणीव होते. शिव आणि शक्ती याचे रूप यात आहे. यातील आदिशक्ती म्हणजे सूर्य चंद्राहून प्रखर असे तेज त्यामुळे इच्छित फलप्राप्ती साठी ही रांगोळी अतिशय उपयुक्त मानली जाते. कोणत्याही धोक्यापासून संरक्षण होण्यासाठी ही रांगोळी आणि तिचे पूजन करावे. पूर्ण चौकट पिवळया रंगाने भरून त्यावर ‘क्लीम’ लिहावे व त्यानंतर बाजूची चौकट रांगोळीने भरीव करावी.

**मंगळवारची रांगोळी** –यातील ‘ऱ्हीम’ हे बीजाक्षर सूर्याशी निगडीत आहे. सूर्यासारखे तेज, जीवनशक्ती, आरोग्य यातून प्रदान होते. शिव शक्तीचा मिलाफ यात आहे. हे बीजाक्षर हृदयावर काम करते. त्यामुळे हृदयाच्या तक्रारी कमी करणे, त्याचे शुद्धीकरण, आणि मजबुतीकरण याने साध्य होते. महासरस्वतीचा प्रभाव याच्यावर असल्याने बुद्धीची तरलता वाढवणारी आणि सरस्वती बरोबर लक्ष्मीला येण्यासाठी प्रवृत्त करणारी ही रांगोळी. म्हणून संपत्ती कारक असा लाभ सांगतात. मध्यभागी लाल रंग भरून नंतर रांगोळीने ‘ऱ्हीम’ लिहून बाजूला निळया रंगाचा बदाम काढले तरी चालते.


रविवार
ह्रीम्
सोमवार
क्लीम्


मंगळवार

दिनांक शनिवार २ डिसेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी वाराची – भाग -2

यापूर्वीच्या लेखात आपण रविवार, सोमवार आणि मंगळवारची रांगोळी पहिली. खरे पाहता या आकृत्या म्हणजे त्या त्या दिवसाचा जो ग्रह असतो त्याचे यंत्र. प्रत्येक वाराचा स्वामी आणि त्याचे एक विशिष्ट यंत्र. म्हणूनच त्या दिवशी ते यंत्र किंवा आकृती आपण रांगोळीतून पहात आहोत. आपल्या शास्त्रात या यंत्र पूजेला एक महत्व आहे. यापुढचा वार बुधवार

**बुधवारची रांगोळी** – घरात सुखशांती समाधान आणि दांपत्यजीवनातील आनंद यासाठी ही रांगोळी काढावी. पैशाचे नुकसान टाळण्यासाठी सुद्धा याचा वापर होतो. सर्व प्रकारची शास्त्रे त्यांचे ज्ञान यामुळे मिळू शकते. बुध ग्रह हा या वाराचा स्वामी. या रांगोळीत एक चौकोन रेखला जातो. म्हणजेच आपले रक्षण करणारी एक तटबंदीच जणूकाही. चार बाजूला उभे असणारे चार शिपाई जगातील कोणत्याही धोक्यापासून तुमचे संरक्षण करतील. बाहेरील धोक्याबरोबर मनात असणारी चिंता, काळजी, भय, या साऱ्याला भेदून टाकण्यासाठी पाहिजे असलेले मानसिक बळ यामुळे नक्की मिळेल. यातील ऱ्हीम् हे बीजाक्षर सर्वार्थाने परिपूर्ण असे असल्याने एक सुरक्षा कवच आपल्याभोवती उभे राहते. या आकृतीत मध्यभागी हिरवा रंग भरावा आणि बाजूच्या अर्धगोलात पिवळा रंग भरावा. आणि मग रांगोळीने मध्ये 'ऱ्हीम्' अक्षर काढावे.

**गुरुवारची रांगोळी** – या दिवसाचा स्वामी गुरु हा ग्रह आणि त्याच्या पूजनाचा लाभ यामुळे मिळतो. धन संपत्ती आणि शास्त्र ज्ञान हे याचे फळ आहे. करीत असलेल्या नोकरी व्यवसायात आकस्मिकरित्या उच्च दर्जा प्राप्त होऊ शकतो. आपल्या आजूबाजूचे सहकारी आणि त्यांचे सहकार्य हे महत्वाचे असते. त्यासाठी त्या साऱ्यांच्या मनात सहकार्याची भावना वाढीस लागणे यामुळे होते. त्याच बरोबर इतरांना आपण करू शकणारी मदत ती करण्याची भावना उत्पन्न होते. आपले ध्येय गाठताना याचा खूप उपयोग होतो. सहा त्रिकोणाची चांदणी आणि त्याभोवती कंस असे या रांगोळीचे स्वरूप आहे. चांदणी लाल रंगाने भरून अर्धगोलात पिवळा रंग भरला जातो. या रांगोळीला बीजाक्षर मंत्र नाही.


**शुक्रवारची रांगोळी** – शुक्र ग्रह हा प्रेमाचा, कलेचा प्रतिक मानला जातो. आणि या वाराचा स्वामी आहे शुक्र. या रांगोळीमुळे विवाह योग जुळून येतो किंवा योग्य

ठिकाणी चांगल्या व्यक्तीशी विवाह ठरण्याची शक्यता वाढते. शुक्र ग्रहाचे पूजन केल्याचा लाभ मिळतो. दुर्गा माता किंवा आदिशक्ती प्रसन्न होते. जगाकडे बघण्याची वेगळी दृष्टी लाभते. विशुद्ध निरपेक्ष प्रेम करणे जमते. नवनवीन संकल्प मनात येतात आणि ते सिद्ध व्हायच्या साठी लागणारी शारीरिक, मानसिक, आर्थिक, आणि सामाजिक पात्रता येऊ लागते. आपण उमलत्या कमळाकडे पाहून कसे प्रफुल्ल होतो तसेच आजूबाजूचे वातावरण सकारात्मक बनत जाते. त्याच प्रकारची अनुभूती आपल्याला या रांगोळीतून मिळत जाते.

**शनिवारची रांगोळी -** शनी ग्रह हा मुख्यत: न्यायाच्या बाजूने राहणारा ग्रह. बऱ्याच वेळा गैरसमजाने याला दुख देणारा ग्रह मानतात. पण हा ग्रह नेहमीच सत्याची कास धरतो आणि अशा माणसांच्या पाठीमागे उभा राहतो. या रांगोळीमुळे आरोग्य चांगले राहते. शनी ग्रहाच्या पूजनाचा लाभ मिळतो. जीवनात शिस्त असेल तर बऱ्याच गोष्टी नियोजनबद्ध होतात. चिकाटी ठेवावी लागते. कोणत्याही संकटात न डगमगता स्थिर आणि खंबीर राहण्यासाठी या रांगोळीची मदत घ्यावी. आजचे दु:ख उद्या संपेल याची मानसिक ग्वाही मिळते. आजूबाजूच्या वातावरणात शक्तीची स्पंदने तयार होतात

चौफुल्यामध्ये गडद निळा मधील मोठ्या गोलामध्ये पिवळा आणि लहान गोलामध्ये हिरवा रंग भरावा.

रांगोळी आणि वार त्याचा ग्रह यांचा संबध किती आणि कसा मानावा याच स्वतंत्र्य ज्याला त्याला आहेच. अखेर आपले जगणे सुखात आणि समाधानात जावे असे वाटणे हा तर मनुष्यस्वभाव. म्हणून आजूबाजूच्या वातावरणात सकारात्मक उर्जा निर्माण करण्याचा एक प्रयत्न नाही का ????


बुधवार
ऱ्हीम्


गुरूवार
गुरू


तुळशीच्या झाडात विसर्जीत करावी.
शनिवार

दिनांक शनिवार ९ डिसेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रंग रेखित उंबरठा

उंबरा म्हणजे घरात प्रवेश करणाऱ्यासाठीचा एक गतिरोधक. घरात नकारात्मक शक्तींनी येऊ नये त्याचबरोबर सकारात्मक उर्जा माणसांनी बरोबर घेऊन यावी यासाठी केलेली ही योजना. त्याचबरोबर घरातील माणसांनी घराबाहेर पडताना आपल्या घरातील संस्काराची चौकट, नैतिक मुल्यांची बंधने पाळावयाची आहेत याची जाणीव ठेवावी ही घरातील उंबऱ्याची अपेक्षा असते. घराचे घरपण जपले जावे, बाहेरील व्यवहारी जगात चाललेले सारे वेगळे असते आणि ते तिथेच रहावे अशी काहीशी सीमा पण पाळली जाते ती उंबऱ्यामुळेच. हे सारे पाळल्यानेच आपले जीवन सुसह्य असते, नाहीतर या सीमा न मानल्याने भरकटलेली माणसे आपण सहज पाहू शकतो.

असे म्हणतात की उंबरठ्याबाहेरचा भाग सौर उर्जेचा आणि आतील भाग चांद्रउर्जेचे आणि मधला भाग पृथ्वी उर्जेचे संतुलन राखतो. धर्मशास्त्रात उंबरठ्यावर श्री नृसिंव्हलक्ष्मी देवतेचे स्थान मानले आहे. घरात शुभ उर्जा आणणे आणि कुटुंबाला भाग्योदयाच्या दिशेने नेणारा असेल. म्हणूनच उंबरठ्यावर उभे राहून वाद घालू नये, शिंकू नये, एवढच नाही तर नमस्कार स्वीकारू नये असे पारंपारिक संकेत आजही आपण पाळतो. उंबऱ्यावरून कोणाला उसने देऊ नये दिलेली परत घेऊ नये असेही म्हणतात.

जर दाराची चौकट लाकडी असेल तर उंबरा पण लाकडी आणि चौकट लोखंडी असेल तर उंबरा सुद्धा लोखंडी असावा असे वास्तूशास्त्रामध्ये मानले जाते. आणि उंबऱ्यावर काढायच्या रांगोळीची एक विशिष्ट पद्धत आणि त्याचा वेगळा अर्थ आहे.

उंबऱ्याच्या दोन्ही बाजूला दोन दंड म्हणजे उभ्या रेषा काढल्या जातात. प्रत्येक घरात काही धार्मिक मुल्ये, संस्कार जपली जातात, काही संस्कार पाळले जातात. काही शिस्त, पद्धती असतात. घरात प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाने या साऱ्याचा आदर करीत, आणि स्वत:मध्ये ती मुल्ये काही काळापुरती मुरवत यावे असा संकेत देतो तो हा दंड. या सुसंस्कारीत घरातील शांतता आपल्या प्रवेशापूर्वी होती तशीच अबाधित राहावी अशी जरब सुद्धा या दंडाद्वारे दिली जाते.

मध्यभागी असणारे स्वस्तिक म्हणजे सुबत्तेचे प्रतिक. घरात येणारी लक्ष्मी आपल्या स्वस्तिकाच्या रूपाने घरात येईल. ही लक्ष्मी म्हणजे फक्त पैसा, धनधान्य, दागिने असे नसून आत्मिक समाधान आणि मनाची श्रीमंती असावी. त्याचप्रमाणे लक्ष्मी म्हणजे

सौभाग्य सुद्धा मानतात. येणाऱ्या अतिथीचे पहिले स्वागत करतो तो उंबरठा. इथे येणाऱ्या अतिथीचे स्वागत पण ईश्वर रूप मानून केले जावे अशी आपली संस्कृती. पण या अतिथीने घरात यायचे ते घराच्या मान मर्यादा सांभाळून आणि राहायचे तेही सारे भान राखून. त्याचप्रमाणे या अतिथीने घरासाठी द्यायच्या आहेत त्या शुभेचछां किंवा आशीर्वाद. आणि याचसाठी हे स्वस्तिक असते ते उंबऱ्यावर.

काहीवेळा उंबऱ्यावर लक्ष्मीची पावले काढतात. ज्यात उजवे पाऊल पुढे असावे आणि डावे किंचित मागे त्यामुळे उजव्या पायाने लक्ष्मी सारे शुभ घेऊन घरात येते असे प्रतिक यात असते. डाव्या पावलावर हळद आणि उजव्यावर पिंजर असावी असाही संकेत आहे. त्याचबरोबर गोपद्म काढली जातात. त्यावरही लाल पिंजर आणि पिवळी हळद घालावी. म्हणजे लक्ष्मी आपल्याबोबर गोमातेला घेऊन म्हणजे समृद्धी घेऊन येते असेही म्हणतात.

सर्व घराची सुखशांती, समाधान, संपन्नता जपणारा, घराची मानमर्यादा सांभाळणारा हा उंबरा आणि त्यावर रेखलेली ही रांगोळी त्याला पूरक अशी असावी. कारण त्यातूनच पूल बांधला जातो तो घर आणि बाहेरचा समाज यांची. शेवटी रांगोळी कशीही असली तरी घराचे आणि मनाचे दार उघडे असावे हीच आपली खरी संस्कृती नाही का ???



दिनांक शनिवार १६ डिसेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी




## वारली चित्रे आणि रांगोळी

वारली एक आदिवासी जमात जी महाराष्ट्र राज्याच्या ठाणे जिल्ह्यात राहतात. गुजराथ आणि महाराष्ट्र यांच्या सीमेवरील डोंगराळ भाग हे त्यांचे वसतीस्थान. हे खूप मेहनती कष्टाळू, शेती करणारे लोक. निसर्ग प्रेमी आणि नैसर्गिक साधने म्हणजे बांबू, लाकूड आणि मातीच्या विटा यांनी बनवलेल्या घरात हे राहतात. बांबू आणि लाल माती यांच्या मिश्रणाने झोपडीच्या भिंती बनवल्या जातात. भिंतीवर लाल मातीचा लेप दिला जातो. त्यावर गायीच्या शेणाने सारवले जाते. त्यावर ही चित्रे काढतात. आपल्या रोजच्या

जीवनातील अनेक प्रसंग प्राणी, पक्षी, परिसर यात रेखाटतात. पिकाची मळणी, लग्न, देव स्त्री पुरुषांचा नाच असे अनेक प्रसंग यात दाखवले जातात.

गेरूची पार्श्वभूमी असलेल्या भिंतींवर तांदळाच्या पांढऱ्या पिठाने साधे व सुबक आकार रंगवण्याची पद्धत हे या चित्रशैलीचे वैशिष्ट्य समजले जाते.

चित्रांमधे एक वर्तुळ, एक त्रिकोण आणि एक चौरस असतो. ही अत्यंत प्राथमिक भित्तिचित्रे अतिशय मूलभूत समजली जातात. चित्रकाराच्या निसर्ग निरीक्षणातून सूर्य आणि चंद्र, पर्वत आणि मर्मभेदक झाडे दिसतात. केवळ चौरसाच्या आकइतीत भिन्न तर्कशास्त्राचे पालन केलेले दिसते आणि हा मानवी शोध असल्याचे कळते. प्रत्येक धार्मिक विधी चित्रकलेत दोन प्रकारच्या चौकटी म्हणून ओळखले चौरस आहेत. देवचौक आणि लग्नचौक. या विधी पेंटिंगचा मध्यवर्ती भाग विशेषकरून शिकार, मासेमारी आणि शेती, उत्सव आणि नृत्य, झाडे आणि प्राणी अशा दृश्यांना वेढला असतो. मानवी आणि प्राणी दोन त्रिकोणाद्वारे प्रस्तुत केले जातात; वरचा त्रिकोण म्हणजे पोट आणि खालचा लहान त्रिकोण म्हणजे ओटीपोट. ही चित्रे पाहताना खूप आनंद मिळतो.

विधी चित्रे ही बहुधा झोपड्यांमध्ये आढळतात. भिंती बनवण्यासाठी, झाडाच्या फांद्या, माती आणि आणि शेण यांचे मिश्रण वापरले जाते.. लाल गेरूने रंगविलेली भिंत वारली पेंटिंगची पार्श्वभूमी असते.. वारली त्यांच्या पेंटिंगमध्ये फक्त पांढरा रंग वापरतात. त्यामुळे वारली चित्रांची पार्श्वभूमी लाल तपकिरी शेणासारखी हिरवी काळी अशी असते. एक पांढरे रंगद्रव्य आणि घट्टपणा यावा म्हणून तांदुळाच्या पिठाची पेस्ट आणि डिंक असतो. ब्रश म्हणून दातांनी चावलेली बांबूची लवचीक काडी वापरतात. भित्तिचित्रे फक्त विवाहसोहळयासारख्या विशेष प्रसंगी काढली जातात. जेव्हा १९७० मध्ये या विधिचित्रकलेने मूलगामी वळण घेतले. आणि या चित्रकलेची ओळख जगभर झाली.

अशी ही वारली चित्रे आजकाल अनेक आधुनिक घरातील भिंतीवर, वाल हंगिंग किंवा फ्लॉवर पॉट, कुंडीवर पाहायला मिळतात. आजकाल साडीवर, कुर्त्यावर, पर्सवर, ग्रीटींग्स आणि पाकिटावर अशी सगळीकडे ही चित्रे दिसतात. ही चित्रे सोपी आहेत पण यातील सलगता किंवा प्रसंग रेखाटणे कठीण आहे. अलीकडे कोणत्याही रंगाच्या पार्श्वभूमीवर ही चित्रे पाहायला मिळतात.

पूर्वीची ही चित्रे महिलांनी आपल्या घराच्या भिंती, अंगण सजवण्यासाठी काढली त्यामुळे साहजिकच विशेषत:महिलांचे रोजचे जगणे यात पाहायला मिळते. कधी पिक कापणारी, रोवणारी, पाणी आणणारी, जेवण करणारी, समूह नृत्य करणारी असे प्रसंग यात असतात. एकाच आकृतीला आंबाडा काढला की तिची स्त्री बनते. त्याच बरोबर तिची मुले असतात. लहान मुलातील दोन वेण्याची शेपटे दाखवले म्हणजे मुलगी होते. चौकोन त्रिकोण अशा साध्या साध्या आकृतीमधून मनुष्याकृती गुरे वासरे रेखाटली जातात. चित्रातील झाडे रंगविताना मुळापासून सुरवात करून शेंड्याकडे पूर्ण केली जातात. म्हणजे निसर्ग नियमाप्रमाणे आधी मूळ, खोड पाने असे क्रमाक्रमाने येते. आदिवासी लोकांची मूळ प्रवृत्ती पर्यावरणाला धरून असते. त्यांच जगणे निखळ निर्मळ आणि मोकळे असते.

आपण आपल्या रांगोळीतूनसुधा या वारली चित्रकलेचे रूप आपल्या परीने रेखू शकतो. कारण ही एक हस्तकला आहे आणि खूपच सहजपणे अर्थात सरावाने ही चित्रे रांगोळीत येऊ शकतील. रांगोळीची पार्श्वभूमी अशीच मातीची गेरूची किंवा शेणसड्याची असते हे यातील साम्य. या चित्रांना स्वाभाविक अशी गोडी आणि सौंदर्य आहे. सोबतची रांगोळी एक साधी सुधी प्रतिकृती, यात आपण आपल्या कल्पनेने खूप वेगळया रांगोळया काढू शकाल.

दिनांक शनिवार २३ डिसेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी

## रांगोळी – नेहमीपेक्षा वेगळी

**नेहमीपेक्षा इतर माध्यमे वापरून काढली गेलेली रांगोळी** रांगोळीने काढल्या जाणाऱ्या रांगोळीत जर रंगाबरोबरच फुलांचा वापर केला तर रांगोळीला वेगळाच रंग येतो. त्याचबरोबर पानं-फुलं वापरूनदेखील रांगोळी छान होते. पाण्यावर कोळशाची पावडर टाकून त्यावर रांगोळी काढली जाते. विविध धान्ये वापरून देखील रांगोळी काढली जाते. आपल्याकडे जर बांगडय़ाच्या काचा असतील तर त्या पुठ्ठय़ावर चिकटवून वेगवेगळे आकार काढून त्याची रांगोळी तयार करता येईल. मेणाची रांगोळी हाही एक वेगळा प्रकार करता येईल. त्यासाठी एखादी खोलगट ताटली गरम करून त्यात मेणाचा पातळ थर द्यावा. त्याच आकाराचा कागद कापून त्यावर डिझाईन काढून घ्यावे. हे डिझाईन मेणावर नीट चेपले की कागदाचा आकार मेणावर उमटतो. मग त्यात आवडीप्रमाणे रंग भरून ताटली गार झाली की त्यावर पाणी घालावे. पाण्याखालची ही चमकदार रांगोळी छान दिसते.

पूर्वीच्या काळी निसर्गात मिळणाऱ्या रंगाचाच उपयोग केला जात असे. त्यासाठी झाडांच्या साली, पाने, फुले, रंगीत दगड आदींचा उपयोग केला जात असे. आजही भले रांगोळीत नसतील, पण आपल्याकडे नैसर्गिक रंग वापरले जातात. मात्र नैसर्गिक रंग वापरण्याचं प्रमाण आता अगदी अत्यल्प आहे. आता रांगोळीसाठीही रासायनिक रंग वापरले जातात. आपल्याकडेगुजरात, राजस्थान, तामिळनाडू, तसेच महाराष्ट्रातही रासायनिक रंग बनवले जातात. आपलं जीवन रंगमय करणारे हे रंग तयार करण्याची प्रक्रियाही तितकीच रंगमय असते.

निसर्गातील काही घटकांवर जेव्हा रासायनिक प्रक्रिया होते तेव्हा रासायनिक रंग तयार होतात हे तर सगळ्यांनाच माहिती आहे. पण कशापासून कोणता रंग तयार होतो हे शोधण्याची मात्र प्रक्रिया होती. मँगेनीज, जस्त, लोखंड आणि तांब्याचा वापर करण्याआधी हे धातू वितळवले जातात. ते वितळत असताना त्यापासून रंग निर्माण होतात. ही रासायनिक रंग मिळविण्याची पहिली पायरी. डांबर वा आगीपासून काळा रंग मिळाला. दोन वेगळी रसायने एकत्र केली की तिसराच रंग तयार होतो. याचाही शोध लागला.

यातूनच विविध रंगछटा जन्माला आल्या. मग विविध रंग बनविण्यासाठी विविध पिंगमेंटचा वापर सुरू झाला आणि त्याला आजच्या रंगांचे स्वरूप प्राप्त झाले. रांगोळीसाठी स्टार्च रंग, रांगोळीयुक्त रंग आणि लेक कलर्स वापरले जातात. यात लेक कलर्स सवरेत्कृष्ट दर्जाचे समजले जातात. आता तर डोलोमाइट दगडापासून रांगोळीयुक्त रंग बनविले जाऊ लागले आहेत. एरवी रांगोळीत रंग भरण्याआधी त्यात पांढरी रांगोळी मिसळावी लागते. परंतु डोलोमाइट रंग हे रांगोळीसारखे थेट भरता येऊ शकतात. आपल्याकडे रांगोळीची परंपरा इतकी दृढ आहे की, फक्त महाराष्ट्रात दरवर्षी साधारण तीन लाख किलोपर्यंत रांगोळी तर लाखभर किलो रंग विकले जातात, असं काही उत्पादकांना विचारता समजतं.

भारतात सगळ्या राज्यांमध्ये रांगोळीची परंपरा आहे. आपल्याकडे रोज सकाळी उठल्यावर गोपद्म आणि स्वस्तिक उंबरठ्यावर रेखाटून त्यात रंग नाही तर किमान हळद-कुंकू भरण्याची परंपरा आजही अनेक घरांत दिसते. जर रांगोळी काढण्याचा आनंद हवा असेल तर विविध आकार काढलेल्या चाळण्या, छापे बाजारात मिळतात. त्यावर रांगोळी पसरली की खाली हवा तो आकार तयार. नाही तर स्टिकरचा पर्याय आहेच. या स्टिकरच्या पर्यायाला देखील खूप छान पर्याय आज बाजारात आले आहेत.

**गोवा आणि महाराष्ट्र सोडून भारतातील प्रांताप्रांतात काढली जाणारी रांगोळी**

**गुजरातची साथिया:** एक बिंदू दुसऱ्या बिंदूशी जोडून बनवलेली जाळी हे साथियाचं वैशिष्ट्य. तीनापासून अगदी एकशेआठ ठिपक्यांपर्यंत साथिया काढली जाते. यात प्रामुख्याने स्वस्तिकाचा आकार काढला जातो.

**तामिळनाडूमधील कोलम:** तांदळाची पिठी, वीट, संगमरवराची पावडर आणि करवंटीचा चुरा एकत्र करून काढली जाणारी तामिळनाडूमधील कोलम. आजही त्याच पारंपरिक पद्धतीने काढली जाते. दरवाजात रांगोळी सजल्याने घरात सुख-समृद्धी नांदते हा विचार सगळ्याच राज्यात सारखा दिसतो. याशिवाय इथे घराचे सुरक्षा कवच म्हणून देखील कोलम काढण्याची परंपरा आहे. कुंभी, सिक्कू, कोडू, कोट्टो यासारखे ३० प्रकार कोलम रांगोळीमध्ये काढले जातात.

**राजस्थानी मांडणा, मध्य प्रदेशातील चौकपूरना आणि उत्तर प्रदेशातील सोनारखा:** मांडणा, चौकपूरना आणि सोनारखा तीनही प्रकार सारख्याच प्रकारे काढले जातात. या रांगोळयांमध्ये पूजनीय प्राणी आणि देव रेखाटण्याची पद्धत आहे. सर्पबंध हा प्रकार या रांगोळीतील वैशिष्ट्यपूर्ण आहे. ही रांगोळी काढण्याची पद्धतही शास्त्रशुद्ध आहे.

एकदा रांगोळी काढायला सुरुवात केली की ती शेवटच्या टोकापर्यंत एका रेषेने जोडली जाते.

**बंगालची अल्पना:** चुनखडीच्या शुभ्र चूर्णाने वा तांदळाच्या पिठीने वेलबुट्टी, स्वस्तिक, अष्टदल, पदचिन्हं, चंद्र-सूर्य यासारख्या विविध पारंपरिक चिन्हांनी नटलेली बंगालची अल्पना, रांगोळीचा अतिशय रेखीव प्रकार आहे.

**सौराष्ट्राची सथ्या किंवा सांझी:** सूर्योदयापूर्वी दिसणाऱ्या प्रकाशाचं आणि संध्याकाळच्या पूजेचं महत्त्व सांगणारी सांझीही संगमरवराची पूड वा तांदळाचं पीठ वापरून काढली जाते.

**केरळमधील पुवीडल:** पानं आणि फुलांचा वापर करून काढली जाणारी ही देखणी आणि विस्तीर्ण रांगोळी अधिकतर देवळांपुढे सजवली जाते.

आंध्र प्रदेशातील मुग्गू, बिहारची अरीपण, ओरिसातील झुंटी, कर्नाटकी रंगोली या विविध नावानीदेखील रांगोळी ओळखली जाते. हिंदू धर्मात तर रांगोळीचं अनन्यसाधारण महत्त्व आहेच. याशिवाय जैन आणि पारशी धर्मात देखील रांगोळीचं महत्त्व आहे. पारशी घराच्या दरवाजावर रांगोळी रेखाटली जाते. अगदी लग्नकार्यात विवाहमंडपातही जमिनीवर रांगोळीचे ठसे उमटवले जातात.

कापडावर गालिच्यासारखा रांगोळीचा आकार सजवून तयार रांगोळी केरळमध्ये बघितली होती. आपल्याकडे कार्डबोर्ड किंवा पुठ्ठ्यावर वेलवेट चिकटवून त्यावर आरसे, जर वगैरेंनी नक्षीकाम करून केलेल्या रांगोळीच्या तयार महिरपी मिळतात. याशिवाय आणखी विविध माध्यमातल्या रांगोळ्या आल्या आहेत. ‘आजच्या स्त्रियांना तासंतास रांगोळी काढण्याइतका वेळ नसतो आणि आजच्या स्पार्टेक्सच्या जमिनीवर रांगोळी दिसतदेखील नाही. तरीही आपलं घर किमान सणाच्या किंवा शुभप्रसंगी तरी रांगोळीनं सजलेलं प्रत्येक गृहिणीला हवं असतं. आपली चटई जशी विणलेली असते तशा या खोटी फुलं एकमेकांत विणून आसनासारख्या रांगोळ्या तयार केल्या जातात. या रांगोळ्या जमिनीवर ठेवायला जागा नसेल तर टेबलवर ठेवता येतील किंवा भिंतीवर देखील लावता येतील. ’या रांगोळ्या आधुनिक काळात छोट्या जागेत वापरता येण्याजोग्या.. .. अशीच एक रांगोळी आपल्या भाज्या वापरून त्यातील रंगसंगती आणि आकार याचा योग्य तो उपयोग करून तयार केलेली साधी पण वेळखाऊ मात्र ---



दिनांक शनिवार ३० डिसेंबर २०१७ दैनिक हेराल्ड, गोवा, मुक्ता पुरवणी


## रांगोळीची बॉर्डर

पहाता पहाता वर्ष संपत आले आहे. गेले वर्षभर दर शनिवारी मुक्ता पुरवणीतून आपण या "रंगवर्षा" सदरातून भेटतो आहोत. सुरवातीला खूप कठीण वाटणारे हे लिखाण हळू हळू जमत गेले. अनेक वाचकांनी फोन करून लेखाच्या प्रतिक्रिया दिल्या. लोकसंस्कृतीचे अभ्यासक श्री विनायक खेडेकर, उर्जा विकास विभागाचे सदस्य सचिव आणि वेद्संस्कृतीचे अभ्यासक डॉ प्रमोद पाठक या सारख्या खूप जेष्ठ श्रेष्ठांचे प्रोत्साहन मिळाले. काही लेखांसाठी प्रख्यात ज्योतिषी रवींद्र कामत यांचेही मार्गदर्शन लाभले. एखाद्या सदरासाठी लिहायचे म्हणजे सातत्य ठेवावे लागते. हा एक वेगळा अनुभव होता.

दै हेराल्ड चे संपादक श्री राजेंद्र देसाई यांनी माझ्यासारख्या नवख्या लेखिकेवर एवढा प्रचंड विश्वास दाखवला आणि अपूर्वा धनश्री या सारख्या मैत्रिणीनी सहकार्य केले म्हणून हे सदर पूर्ण करणे शक्य झाले. या निमित्ताने रांगोळी या विषयाचा वेग वेगळ्या पैलूचा अभ्यास करावा लागला. प्रत्येक शनिवारी वेगळे लेखन पण रांगोळीशी संबध असलेले करणे हे मला एक आव्हानच होते. म्हणून खूप ज्ञान मिळवले. शक्य तेवढे विषयाशी संदर्भ ठेवत पण वैविध्य पूर्ण लेखन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. त्यातूनच मग केशवसुतांची रांगोळीशी संदर्भ असलेली कविता, वेगवेगळ्या प्रांतातील रांगोळ्या त्यांची नावे, वैशिष्ट्ये असा पसारा वाढत गेला. आणि मला एक जाणवलेली गोष्ट म्हणजे दाक्षिणात्य रांगोळ्या म्हणजे कोलम मुग्गु तसेच बांगला रांगोळी अल्पना याचे सारे संदर्भ त्याचे धार्मिक महत्व पद्धती आणि प्रत्यक्ष रांगोळ्या गुगल वर सहज उपलब्ध आहेत. पण आपल्या ठिपक्याच्या साध्या सोप्या रांगोळ्या मात्र तेवढ्या मिळत नाहीत. आपण आपला ठेवा संचित कुठे तरी विसरत जाऊ का अशी एक खंत वाटली. म्हणूनच शक्यतो या रांगोळ्या आपल्या पारंपारिक ठिपके वाल्या असाव्यात असा कटाक्ष ठेवला. अगदी कमी वेळात आणि कमी रंगात या रांगोळ्या काढू शकतो. हा ठेवा कुठेतरी पुढील पिढीकडे जावा असे प्रयत्न मनापासून होते. माझ्याकडे ठिपक्यांच्या रांगोळ्यांचा आणि गाठीच्या रांगोळ्यांचा भरपूर संग्रह आहे असा एक शोध लागला. आणि स्वत:ची एक वेगळी ओळख मलाच झाली. अनेक वेळा समारंभाला भेटलेल्या ओळखी अनोळखी लोकांनी लेख वाचत असल्याचे सांगत सुखद धक्के दिले. एकदा तर सम्राट क्लब फोंडा यांनी माझे सणांच्या रांगोळ्या आणि महत्व त्याचा स्लाईड शो ठेवला. खूप कौतुक झाले. लेखांचे पुस्तक यावे अशा सदीचछासुद्धा व्यक्त झाल्या. कदाचित पुढील वर्षात हे पुस्तक येईल.

वर्ष संपले आणि म्हणून आता ही रांगोळी म्हणजे बॉर्डर. आपल्याला दाराच्या बाहेर, चौरंगाच्या सभोवती एखाद्या विशेष समारंभासाठी काही छोट्या साध्या सोप्या रांगोळी बॉर्डरने आपल्या घराचे रूपच बदलून जाते. काहीवेळा या मुक्त हस्त रितीने तर कधी ठिपक्यातूनही अशा रांगोळ्या काढतात. आपल्या अंगणाबाहेर, उंबर्याबाहेर किंवा घरात एखाद्या सणाला देवकृत्याला ही रांगोळी काढतात.

आपली सीमा, मर्यादा, जीवनात महत्वाची. त्यामुळे किती, काय करावे, कुठे थांबावे हे ही समजले पाहिजे. म्हणून आता इथेच थांबू आणि खूप अगदी मनापासून धन्यवाद. !!!!


rangoli-sans-dots.com


© Nagu's Handwork




© Nagu's Handwork

# सौ दीपा जयंत मिरींगकर



या पुस्तकाच्या लेखिका दीपा मिरींगकर या गोव्याच्या इंजिनियर. गोवा येथे विद्युत खात्यात कनिष्ठ अभियंता म्हणून नोकरी करत असताना त्या आपला लेखनाचा छंद जोपासतात.
गेली कित्येक वर्षे अनेक वर्तमानपत्रातून कला, संकृती, पर्यावरण इ विषयावर त्यांचे लेख प्रसिद्ध होत आहेत. त्यांनी २०१७ साली दर शनिवारी 'मुक्ता' या दै. हेराल्ड (मराठी) गोवा च्या पुरवणीसाठी रांगोळी विषयक 'रंगरेषा' हे सदर लिहिले. सध्या (२०१८ साली) दर रविवारी दै गोमन्तक, गोवा च्या 'शब्द सोहळा' या पुरवणी साठी त्यांचे 'पालकनीती' हे सदर चालू आहे.
त्यांच्या अनेक कवितांना आणि कथाना महाराष्ट्र गोवा राज्यात पारितोषिके मिळाली. अनेक साहित्य संमेलनात त्यांचा सक्रीय सहभाग असतो.
सध्या काही कथालेखनही त्या करत आहेत. एका वेगळ्या विषयावरील कादंबरी लेखनाला सुरवात केली आहे. ज्यामध्ये गोव्यातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव- त्याची सुरवात –अडचणी- एका अधिकाऱ्यावर तत्संबधी आलेला दबाव- कुटुंबाची फरफट - मिडिया आणि असेच काही ----
त्यांच्या कवितांचे पुस्तक लवकरच प्रसिद्ध होईल.
नोकरी, घर आणि साहित्यसेवा यांच्याबरोबरच त्या गोव्यातील काही सामाजिक संस्थासाठी काम आणि अनेक साहित्यिक, सांगीतिक, सांस्कृतिक उपक्रम /कार्यक्रमाचे आयोजन आणि निवेदन वगैरे उपक्रमांत असतात.
त्यांच्या या पुस्तकावरील वाचकांचे अभिप्राय जाणून घेण्यास त्या उत्सुक आहेत. त्यांचा संपर्कपत्ता

सौ दीपा जयंत मिरींगकर
७०१ अ राजदीप गॅलारीआ
सदर फोंडा गोवा ४०३४०१
फ़ोन : ९४२३८८६२९२, 9423886292
dmiringkar@gmail. com

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा. किंवा7710980841हा नंबर सेव्ह करून या नंबरला तुमचे नांव व गांवWhatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.

पण फ़ुकट नाही.

या मागे अनेकांचे कष्ट आहेत.